# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक १९-१२-१९९२ ते १८-०३-१९९३**

**रजिष्टर क्र.१२**

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**शनिवार दि. १९/१२/९२ रोजी घेण्यात आलेली सर्वसाधारण सभा तहकुब करण्यात येऊन, ती बुधवार दि. ३०/१२/९२ रोजी घेण्याचे ठरविण्यात आले, तथापि ती सभा सुध्दा पुढे ढकलण्यात येऊन, मंगळवार दि. १९/१/९३ रोजी सर्वसाधारण सभा (अंदाजे) सकाळी ठिक ११.०० वाजता मा. महापौर श्री. यादव अशोक सायन्ना यांचे अध्यक्षतेखाली " वंदे मातरम " या गिताने सुरु झाली, तिचे इतिवृत्त**

**सभेस मा. आयुक्त, उप आयुक्त तथा अधिकारी आणि खालील स. सदस्य उपस्थित होते.**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मा. श्री. | अजिमखान दादामियाँ अ. रहेमान | स. सभासद |
| २) | मा. श्री. | विधाते प्रभाकर सिताराम | -//- |
| ३) | मा. श्री. | अजिजल्ला बेग वाहेद बेग | -//- |
| ४) | मा. श्री. | पंडागळे रतनकुमार नारायणराव | -//- |
| ५) | मा. श्री. | गंगाखेडकर धनंजय मनोहरराव | -//- |
| ६) | मा. श्री. | सोनवणे केशव काशिनाथ | -//- |
| ७) | मा. श्री. | भगुरे तुळशीराम छगन | -//- |
| ८) | मा. श्री. | सुर्यवंशी महादेव पुंडलीक | -//- |
| ९) | मा. श्री. | पाटील नरेंद्र यादवराव | -//- |
| १०) | मा. श्री. | घडामोडे मोतीराम नारायणराव | -//- |
| ११) | मा. श्री. | म. अय्युब गुलाम जिलानी | -//- |
| १२) | मा. श्री. | मुजिब आलमशा खान | -//- |
| १३) | मा. श्री. | प्रधान बंडू गोविंदराव | -//- |
| १४) | मा. श्री. | नारायण मोहन फत्तेलष्कर | -//- |
| १५) | मा. श्री. | जावेद हसनखान कासिन हसेन खान | -//- |
| १६) | मा. श्री. | तकीहसन खान कासिम हसनखान | -//- |
| १७) | मा. श्री. | स. अहमद एकबालुद्दीन स. मो. कुतुबुद्दीन | -//- |
| १८) | मा. श्री. | मिर्झा अन्वर बेग हमीद बेग | -//- |
| १९) | मा. श्री. | गिल इकबालसिंग प्रितमसिंग | -//- |
| २०) | मा. श्री. | अ. रहिदखान (मानु) अ. हमीदखान | -//- |
| २१) | मा. सौ. | दलाल लता श्रीनिवास | -//- |
| २२) | मा. श्री. | जैस्वाल प्रदिप शिवनारायण | -//- |
| २३) | मा. श्री. | खैरे चंद्रकांत भाऊराव | -//- |
| २४) | मा. श्री. | डॉ. संचेती चेनकरण गणेशलाल | -//- |
| २५) | मा. श्री. | मगर शंकर जिजाराम | -//- |
| २६) | मा. श्री. | मानकापे नामदेवराव शामराव | -//- |
| २७) | मा. श्री. | पैठणकर पांडूरंग भिमाजी | -//- |
| २८) | मा. श्री. | आलफखान हुसैन खान | -//- |
| २९) | मा. श्री. | वाघमारे सुदाम भानुदास | -//- |

| | | | |
|---|---|---|---|
| ३०) | मा. श्री. | सावे मोरेश्वर दिनानाथ | -//- |
| ३१) | मा. श्री. | बारवाल गजानन रामकिसन | -//- |
| ३२) | मा. श्री. | जावळे प्रकाश शिवराम | -//- |
| ३३) | मा. श्री. | हाळनोर गिरजाराम नानाराम | -//- |
| ३४) | मा. श्री. | कुमावत अविनाश लक्ष्मणराव | -//- |
| ३५) | मा. श्री. | नवपूते कचरु चंद्रभान | -//- |

विषय क्र. ८६/१ दि. १९/११/९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :-**

श्री. नारायण फत्तेलक्ष्कर :- प्रकल्प विभागामार्फत व्हिडीओ फिल्म जी फत्तेलष्कर तयार करण्यात आली. त्या फिल्ममध्ये प्रशासनाने सर्व लोकप्रतिनिधींनी त्यांचे वार्डात कोणकोणते कार्य केले. याबाबतची माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते. केवळ स.सदस्या श्रीमती लता दलाल यांचे वार्डातील पुलाचे कामाची व्हिडीओ फिल्म घेण्यात आल्याचे आमचे निदर्शनास आले परंतू इतर कोणत्याही स. सदस्यांच्या वार्डातीम माहीती या व्हिडीओ फिल्ममध्ये घेण्यात आलेली नाही किंवा आम्हाला विश्वासात घेतलेले नाही. यामध्ये घेण्यात आलेली माहीती प्रशासनानेच पुर्णपणे केलेले आहेत. असे भासवून ब-याचशा भागामध्ये स. सदस्यांना विचारात न घेता व्हिडीओ फिल्म तयार करण्यात आलेली आहे. यामध्ये प्रशासनाचाच पूर्ण सहभाग असून लोकप्रतिनिधीला विचारत घेतले गेले नाही. याचा निषेध म्हणून मी "सभात्याग" करीत आहे. (अंदाजे ठिक ११.३० वाजता)

श्री. नरेंद्र पाटील :- गेल्या दोन-तीन महिन्यापासून शहरातील विविध भागामध्ये तसेच विशेषतः सिडको आणि जालना रोडवर ५०-५० फुटावर तिन/तिन गतीरोधक (स्पीड ब्रेकर) जवळ जवळ लावण्यात आलेले आहेत. त्याच शेजारी मोठे मोठे खड्डेही आहेत. ज्यामुळे येण्याऱ्या नागरीकांना या गतीरोधकामुळे शारीरीक त्रास होत आहे. कृपया मा. आयुक्त यांनी स्वत: पाहणी करुन जवळ जवळ करण्यात आलेले गतिरोधक काढुन घेण्याची कार्यवाही करावी.

मा. महापौर :- मी सर्व स. सदस्यांना विनंती करतो की, सर्वांनी विषयपत्रिकेवर चर्चा करावी.

श्री. अविनाश कुमावत :- गेल्या ३/४ महिन्यापासून मी सतत सभेमध्ये बोलतो आहे की, गजानन महाराज मंदिरासमोर बऱ्याच प्रमाणात अतिक्रमण होत आहेत ते त्वरीत हटविण्यात यावे, तथापि अद्याप पावतो हटविण्यात आलेले नाही. याबाबत मा. महापैार, आपणही पुढील सभेपर्यन्त कार्यवाही होईल असे सुचित केलेले होते. तथापि कोणतेही हालचाल झालेली नाही.

मा. महापौर :- संबधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

मालमत्ता अधिकारी :- मा. आयुक्त यांनी या प्रकरण संदर्भात मंजूरी दिलेली आहे, परंतू पोलीस बंदोबस्त न मिळाल्याने प्रकरण स्थगित आहे.

मा. महापौर :- केवळ पोलीस बंदोबस्त न मिळाल्याने प्रकरण स्थगित न ठेवता याबाबत पोलीस आयुक्तांना त्वरीत पत्राने कळवून पुढील कार्यवाही करावी.

श्री. तकीहसन खान :- शहरामध्ये अनेक अतिक्रमणे पोलीसांच्या मदतीने हटविणे आवश्यक आहे. शिवाय अशा कामाच्या वेळी तेथील संबंधित नगरसेवक जातीने हजर असणे आवश्यक आहे. कोणताही अडथळा नगरसेवकाकडून होता कामा नये याची काळजी घ्यावी.

श्री. सुदाम वाघमारे :- अतिक्रमण संदर्भात एका विशेष बैठकीचे आयोजन करावे.

श्री. चंद्रकांत खैरे :- शहरामध्ये डांबरकरण्याचे विविध ठिकाणी काम चालू आहेत. परंतू परिसर अभियांत्रिक कार्यालयाचे पाईपलाईनचे कामासाठी तर कधी विद्युत मंडळाकडील खांबाचे कामासाठी तर कधी टेलिफोन खात्याचे फोनच्या कामासाठी व ड्रेनेजचे पाईप लाईन टाकणेसाठी वेळोवेळी खड्डे खोदले जातात. त्यामुळे डांबरीकरण केलेले पुन्हा रस्ता खराब होतो व पर्यायाने पुन्हा डांबरीकरण करणे भाग पडते. यासाठी मनपाला आर्थीक खर्चाचा बोजा होतो. याबाबत असा एक सर्वानुमते निर्णय घेणे आवश्यक आहे की, ज्या विभागामार्फत अशा प्रकारची कामे होतील तर त्यांनी प्रथम त्या वार्डातील कामांची सुचना द्यावी व त्यांचेकडून काही फीस वसूल करण्यात यावी.

मा. महापौर :- सुचना योग्य आहे. याबाबत उद्या दि. २०/१/९३ च्या बैठकीस सर्वानुमते निर्णय घेता येईल.

श्री. प्रदिप जैस्वाल :- मागील बैठकीचे वेळेस मी काही प्रश्न विचारणा केलेली होती. त्या बाबतची माहिती द्यावी.

श्री. अजिजुल्ला बेग :- इतिवृत्त कायम करुन नंतर प्रश्न चर्चेला घ्यावे.

मा. महापौर :- स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे इतिवृत्त कायम केल्यानंतर प्रशन चर्चेला घेता येईल.

श्री. अलफ खान :- विषयपत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या विषयानुसार अगोदर इतिवृत्त कायम करण्यात यावे आणि उद्याच्या नियमीत सभेत सविस्तर चर्चा व्हावी.

श्री. प्रदिप जैस्वाल :- मागील महिन्यातील सभेला विचारण्यात आलेल्या प्रश्नांची माहिती मी विचारीत आहे. आणि तेच प्रश्न उद्याच्या बैठकीत घेणार आहात काय?

मा. महापौर :- ठीक आहे.

सौ. लता दलाल :- सदरची सभा केवळ इतिवृत्त कायम करणे साठीची आहे काय? बाकीचे प्रश्न विचारत घेतले जाणार नाहीत काय याची माहिती द्यावी.

श्री. पांडूरंग पैठणकर :- वार्ड क्र. ३९ मधील कैलास गॅरेज ते चंपा मसजीत हा डी. पी. रोड बंद का आहे याची माहिती उद्याच्या बैठकीत द्यावी.

मा. महापौर :- सर्व स. सदस्यांना विनंती करण्यात येते की, जास्त चर्चा न करता इतिवृत्त कायम करण्यात यावे.

श्री. प्रदिप जैस्वाल :- शहरात विविध भागामध्ये सुशिक्षित बेकार युवक रोजी-रोटी साठी टपऱ्या टाकून आपआपले धंदयात गुंतून राहण्याचे प्रयत्न करतात परंतू मालमत्ता विभागाकडून योग्य ते संकेत मिळत नाही. हजांरो काम रु. ९०/-ने घेऊनही टपरीधारकांना परवाना मिळत नाही. यासाठी शहरामध्ये कोणत्या ठिकाणी टपऱ्या बसवाव्यात याचा निर्णय घेणे आवश्यक असल्याने काही स. सदस्य तथा

मालमत्ता अधिकारी / अतिरीक्त शहर अभियंता / सह. संचालक नगर रचना यांची एक समिती गठण करुन निर्णय घेण्यात यावा.

श्री. धनंजय गंगाखेडकर :- स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे एक समिती गठण करावी किंवा स्थायी समितीला अधिकार द्यावेत.

मा. महापौर :- ठीक आहे. याबाबत उदयाच्या बैठकीत चर्चा करुन, निर्णय घेण्यात येईल. या बरोबरच विषय क्र. १ ला मंजूरी देण्यात येते.

**ठराव** :- प्रस्तावात दर्शविल्यानुसार दि. १९/११/९२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त या व इतर दुरुस्त्यांसह कायम करण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

"जन गण मन" राष्ट्रगिताने सभा संपली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| नगरसचिव, | मा. महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**बुधवार दि. २०/१/९३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधाराण सभेचे इतिवृत्तः-**

**बुधवार दि. २०/१/९३ रोजी अंदाजे ११.०० वाजता मा. महापौर श्री. यादव अशोक सायन्ना यांचे अध्यक्षतेखाली "वंदे मातरम्" या गिताने सर्वसाधारण सभेस सुरुवात आली.**

**या सभेस मा. आयुक्त उप आयुक्त तथा अधिकारी व खालील स. सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. आजेमखॉन दादामियॉ अ. रहेमान | स. सभासद |
| २) | मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव | -//- |
| ३) | मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | -//- |
| ४) | मा. श्री. अजिजुल्ला बेग वाहेद बेग | -//- |
| ५) | मा. श्री. पडांगळे रतनकुमार नारयणराव | -//- |
| ६) | मा. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव | -//- |
| ७) | मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ | -//- |
| ८) | मा. श्री. भगुरे तुळशीराम छगन | -//- |
| ९) | मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुडंलीक | -//- |
| १०) | मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव | -//- |
| ११) | मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायणराव | -//- |
| १२) | मा. श्री. म. आयुब गुलाम जिलानी | -//- |
| १३) | मा. श्री. मुजिब आलमशा खान | -//- |
| १४) | मा. श्री. प्रधान बंडू गोविंदराव | -//- |
| १५) | मा. श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर | -//- |
| १६) | मा. श्री. जावेद हसनखान कासीम हसनखान | -//- |
| १७) | मा. श्री. तकी हसनखान कासिमहसन खान | -//- |
| १८) | मा. श्री. स. अहमद एकबालोद्यीन स. मो. कुतुबूद्यीन | -//- |
| १९) | मा. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीदबेग | -//- |
| २०) | मा. श्री. ओक जयवंत केशवराव | -//- |
| २१) | मा. श्री. गिल इकबालसिंग प्रितमसिंग | -//- |
| २२) | मा. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव | -//- |
| २३) | मा. श्री. अ. राशेद खान (मामू) अ. हमीदखान | -//- |
| २४) | मा. सौ. दलाल लता श्रीनिवास | -//- |
| २५) | मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | -//- |
| २६) | मा. श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव | -//- |
| २७) | मा. श्री. हाजी मोहमंद हाफिजोद्यीन | -//- |
| २८) | मा. श्री. छापरवाल रमेश नारायण | -//- |
| २९) | मा. श्री.पालीवाल विजय गोविंदलाल | -//- |
| ३०) | मा. डॉ. संचेती चेनकरण गणेशलाल | -//- |
| ३१) | मा. श्री.फैय्याजखान अहमदखान | -//- |

| | | |
|---|---|---|
| ३२) | मा. श्री. मोहसिन अहमद बशीर अहमद | -//- |
| ३३) | मा. श्री. स. हुसेन स. अहमद | -//- |
| ३४) | मा. श्री. मगर शंकर जिजाराम | -//- |
| ३५) | मा. श्री. मानकापे नामदेवराव शामराव | -//- |
| ३६) | मा. श्री. पैठणकर पांडूरंग भिमाजी | -//- |
| ३७) | मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलान | -//- |
| ३८) | मा. श्री. अलफखॉन हुसैनखान | -//- |
| ३९) | मा. श्री. वाघमारे सुदाम भानुदास | -//- |
| ४०) | मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी | -//- |
| ४१) | मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव | -//- |
| ४२) | मा. श्री. सावे मोरेश्वर दिनानथ | -//- |
| ४३) | मा. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव | -//- |
| ४४) | डॉ. काळे शांताराम यशवंत | -//- |
| ४५) | मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस. | -//- |
| ४६) | मा. श्री. ऐबिरॉय मनमोहनसिंग कमरसिंग | -//- |
| ४७) | मा. श्री. बारवाल गजानन रामकिसन | -//- |
| ४८) | मा. श्री. गोडसे आनंद जगदीश | -//- |
| ४९) | मा. श्री. जहागिरदार आजिज मुक्तार अहमद | -//- |
| ५०) | मा. श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम | -//- |
| ५१) | मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम | -//- |
| ५२) | मा. श्री. गाडे गंगाधर सुखदेव | -//- |
| ५३) | मा. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव | -//- |
| ५४) | मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव | -//- |
| ५५) | मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल. | -//- |

**संवाद :-**

श्री. पांडूरंग पैठणकर :- मी कालच्या बैठकीत केलेल्या प्रश्नाप्रमाणे कैलास गॅरेज ते चंपा मस्जिद येथील रोडचे काम का बंद पडले. याची माहिती विचारली होती. ती देण्यात यावी.

मा. महापौर :- सर्वप्रथम अर्धा तास प्रश्नोत्तरासाठी देण्यात येतो.

अजीज जहाँगीरदार :- सर्वसाधारण सभेने पारित केलेल्या ठरावाची जर अंमलबजावणी होत नसेल तर, या सभागृहाला काय अर्थ. या ठिकाणी मा. आयुक्तांचे कोणतेही अधिकारी ऐकत नाही तर, सभागृहाचा उपयोग काय?

मा. महापौर :- स. स. आपण केवळ कोणत्या कामाची अंमलबजावणी झाली नाही. याबाबत सुचना करावी.

श्री. अजिज जहागिरदार :- नगररचनाकार यांना मनपातून त्यांचे मुळ खात्यात परत पाठविण्याचा प्रस्ताव दि. १७/१/८९ रोजीच्या ठरावान्वये आलेला आहे. तथापि, पुन्हा स. सदस्य श्री. पंडागळे यांनी दि. २०/८/९२ चा सर्वसाधारण सभेमध्ये याच संदर्भात प्रस्ताव ठेवला होता व तो मंजुर झाला. परंतू दि. १/८/९२ नंतर

ठराव झाल्याने पुन्हा दि. १६/९/९२ च्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ४५/१ अन्वये दुरुस्ती करुन तो दि. १/८/९२ ऐवजी दि. १/१०/९२ पासून नगर रचनाकार यांना कार्यमुक्त करावे. असा प्रस्ताव मंजुर झालेला आहे. परंतू अद्यापही त्यांना कार्यमुक्त करण्यात आलेले नाही व ठरावाची अंमलबजावणी झालेली नाही. याचे कारण काय? तीन महिन्यापासून संबंधित अधिकारी यांना कार्यमुक्त केले नाही. त्यांचा पगार कमी द्यावा. त्याचप्रमाणे आरोग्य वैद्यकीय अधिकरी यांचे कक्षात मी बसलो असतांना मा. आयुक्तांचे लेखी आदेश आला की, महाराष्ट्र शासनाचे उपसचिव हे एक दिवसाच्या भेटीसाठी औरंगाबाद येत आहेत. त्यासाठी आपली गाडी त्यांचेसाठी देण्यात यावी. त्यावेळी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी सदरचा आदेश पाहुन फेकून दिला व अशा आदेशाला मी मानत नाही. अशा प्रकारे माझे समक्ष या अधिकाऱ्यांनी उच्चार काढले व तच उच्चारलेले शब्द मी उप आयुक्तांना सांगितले. म्हणजे मला सुचवायचे आहे की, संबंधित अधिकाऱ्यांनी वरिष्ठांचे आदेश मानवायचे नाही. सभागृहाने पारित केलेल्या ठरावाची अंमलबजावणी मा. आयुक्त करित नाही. तर या सभागृहाला अर्थच नाही. याबाबत योग्य तो निर्णय व्हावा.

श्री. प्रदिप जैस्वाल :- कायदयात तरतुद आहे की, एकदा संबंधित अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करण्याचा प्रस्ताव पारित झाल्यानंतर ताबडतोब मुक्त करावे असा आहे. तेव्हा तीन महिन्यापासून मंजुर झालेला प्रस्तावानूसार त्यांना कार्यमुक्त का करण्यात आलेले नाही आणि आतापर्यंन्तचा पगार त्यांचा कुणी द्यावा याची माहिती द्यावी आणि विधी सल्लागार यांनी कायदयात तशी तरतुद आहे किंवा नाही याचीही माहिती द्यावी.

श्री. अजिजुल्ला बेग :- या संदर्भात मा. आयुक्त यांनी माहिती द्यावी.

श्री. रतनकुमार पंडागळे :- माहे ऑक्टोबर महिन्याच्या सर्वसाधारण सभेच्या बैठकीत ब्रिजवाडी येथील गॅस्ट्रोने मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींची सखोल चौकशी मा. आयुक्त करतील असा आदेश दिलेला होता.

तथापि, अद्यापही अहवाल सभागृहात सादर झालेला नाही. याची दखल घ्यावी. अन्यथा सभागृहात काहीही अर्थ राहणार नाही.

श्री. पांडूरंग पैठणकर :- नगररचना विभागाकडे गेल्या दोन महीन्यापासून श्री. अप्पासाहेब आंनदराव पाटील यांनी एन. ओ. सी. साठी फाईल दाखल केलेली आहे. परंतू त्यांचे फाईलवर "चर्चा" करावी, असा शेरा लिहून ठेवलेला आहे व संबंधित अधिकाऱ्यांना भेटण्यास जावे तर ते जागेवर हजर नसतात. तेव्हा दोन/दोन महिन्यापासून एन.ओ.सी. साठी इतका त्रास होत असेल, तर बांधकाम परवानगीसाठी काय नागरीकांचे हाल होत असतील याची कल्पना न केलेली बरी.

श्री. मधुकर शिंदे :- मा. आयुक्त यांनी पोलीस आयुक्तांना माझे नांवे खोटी बातमी दिली त्याबाबत एक लक्षवेधी सुचना मांडलेली आहे.

श्री. सुदाम वाघमारे :- स. सदस्य श्री. शिंदे यांनी मा. आयुक्तांना जी नोटीस दिली, ती आम्ही वाचलेली आहेत. मा. आयुक्तांनी नोटीस देण्यापूर्वी शहानिशा करणे आवश्यक असून लोकप्रतिनिधी म्हणून संबोधल्या जाणाऱ्या स. सदस्यांना प्रत्यक्षात संपर्क

साधने आवश्यक होते. आणि नंतरच काय ते निर्णय घ्यावयाचा होता. तथापि, अधिकारी व लोकप्रतिनिधी यांच्यातील आपसात सांमजस्य असणे आवश्यक असल्याने असे प्रकार टाळता येतात याबाबत जर उदा. दयावयाचे झाल्यास कार्यकारी अभियंता (पा.पू) यांच्या कार्यक्षेत्रात काम करित असलेले उप अभियंता पा.पू.सिडको, झोन येथील कनिष्ठ अभियंता यांनी रु. एक लाखाचे एम. बी. रेकॉर्ड करुन पैसे उचलेले आहेत. याबाबतची चौकशी व्हावी.

श्री मधुकर शिंदे:-माझ्या वार्डात नळ कनेक्शनच्या संदर्भात आलेल्या कर्मचाऱ्यांना मी समजावून सांगत असतांना माझ्या विरुध्द खोटी बातमी पोलीस आयुक्तांना का दिली.

श्री बंडू प्रधान, श्री रतनकुमार पंडागळे :- नेमके कारण काय घडले. याची सभागृहाला माहिती द्यावी.

मा. महापौर :- (सदरचे पत्र सभागृहाला वाचून दाखविले.)

श्री. मधुकर शिंदे :- स. संदस्यांना विचाराणा न करता डायरेक्ट पोलीस आयुक्तांना आपण पत्राने का कळविले.

श्री. प्रदिप जैस्वाल :- प्रत्येक झोन वार्डात कनिष्ठ अभियंता (पा.पू) असतो. त्याचे देखरेखीसाठी उप अभियंता सुध्दा असतो. मग अनाधिकृत नळ कनेक्शन का होतात. जर होत असतील तर अशा उप अभियंत्यांना निलंबीत करण्यात यावे. आणि स. सदस्यांच्या बाबतीत या प्रश्नासाठी अगोदर विचारणा करणे आवश्यक होते. विनाकारण चरित्र हनन करणे योग्य नाही.

श्री. सुदाम वाघमारे :- मी ऐनवेळचा प्रस्ताव दिलेला आहे, त्यावर चर्चा व्हावी.

श्री. गिरजाराम हाळनोर :- स. सदस्यांना जी. मा. आयुक्त यांनी नोटीस दिली ती महाराष्ट्रातील पहिलीच घटना असेल. कारण अशा प्रकारची घटना कुठे घडलेली नाही. स. सदस्याकडून काही घडलेले असल्यास त्यांना संपर्क साधता येतो. त्यासाठी त्यांचेकडे फोन व घरचे पत्ते आपल्याकडे आहेत. रितसर संपर्क साधुन प्रश्न मिटविता आला असता, परंतू नोटीस देणे योग्य नाही. अशी नोटीस देणे म्हणजे सर्व स. नगरसेवकांचा अपमान होय.

मा. महापौर :- स. सदस्य आपणास सुचित करण्यात येत की, सं. सदस्यांना दिलेले पत्र आहे. ती नोटीस नाही हे लक्षात घ्यावे.

श्री. मोतीराम घडामोडे :- अनाधिकृत नळ कनेक्शनच्या संदर्भात असेत तर, आम्ही बोलणार नाही. जर अधिकृत नळ असेल आणि थकबाकी बाबत काही असेल तर नगरसेवक या नात्याने विचारविमर्श करुन तडजोड क रता येऊ शकते. परंतू नोटीस देवून धमकी देता कामा नये.

श्री. केशव सोनवणे :- याबाबत मा. आयुक्त यांना खुलासा करु द्यावा.

श्री. मधुकर शिंदे :- या नोटीसामुळे माझ्या घरी पोलीस येऊन गेलेत, त्याचे काय? त्याचप्रमाणे नंदादिप सोसायटीत २७ अनाधिकृत नळ कनेक्शन होते. त्यांना नोटीस का दिली नाही. याचा खुलासा व्हावा.

श्री. नरेंद्र पाटील :- स. सदस्यांशी चर्चा करुन नंतरच मा. आयुक्तांनी नोटीस देणे आवश्यक होते.

श्री. केशव सोनवणे :- मा. आयुक्तांनी पोलीस आयुक्तांना पत्र देण्याचे कारण काय?

श्री. शांताराम काळे :- स. सदस्य श्री. शिंदे यांना मा. आयुक्त यांनी पत्र का देवून कळविले या संदर्भात एकमेकांची बाजू कर्मचारी व स. सदस्य यांचे मत जाणून घेऊनच योग्य ते समजेल परंतू या ठिकाणी जास्त चर्चा न करता पुढील भविष्यात पाण्याचा प्रश्न भेडसावणारा आहे. या सभेमध्ये पाणी पट्टीचाही प्रश्न येत आहे. त्या अनुंषगाने मनपाचे उत्पन्नात भर कशी पडेल याचा सर्वांगीन विचार होणे आवश्यक आहे.

श्री. प्रदिप जैस्वाल :- मागील वेळेत माजी आयुक्त श्री. गौतम मुन्शी असतांना अशीच एक घटना स. सदस्य श्री. राशिद मामू यांच्याशी झालेली होती. त्यावेळी मा. आयुक्तांनी मी महापौर असतांना गोपनीय पत्राद्वारे कळविले होते की, याबाबत सभागृहात निर्णय घ्यावा. तशाच प्रकारचे पत्र मा. आयुक्तांनी देणे आवश्यक होते.

श्री अजिजुल्ला बेग :- मा. आयुक्ताचे वैयक्तिक काय मत आहे ते सभागृहाला कळू द्यावे.

श्री. गंगाधर गाडे :- जे आरोप मा. आयुक्तांवर स. सदस्य करीत आहेत. त्या संदर्भात संबंधित कर्मचारी अधिकारी यांचे काय मत आहे, ते कळल्याशिवाय सभागृहाला माहिती पडणार नाही आणि शिवाय पोलीस आयुक्तांना पत्र देण्याचे कारण काय याचीही कल्पना येईल.

मा. महापौर :- स. सदस्य श्री. गाडे मी आपणास सांगू इच्छितो की, सदरील पत्र स. सदस्यांना देवून त्याची पत्र मला व स्थायी समिती, झोन अधिकारी तसेच माहीतीस्तव पोलीस आयुक्तांना दिलेली आहे. ही नोटीस नसून पत्र आहे. त्यामुळे प्रश्न याच ठिकाणी संपतो.

श्री. रतनकुमार पंडागळे :- शहरामध्ये मनपातील कर्मचाऱ्यांना काम करीत असतांना घरामध्ये कोंडून मारहाणीचे प्रकार बऱ्याच वेळेस झालेले आहेत. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी विचारणा करावी.

श्री. बंडू प्रधान :- शासकीय अनुदानाची रिकव्हरी होत असतांना कर्मचाऱ्याना अडथळे निर्माण करुन, जर शासकीय कामात अडथळे होत असतील तर पुढील शासकीय अनुदान मिळणे असंभव होईल आणि नुकसान होईल आणि त्यामुळे शहरांची प्रगती खुटेल याची सर्वांनी दक्षता घ्यावी.

श्री. तकीहसन खान :- स. सदस्य श्री. शिंदे यांना मा. आयुक्तांनी जे पत्र दिले ते माहितीस्तव दिलेले आहे. यापूर्वी माजी आयुक्त असतांना स. सदस्य श्री. नारायण फत्तेलष्कर, नामदेवराव मानकापे, मोहसीन अहमद यांचे नांवे डोयरेक्ट पोलीस तक्रार केलेली आहे. त्यामुळे यात मा. आयुक्तांचे मोठेपण आपण समजून घेतले पाहिजे. काही दिवसापूर्वी काही नगरसेवकांना तडा लागला त्यावेळी कूणी भ्र शब्द सुध्दा काढला नाही वा निषेधही व्यक्त केला नाही. याठिकाणी पोलीस आयुक्तांना माहितीस्तव प्रत दिली जाते. तर इतकी चर्चा होते याला काहीही अर्थ नाही.

श्री. रतनकुमार पंडागळे :- सिडको-एन ८ येथील दवाखाना ज्यावेळेस पासून ताब्यात घेतलेला आहे तो सध्या अस्तित्वात आहे काय? याची माहिती द्यावी.

श्री. मोतीराम घडामोडे :- अनाधिकृत नळ कनेक्शनच्या बाबतीत आम्ही कूठेही आडकाठी येणार नाही. परंतू अधिकृत नळ कनेक्शनद्वारे पाणी पुरवठा होत नसूनही बिले मात्र

प्रत्येक महिन्यात येतात आणि न भरलेल्याचे कनेक्शन कट करीत असाल तर आम्ही कट करु देणार नाही. आमचा यास विरोध राहिल. आणि यामुळे प्रशासनाने स. नगरसेवकांना धमकी देण्याचा प्रयत्न करु नये. कदापी सहन होणार नाही.

श्री. बंडू प्रधान :- भडकेलगेट येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा जो काढून ठेवलेला होता व त्या ठिकाणी नविन बसविण्यात आलेला आहे, तो जूना पुतळा अतिशय चांगला असून एका मध्यवर्ती चौकात बसविण्याची कार्यवाही व्हावी.

श्री. नारायण फत्तेलष्कर :- बऱ्याच वेळेस स. सदस्यांच्या चूका लक्षात घेतल्या जातात. परंतू आपले एक कर्मचारी श्री. बेग हे डीपी रोडवर अनाधिकृत बांधकाम करतात. त्याबाबत प्रशासनाने अद्यापही काहीही केलेले नाही. बऱ्याच वेळेस मी स्वत: नगररचना विभागास सुचना केलेली होती आणि स्थायी समितीमध्ये सुध्दा प्रश्न उपस्थित केलेला होता. तरी ही कोणतीही कार्यवाही केलेली दिसून येत नाही. याचा अर्थ काय? त्याचप्रमाणे व्हिडीओ फिल्म बाबत स. सदस्यांना विचारात घेतले गेले नाही. अशा बाबत स्थायी समिती मार्फत चौकशी करुन निलंबांताची कार्यवाही द्यावी.

मा. महापौर :- नगररचनाकार यांना त्यांचे मुळ खात्यात परत का पाठविले नाही. याबाबतची माहीती द्यावी.

श्री. आलफखान :- सर्वसाधारण सभेमध्ये कोणताही प्रस्ताव मंजुर झालेला असल्यास तो प्रस्ताव शासनाकडे पाठविणे प्रशासनाचे काम आहे. परंतु तसे या ठिकाणी होत नाही. मागील दोन वर्षापासूनचा प्रस्ताव मंजूर झालेले आहे. उदा. धार्मिक स्थळांना टॅक्स माफीबाबत प्रस्ताव सर्वसाधरण सभेत मंजुर होऊनही प्रशासनाने शासनाकडे पाठविला नाही. याचा अर्थ काय? एकदा कोणताही प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे. आणि जर शासनाला वाटले की, काही त्रुटी असतील तर मंबुई प्रांतिक अधिनियम ४५१ अन्वये काही दुरुस्त्या प्रशासनाने करुन पुन्हा शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे. परंतू कोणताही प्रस्ताव पेडींग ठेवणे योग्य नाही.

मा. उप आयुक्त :- दि. २०/८/९२ रोजी सर्वसाधरण सभेने प्रस्ताव मंजूर केलेला होता. त्या अनुषंगाने निवेदन करण्यात येते की, सदरचे पद हे शासनाच्या आस्थापनेवर असल्याने शासनाने याबाबत एक पत्र पाठविलेले आहे. (ते पत्र वाचून दाखविले). शासनाच्या अखत्यारीतील डेपूटेशन वरील पद असल्याने याबाबत शासन पातळीवर निर्णय होतो. तशी संचिका नगररचना विभगाकडे आहे. आणि पुढे काय पत्रव्यवहार झाला त्याबाबत पुर्णपण माहिती नाही. परंतू प्रशासनाने असे ठरविले की, मनपा कर्मचाऱ्यामधून एक नगररचना कराचे पद निर्मिती करुन भरावे व ती संचिका मा. महापौर यांचेकडे पाठविली आहे व दुसरे एक पद शासनाकडील ते सुध्दा अस्तित्वात राहील असे दोन पद मनपाकडे राहतील.

श्री. प्रदिप जैस्वाल :- संबंधित अधिकाऱ्यांना त्यांच्या मुळ खात्यात परत पाठविणेबाबत सभागृहात एकमताने निर्णय झाल्यानंतर प्रशासनाने त्यांना परत का पाठविले नाही. मुंबई प्रांतिक अधिनियमात तशी तरतुद आहे की, उदा. समजा

आयुक्तांची कार्यपध्दती ठिक नसल्यास आणि सभागृहाने एकमताने त्यांच्या विरुध्द प्रस्ताव मंजूर केल्यास शासनाला सुध्दा आयुक्तांची बदली करणे भाग पडते. तेव्हा संबधित अधिकाऱ्यांना त्वरीत का पाठविले नाही असा प्रश्न उपस्थित होतो.

श्री. अजिज जहागिरदार :- सभगृहाने मंजूर केलेल्या प्रस्तांवांची अंमलबजावनी का होत नाही याचे कारण काय? याबाबत जो खुलासा करण्यात आला तो दिशाभूल करणारा आहे.

श्री. प्रदिप जैस्वाल :- गेल्या दोन महिन्यापासून संबंधित अधिकांऱ्यानां त्यांचे मुळ खात्यात परत पाठविणेबाबत प्रस्ताव मंजुर होऊनही पाठविले नाही. तर त्यांचा पगार कोन देणार हा प्रश्न उपस्थित होतो. याबाबत विधी सल्लगार यांचेकडून माहिती द्यावी.

श्री. चेनकरण संचेती :- यापुर्वीचे शहर अभियंता यांचे बाबतीत सुध्दा सभगृहाने त्यांना या कार्यालयातून मुक्त करणेसाठीचा प्रस्ताव मंजूर केलेला होतो. याचाच अर्थ असा होता की, संबंधिताचे काम समाधानकारक नाही.

श्री. प्रकाश जावळे :- लोकप्रतिनिधींनी घेतलेल्या निर्णायाची अंमलबजावणी प्रशासन करित नाही. ही दुर्देवी बाब आहे. तसेच प्रतिनियुक्तीवर जे कर्मचारी/अधिकारी येतात. त्यांची मुदत कधी संपते. त्यांना मुदतवाढ द्यावी किंवा नाही. त्यांचे पगाराबाबत काय धोरण असते. याबाबतची माहिती सभागृहाला द्यावी.

मा. उप आयुक्त :- प्रतिनियुक्तीवरील अधिकारी शासनाकडील असल्याने समजा श्री. नानोटी यांना परत पाठविले, तरी त्यांच्या जागी शासनाकडून दुसरा अधिकारी प्रतिनियुक्तीवर मागविणे आवश्यक राहील. म्हणजे हा अर्धवट ठराव पाठविणे योग्य नसून कमचाऱ्यांमधुन सदरचे पद भरणे प्रशासनाच्या नियमाबाहय होय.

श्री. प्रकाश जावळे, श्री. चेनकरण संचेनी :- दिलेली माहिती दिशाभूल करणारी आहे. याबाबत मा. आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा. महापौर :- ठीक आहे मा. आयुक्तांनी माहिती द्यावी.

मा आयुक्त :- प्रतिनियुक्तीवरील शासनाचे अधिकारी नगर रचनाकार हे शासनाचे अखत्यारीतील असून प्रतिनियुक्ती वरील अधिकारी यांना शासनाच्या मुळ खात्यात पाठवून कर्मचाऱ्यामधुन सदरचे पद भरणे असा प्रस्ताव मंजुर झालेला आहे. परंतु शासनाकडून प्रतिनियुक्तीवर असलेले नगररचना अधिकारी यांना जर परत पाठवावयाचे असल्यास त्यांचे जागी शासनाकडून प्रतिनियुक्तीवरील अधिकारीच मागविणे आवश्यक आहे. कर्मचाऱ्यामधून सदरचे पद भरता येणार नाही. ही मुख्य अडचण प्रशासनास आहे. यामध्ये बरेचसे कर्मचारी सुट्टीवर वेगैरे असतात. त्यामुळे या विभागातील कामे पेन्डींग पडण्याची शक्यता आहे.

श्री. प्रदिप जैस्वाल :- सभागृाने आजपर्यंन्तचे जे प्रस्ताव मंजुर केलेले आहेत ते सर्व प्रस्ताव शासनाकडे पाठविले का याची माहिती सभागृहात द्यावी.

श्री. अजिजुल्ला बेग :- नगररचनाकार हे शासनाकडील प्रतिनियुक्तीवरील असल्याने या पदाची मुदत संपली किंवा नाही किंवा मुदत वाढ देण्यात आली याची माहिती द्यावी.

श्री. गंगाधर गाडे:- महापालिकेकडे शासनाकडील प्रतिनियुक्तीवरील अधिकारी किती आहेत व त्यांची मुदतवाढ प्रत्येत वेळी घेतल्या जाते काय? आणि असे किती अधिकारी

प्रतिनियुक्तीचे मुदत संपुनही आहेत, याची माहिती द्यावी. तसेच शहर अभियंता यांचे स्लम भागातील नागरीकाचे अनेक तक्रारी आहेत त्यासाठी त्यांचेवर कार्यवाही करुन असे आश्वासन दिलेले होते. त्याबाबत काय झाले याची माहिती द्यावी.

मा. महापौर :- सदरचा वेळ स. सदस्यांना प्रश्नोत्तराचा वेळ म्हणून दिलेला होता. तरी ही ज्या स. सदस्यांनी विविध प्रश्न उपस्थित केले. त्या सर्व प्रश्नांची माहिती उदा. १ नगररचनाकार यांना त्यांचे मुळ खात्यात पाठविण्याबाबत काय झाले. २ मागील चार पाच महिन्यापूर्वी ब्रिजवाडी येथे गॅस्ट्रोने घडलेल्या मृत्यू प्रकरणी चौकशी.३ एका कर्मचाऱ्यांचे अनाधिकृत बांधकाम ४ स. सदस्य श्री. मधुकर शिंदे यांना मा. आयुक्तांनी दिलेली नोटीस नसून ते पत्र आहे. असे समजावे व स. सदस्याकडून काही चूक झाल्यास अधिकारी यांचेकडून पूर्ण चौकशी करुन नंतरच कार्यवाही व्हावी. पोलीसांकडे तक्रार करु नये. ५ आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना मा. आयुक्तांनी नगरविकास उपसचिव महाराष्ट्र शासन, यांना एका गाडीची व्यवस्था करणेस सुचित केले, असता त्यांचा आदेश धुडकारला. त्याबाबत सविस्तर चौकशीसह माहिती. ६ शहर अभियंता यांचे अखत्यारितील स्लम भागासाठीच्या योजने बाबत नागरीकांच्या तक्रारी या सर्वबाबत पुढील बैठकीत चौकशीसह माहिती सर्व स. सदस्याना देण्यात येतील.

श्री. महादेव सुर्यवंशी:- ब्रिजवाडी भागाचा प्रतिनिधीत्व करणारा मी नगरसेवक असून, मागील गॅस्ट्रोबाबत घडलेल्या घटनेबाबत प्रशासनाने चांगले काम केल्याने मी त्यांचे अभिनंदन केलेले आहे. मग आता पुन्हा चौकशी करण्याचे काय राहीले.

श्री. रतनकुमार पंडागळे:- मागील वेळेत मा. महापौर यांनी सभागृहात असा निर्णय दिलेला होता की, ब्रिजवाडी येथे गॅस्ट्रोने मृत्यूमुखी पडलेल्या घटने संदर्भात मा. आयुक्त चौकशी करुन माहिती देतील. त्याप्रमाणे अद्यापही माहिती का मिळाली नाही.

श्री. गंगाधर गाडे :- ब्रिजवाडी येथे मागे गॅस्ट्रोने जे चार व्यक्ती मृत्यूमुखी पडले. त्यांना प्रशासनाने अद्यापही आर्थिक मदत केलेली नाही. याचे कारण काय? आणि दारुचा कारखान्यामुळे दुषीत पाणी पाण्यामध्ये मिळते आणि आरोग्यास धोका होण्याचा संभव असतो. यासाठी कारखान्याचे परामेट जप्त का करण्यात आले नाही. म्हणजे आणखी किती व्यक्ती आपण मरण्याचे वाट पाहात आहेत. याबाबत त्वरीत कार्यवाही का होत नाही. जनतेच्या प्रश्नाकडे गांभिर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.

श्री. चंद्रकांत खैरे:- प्रदुषण मंडाळावर पदसिध्द सदस्य म्हणून मा. महापौर असतील तर याबाबत संबंधित कार्यालय प्रमूख्याशी चर्चा करुन निर्णय व्हावा.

श्री. गंगाधर गाडे:- गॅस्ट्रोने जे चार लोक मृत्यूमुखी पडले त्यांना आर्थिक मदत का दिली गेली नाही. याची माहिती द्यावी.

श्री. आलफखॉन:- शासकीय दुध डेअरी येथून दुर्गधींयुक्त पाणी नाली द्वारे वाहते. त्याबाबत नियमाप्रमाणे मनपाने सबंधितावर नोटीस बजावून कार्यवाही करावी.

मा. महापौर :- स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे शहरातील नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होईल. अशी कारखाने उदा. ब्रँडी, किंवा दुध डेअरी इ. कार्यालयास मनपाने नियमाप्रमाणे नोटीस देवून कार्यवाही करावी; तसेच आरोग्य वैद्यकिय

अधिकारी यांचे बाबतीत ज्या चौकश्या चालू आहेत त्या चौकश्यांची माहिती मा. आयुक्त यांचेकडून सर्व स. सदस्यांना सभागृहात उपलब्ध करुन दयावीत आणि ब्रिजवाडी येथे चार लोक गॅस्ट्रोने मृत्युमूखी पडलेत त्यांना मनपातर्फे आर्थिक मदत का देण्यात आली नाही.

श्री. बंडू प्रधान :- अन्न आणि भेसळ या कार्यालयातील अधिकारी वर्ग मनपातील आरोग्य विभागातील औषधांच्या साठयांची तपासणी करण्याकरिता आले असता आरोग्य अधिकारी यांनी त्या अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारची औषधी किंवा हॅलोजनच्या पुरवठया बाबत काहीही दाखविले नाही. या बाबतची माहिती मा. आयुक्तांना आहे. अशा प्रकारे झालेल्या एक्सपायरी औषधांचा पुरवठा केल्यास विषबाधा होऊन, अनेक लोक मृत्यूमुखी पडतील. तेव्हा याबाबतची मा. आयुक्तांनी चौकशी करुन माहिती द्यावी.

श्री. अजिज जहागिरदार:- आरेग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी माझे समक्ष वरील अधिकाऱ्यांबाबत वेडेवाकडे बोलले ते योग्य नाही.

श्री. चेनकरण संचेती:- मागील गॅस्ट्रोच्या घटनेबाबत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी ब्रिजवाडी या ठिकाणी गॅस्ट्रो झाला नाही. असे म्हटले तर गॅस्ट्रो झालेला आहे. असा नोटींगमध्ये उल्लेख केलेला आहे. कदाचित ती नोटीस काढुन टाकण्याची शक्यता आहे. परुंतू वेळ पडल्यास पुरावा मी सादर करीन आणि पुढील बैठकीपर्यंत याबाबत चौकशी करुन माहिती देण्यात येईल त्याबाबत अभिनंदन.

श्री. गंगाधर गाडे:- स. सदस्य श्री. बंडू प्रधान यांनी उपस्थित केलेल्या प्रश्ना संदर्भात आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी अन्न व भेसळ येथील तपासणी करण्यासाठी आलेल्या अधिका-यांना तपासणी करण्यासाठी औषधी दाखविले नाही. याबाबत मा. आयुक्तांनी खुलासा करावा. यामुळे नागरीकांवर प्राणघातक प्रकार एखादेवेळी आरोग्य विभगामार्फत होण्याची शक्यता आहे.

मा. महापौर:- याबाबत चौकशी करण्यात येईल.

श्री. रतनकुमार पंडागळे:- आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्याकडून त्यांचे पद काढून इतर अधिकाऱ्यांना चार्ज देण्याची कार्यवाही करावी. कारण त्यांचेवर गंभीर आरोप आहे.

श्री. बंडू प्रधान:- एक्सपायरी तारखेच्या गोळया जर आपण मनपाच्या दवखान्यांतून वाटप करीत असाल तर, गोरगरीबांचे बळी घेत आहात.

श्री. प्रदिप जैस्वाल:- इतर अधिकाऱ्यांकडे चार्ज देणे योग्य नाही. नियमाप्रमाणे चौकशी करावी.

श्री. प्रकाश जावळे:- शहरातील नागरीकांच्या दृष्टीने अत्यंत गंभीर प्रश्न असून आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी मुदत संपलेल्या गोळयांचे वाटप दवाखान्यातून करुन नागरीकांचे जीवन धोक्यात आणत आहेत. यासाठी त्यांचेवर आपण जर त्वरीत कार्यवाही नाही केली तर, अप्रत्यक्षपणे सभागृह जबाबदार राहणार आहे. यासाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना सक्तीने रजेवर पाठविण्याची कार्यवाही व्हावी.

श्री. प्रदिप जैस्वाल:- स. सदस्यायंनी सुचित केल्याप्रमाणे आरेग्य केंद्रातील औषधांची मुदत संपलेली आहे. तर याबाबत माझी मा महापौरांनी विनंती आहे की, आताच्या

आता सभा संपवावी. व सर्वच्या सर्व आरोग्य केंद्रांना भेटी देऊन पाहणी करावी.

श्री. प्रकाश जावळे:- संबंधित आरोग्य केंद्रांना स. सदस्यांनी भेटी देवून काहीही अपयोग नाही. तर अन्न व भेसळ कार्यालयातील अधिकारी हे उपस्थित असणे आवश्यक आहे. दवाखान्याचा लाभ केवळ झोपडपट्टी येथील गरीब लोकच घेतात.

श्री. अजिज जहागिरदार:- आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या चौकशी मध्ये अडथळे आणण्याचे काम स. सदस्य श्री. प्रदिप जैस्वाल करीत आहेत. हे योग्य नाही.

श्री. गंगाधर गाडे, श्री मोतीराम घडामोडे :- चौकशी करण्यापूर्वी संबंधित आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना निलंबीत करावे किंवा सक्तीच्या रजेवर पाठवावे.

श्री. तकीहसन खान:- जर चौकशी करावयाचे असल्यास आताच दोन/तीन स. सदस्य यांनी आरोग्य केंद्रात जावून गोळयांचे बॉक्स आणून तपासणी करावी व योग्य तो निर्णय घ्यावा चर्चा करण्यात काहीच अर्थ नाही.

मा. महापौर:- यापूर्वी सुचित केल्याप्रमाणे याबाबत मा. आयुक्त चौकशी करतील.

श्री. प्रकाश जावळे:- सभागृहाच्या भावना लक्षात घेता मा. आयुक्तांनी त्यांचे मत मांडावे.

श्री गंगाधर गाडे:- अशा गंभीर प्रश्नावरुन आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना २/३ महिन्यांच्या सक्तीने रजेवर पाठविण्यात यावे.

मा. महापौर:- तसे करणे शक्य नाही. चौकशी करण्यात येईल. (यावेळी सभागृहात स. सदस्यामध्ये जोरजोरात बोलने चालू असते. काहीही ऐकू येत नाही.)

श्री. प्रकाश जावळे:- सभागृहाच्या भावना लक्षात घेता आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना तिन महिन्याच्या सक्तीच्या रजेवर पाठविण्याचा निर्णय आज द्यावा. अन्यथा सभागृहात आपल्या समोर बैठा सत्यागृह करीन. (यावेळी स. सदस्य श्री. प्रकाश जावळे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना सक्तीने रजेवर जाणे संर्दभात निर्णय व्हावा ). यासाठी मा. महापौरा समोर बैठा सत्यागृहास बसतात. (अंदाजे वेळ १.०५ वाजता) (यावेळी पुन्हा स. सदस्यामध्ये जोरजोरात बोलण्याचा आवाज येतो काही ऐकू येत नाही.) (पुन्हा स. सदस्य १.०८ वाजता जागेवरुन उठतात.)

श्री. गंगाधर गाडे , श्री रतनकुमार पंडागळे, श्री बंडू प्रधान:- शहराच्या नागरीकांच्या दृष्टीने अत्यंत गंभीर प्रश्न असून संबंधित अधिकाऱ्यांना सक्तीने रजेवर पाठविण्याचा सभागृहात निर्णय व्हावा.

मा. महापौर:- तसे करता येणार नाही. मा आयुक्तामार्फत चौकशी करण्यात येईल.

श्री. प्रदिप जैस्वाल:- तसे जर असल्यास सभागृहात पोल घ्यावी. (यावेळी सभागृहात स. सदस्य एकमेकात सारखे बोलतात. काहीही ऐकू येत नाही.)

मा. महापौर:- आता जास्त वेळ याबाबत चर्चा न करता मा. आयुक्तामार्फत चौकशी करण्यात येईल. आता व्हिडीओ फिल्म बाबत प्रश्न विचारावे.

श्री. प्रदिप जैस्वाल:- मनपाच्या विकासात्मक जरी प्रश्न असला आणि पॉलिसी मॅटरचा प्रश्न असल्यास त्यास सभागृहाची मान्यता घेणे आवश्यक आहे. कारण व्हिडीओ फिल्म बाबत रु ९९,७००/-जो खर्च करण्यात आला तो सभागृहाच्या संमती शिवाय खर्च करणे योग्य नाही. याबाबत सभागृहात माहीती द्यावी.

श्री. नारायण फत्तेलष्कर:- या व्हिडीओ फिल्म बाबत आमचा विरोध असून, याची चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात यावे. अन्यथा मी सभागृहात बैठा सत्याग्रह करण्यास बसतो. (यावेळी अंदाजे १.१५ वाजता स. सदस्य श्री. फत्तेलष्कर बैठा सत्याग्रह करण्यास बसतात.)

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय:- स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे प्रकल्प विभागामार्फत ज्या व्हिडीओ फिल्म तयार केली. त्यासाी प्रभागवाईज माहिती घेणे आवश्यक होते आणि माजी महापौरांच्या काराकिर्दीत काय झाले याची माहिती घेणे आवश्यक होती. त्यांनाही विचारणा केली नाही. तर बऱ्याचशा स. सदस्यांना विचारात घेतले नाही.

श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. पांडूरंग पैठणकर:- कोणत्याही स. सदस्यांना व्हिडीओ फिल्म बाबत विश्वासात घेतले नाही.

श्री. मधुकर शिंदे:- स्विमींग पुल बाबत चौकशी करावी.

श्री. प्रदिप जैस्वाल:- व्हिडीओ फिल्म बाबतचा प्रस्ताव पॉलीसी मॅटरचा असल्याने सभागृहाला समोर विषय चर्चेस येणे आवश्यक होते.

श्री. पांडूरंग पैठणकर:- चित्रीकरण करण्याचा उद्देश काय आणि कोणत्या ठिकाणी ते दाखविण्यात येणार.

श्री. राशिद मामू:- स्थायी समितीच्या स. सदस्यांनी याबाबत मंजुरी दिलेली नसल्यास त्यांनी राजीनामे द्यावेत. कारण सर्व स. सदस्याचा विश्वासघात झालेला आहे.

श्री. अजिजुल्ला बेग:- सदरील खर्चास मंजुरी मिळालेली आहे काय?

मा. महापौर:- मा. आयुक्तांच्या मंजुरीने खर्चास मान्यता मिळालेली आहे आणि करण्यात आलेले चित्रीकरण हे महानगरपालिकेतील केलेल्या कामांची माहिती (रेकॉर्ड) म्हणून या चित्रीकरणात दिसणार आहे.

श्री. नारायण फत्तेलष्कर, श्री. गिरजाराम हाळनोर:- स्थायी समितीमध्ये उप आयुक्त यांनी चित्रीकरण झाल्यानंतर प्रत्येक वार्डात दाखविण्यात येईल असे सांगितले त्याबाबत काय?

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :- जर वार्डावार्डात दाखवावयाचे नसल्यास इतका पैसा खर्च करण्याची आवश्यकता काय? यावर स्थगिती द्यावी आणि सर्व स. सदस्यांना विश्वासात घेणे आवश्यक आहे.

श्री. रशिद मामू, श्री. चिनकरण संचेती:- व्हिडीओ फिल्मवर इतका पैसा खर्च करण योग्य नाही. यापेक्षा कॅसेट बाजारातून विकत घेवून रु. १०,०००/- त सर्व चित्रीकरण आले असते.

मा महापौर :- आपणास सुचित करण्यात येते की, सर्व स. सदस्याच्या भावना लक्षात घेता प्रत्येक वार्डातील स. सदस्याच्या कामाची माहिती संबंधित व्हिडीओ मध्ये घेवून सदस्यांना समावून घेत नाहीत, तोपर्यन्त सदरचे करण्यात आलेले चित्रीकरणास (व्हीडीओ फिल्म) स्थगिती देण्यात येते.

**विषय क्र. ८७/१ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५८ (३०) अन्वये हातगाडयांना परवाने देणे व परवाने न घेता फिरणाऱ्या हातगाडया विषयी औरंगाबाद

महानगरपालिकेस आवश्यक वाटल्यावरुन उपविधी तयार करण्यात आले असुन, त्याबाबतचा प्ररुप उप विधीचा मसुदा सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

## *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५८ (३०) अन्वये हातगाडयांना परवाने देणे व परवाने न घेता फिरण्याऱ्या हातगाडयास ताब्यात घेण्या विषयीचे उपविधी:-

**१) उप विधीचे संक्षिप्त नांव :-**

या उपविधींना औ,बाद महानगरपालिकेच्या हद्दीत फिरणाऱ्या हातगाडयांना परवाना देण्यासंबंधीचे उपविधी म्हणून संबोधले जाईल व शासकीय रजापत्रात अंतिम प्रसिध्दी झाल्याचे तारखे पासून अंमलात येईल.

**२) व्याख्या:-**

जर या उपविधीतील संर्दभाला बाधा येत नसेल तर

अ) अधिनियम म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९.

ब) परवाना देणारा अधिकारी म्हणजे आयुक्त किंवा त्यांनी अधिकृत केलेला महानगरपालिकेचा कोणताही अधिकारी.

क) हातगाडी म्हणजे जी सहजगत्या एक जागेवरुन दुसऱ्या जागेवर हलू शकते, त्यात दोन चाकी, तीन चाकी, चार चाकी, गाडीचा समावेश असेल.

ड) कलम म्हणजे महानगरपालिका अधिनियमाचे कलम ज्या शब्दांची व्याख्या केली पण, ते या उपविधीमध्ये वापरले असतील त्यांना अधिनियमामध्ये जो अर्थ अभिप्रेत असेल तोच अर्थ समजण्यात यावा.

**३) परवाना शिवाय महानगरपालिकेच्या हद्दीत हातगाडी फिरणार नाही :-**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत कोणीही परवाना घेतल्या शिवाय त्याच्या मालाच्या विक्री करीता, मालाची ने-आण करण्याकरीता हातगाडीचा वापर करण्यार नाही.

**४) परवान्याचे प्रकार:-**

१) हातागाडीचे परवाने खालील तीन प्रकारच्या हातगाडया करीता राहतील:-

अ) फिरणाऱ्या हातगाडया

ब) न फिरणाऱ्या हातगाडया

क) फिरणाऱ्या आणि न फिरणाऱ्या हातगाडया

२) न फिरणाऱ्या हातगाडयांना परवाना त्या राहात असतील, त्या भागापुरत्याच मर्यादित राहील. व तो भाग परवान्यामध्ये स्पष्ट नमुद केला जाईल. जर त्यात बदल पाहिजे असेल तर महानगरपालिकेच्या परवानगीनेच बदल करण्यात यावा.

३) परवाना फिरणाऱ्या व स्थिर अशा दोन्ही हातगाडयाकरीता असेल तर, तसा संयुक्त परवाना या उपविधीतील तरतूदींना अनुसरुन देण्यात येईल.

**५) अर्ज करण्याची पध्दत:-**

१) हातगाडी वापरणाऱ्या प्रत्येक इसमाने परवान्या करिता महानगरपालिकमध्ये विहीत नमूण्यामध्ये अर्ज करावा. वरील नमुना अर्ज महानगरपालिकेमध्ये उपलब्ध होतील व त्या करीता कलम ३८६ प्रमाणे सक्षम समितीच्या मंजुरीने समिती वेळोवेळी ठरवून देईल तेवढे शुल्क भरावे लागेल. सदर अर्जात परवाना घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवाराने आपणांस कोणत्या भागातून फिरावे लागेल याची माहिती भरुन द्यावी.

(१) हातगाडयांना परवाना देताच संबंधित हातगाडी मालकाचा फोटो परवान्यावर लावण्यात यावा.

(२) स्थिर हातगाडयांना परवानाधारकाने रहदारीत अडथळा येऊ नये. यासाठी वाहतूक नियंत्रण विभागाचे प्रमाणपत्र आणणे आवश्यक आहे.

(३) जर आवश्यकता भासेल तर अर्जदार आपली हातगाडी महानगरपालिका सुचित करेल त्या अधिकाऱ्यांना तपासणीसाठी दाखवतील.

**६) <u>परवाना कोणत्या कारणाकरिता देण्यात येईल</u>:-**

या उपविधीद्वारे देण्यात येणारा परवाना, देतांना परवाना देणाऱ्या अधिकाऱ्याने खालील मुद्दयाची खातरजमा करुन, मगच परवाना द्यावा.

अ) हातगाडीवर लावण्यात येणारा बोर्ड, अगर सामान ठेवण्याकरिता केलेली जागा दीड मीटर पेक्षा जास्त लांब नसावी व एक मीटरपेक्षा उंच नसावी.

ब) जर हातगाडीवर गोड पदार्थ, मिठाई, आईसफ्रूट, आईस कँडी, फळ फळावळ, शितपेये तयार करण्याचे पदार्थ आदी विक्री करीता ठेवावयाचे असतील तर, हातगाडीचा वरचा भाग धुळ, माशा व इतर संसर्गाईपासून वाचविण्यासाठी बारीक जाळी किंवा काच यांनी झाकलेली असली पाहिजे.

क) तसेच अन्न पदार्थ व पेय जर हातगाडीवर विकण्यास ठेवली असतील तर, भांडी, कपबशा, प्लेटस, चमचे व इतर साहित्य विसळण्याकरिता गाडीवर कमीत कमी २० लिटर क्षमतेची तोटी असलेली टाकी असली पाहिजे.

**७) <u>हातगाडी फिरवण्यावर बांधणे</u>:-**

महानगरपालिका वेळोवेळी जाहीर सुचना देऊन महानगरपालिका हद्दीतील कोणताही भाग, सार्वजनिक रस्ता व ठिकाण विविक्षित कालापर्यंन्त हातगाडयांना विक्री करण्याकरिता बंद करु शकेल.

**८) <u>परवानाधारकांनी पाळावयाच्या शर्ती</u>:-**

१) जर परवानाधारकांना मालाची विक्री करण्याकरिता हातगाडी वापरावयाची असेल तर:-

अ) परवान्यामध्ये नमुद केलेल्या कालावधी व्यतिरिक्त परवानाधारक हातगाडी बसवणार नाहीत.

ब) परवान्यात नमूद केलेल्या ठिकाणीच परवानाधारक हातगाडी थांबवून धंदा करतील. (ज्या हातगाडयांना विपीक्षेत ठिकाणांचाच परवाना दिला असेल त्यांच्या करीताच ही शर्त लागू होईल.)

क) परवानाधारक हातगाडीवर माल ठेवतांना हातगाडीच्या बाहेर माल येत नाही व हातगाडी मध्ये मर्यादेपेक्षा जास्त भरला जात नाही. याची काळजी घेतील.

ड) परवानामध्ये नमुद केलेल्या माला व्यतिरिक्त दुसरा माल हातगाडी मध्ये भरणार नाहीत.

इ) परवानाधारक आपली हातगाडी नेहमी स्वच्छा ठेवतील व विशेषत: अन्न किंवा खाण्याच्या पदार्थावर धुळ, माशा व अन्य संर्सगजन्य गोष्टी बसू देणार नाहीत.

फ) अधिकृत अधिकाऱ्याने मानताच परवानाधारक त्यांनी माल (अन्न व पेय इ.) कोठून खरेदी केले. याचा पत्ता पुरवतील.

ग) गाडीवर ठेवलेली पेय वा अन्न पदार्थाला शक्यतो हात लावणार नाही.

आय) खाण्याकरिता वापरावयाच्या बशा, प्लेटस, कप, ग्लासेस, चमचे, काटे
आदी उपकरणे नेहमी स्वच्छ राहतील याची काळजी घेतील तसेच ही
उपकरणे धुण्याकरिता पुरेशा पाण्याची व्यवस्था हातगाडीवरच करतील.

जे) खाण्याकरिता वापरावयाच्या बशा प्लेटी, कप, ग्लासेस, प्याले, चमचे आदी उपकरणे बादली मध्ये वा टब मध्ये त्याच पाण्यात धुणार नाहीत.

के) हातगाडयावर ठेवण्यात आलेल्या पितळी भांडयाना महिन्यातून एकदा कलाई करणे आवश्यक आहे. तसेच अधिकाऱ्यांनी सुचना दिल्या बरोबर त्वरीत कल्हाई लावून घेतील.

एल) परवानाधारक संर्सगजन्य वा अन्य गंभीर रोगाने आजारी असतील, त्या काळात धंदा चालू ठेवणार नाहीत.

एम) तसेच परवानाधाराकांनी नोकर ठेवला असल्यास व तो गंभीर रोगी का संसर्गजन्य रोगाने आजारी असेल तर परवानाधारक त्या काळात त्यास धंदा करु देणार नाही.

एन) जेव्हा आवश्यकता वाटेल तेव्हा अधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्यांना वा आरोग्य अधिकाऱ्यांना परवानाधारक स्वत:ची तसेच त्यांनी ठेवलेल्या नोकरवर्गाची वैद्यकीय तपासणी करुन देतील.

ओ) ज्या परवानाधारकांना फिरत्या गाडीचे परवाने मिळाले असतील त्यांनी आपल्या हातगाडया फिरत्या ठेवाव्यात, रस्त्यावर, सार्वजनिक ठिकाणी वाहतूकीस अडथळा वा जनतेस गैरसोय होईल किंवा धोका पोहोचेल अशा तऱ्हेने गाडया उभ्या करु नयेत.

पी) हातगाडीला जनतेचे वा ग्राहाकांचे लक्ष आकर्षित होईल अशी घंटी किंवा हार्न लावू नयेत.

क्यू) शाळा व बाजारापासून १८० मीटर्स पर्यन्त परवानाधारकाने कोणताही धंदा हातगाडीवर करु नये.

आ) स्थीर हातगाडयांना परवाना देतांना या हातगाडयामुळे रहदारीस अडथळा येऊ नये. यासाठी वाहतूक नियंत्रण विभागाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

२) वर नमुद केलेल्या शर्त क्र. (फ) मधील ज्या ठिकाणी अन्न पदार्थ तयार होता ती जागा नापासाअंती आरोग्यास अपायकारक असल्याने आढळले तर परवाना देणारे अधिकारी त्या ठिकाणाहून परवाना धारकाने विकत घेतलेले खादय पदार्थ पेय यांच्या विक्रीवर बंदी घालू शकतील व तशा आदेश परवानाधारकावर बंधनकारक राहील.

परंतू या निर्णयावर परवानाधारक आयुक्ताकडे निर्णयाकरिता (अपीलाकरीता) अर्ज करु शकेल. आयुक्त यांचा निकाल या संबंधात अखेरचा निर्णय म्हणून समजण्यात येईल.

**९) <u>हातगाडी जर मालवाहतूकीसाठीच वापरण्यात येत असेल तर त्या संबंधिच्या शर्ती:-</u>**

१) खाली नमुद केलेल्या मर्यादपेक्षा जास्त वजनाचा माल हातगाडीवर परवानाधारक घेऊन जाणार नाहीत.
अ) एका माणसाची ओढावयाची हातगाडी  १५० किलोवजन
ब) एका पेक्षा अधिक माणसे (माणसी)  १५० किलोवजन

२) हातगाडीवरुन वाहून नेण्यात आलेले दगड, विटा, माती, फरशा, कोळसा अथवा अन्य रस्ता वापरासाठी लागणारे सामानापैकी काहीही माल रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी गाडीतून पडणार नाही याची परवानाधारकाने काळजी घेतील.

३) परवानाधारकांनी त्याच्या हातगाडीमध्ये अपघात झाल्यास जखमी इसमास वैद्यकीय उपचार त्वरीत करावेत व अपघातांची वर्दी नजीकच्या पोलीस स्टेशनावर द्यावी.

४) रस्त्यामध्ये वा सार्वजनिक ठिकाणी परवानाधारक आपली हातगाडी उभी करु देणार नाहीत. जर गाडी माल उतरावयाचा असेल किंवा चढवावयाचा असेल, तर सामान्यपणे अशा कामाला जेवढा वेळ आवश्यक आहे, तेवढाच वेळ गाडी रस्त्यात व सार्वजनिक ठिकाणी उभी करतील.

५) जर परवानाधारकांनी त्यांची हातगाडी सामान उतरवण्याकरिता अथवा चढवण्याकरिता वेळ असल्यामुळे थांबवली असेल, तर हातगाडी रस्त्याच्या समांतर दिशेला लावून ठेवावी.

६) सुर्यास्ता नंतर अर्धा तासानंतर व सुर्योदयाच्या अर्धा तास आधी परवानाधारकांनी रस्त्यावर गाडी लावू नये, तर चालवावयाची असेल तर त्याला दिवाबत्तीची सोय केल्याशिवाये चालवू नये.

१०) परवानाधारकांच्या गैरहजेरीत परवानाधारकांनी नेमलेला नोकर किंवा नेमलेले नोकर हे परवान्यातील सर्व शर्ती करीता जबाबदार राहतील.

११) (१) परवान्याचा नमुना अधिकृत अधिकारी वेळोवेळी ठरवतील त्यानुसार परवान्यामध्ये खालील गोष्टीचां खुलासा निंसदिग्धपणे करण्यात यावा.

अ) परवाना धारकाचे नाव व पुर्ण पत्ता.
ब) गाडीतून वाहुन नेण्यात येणाऱ्या मालाचा तपशील
क) धंद्याकरीता हातगाडी वारण्याची सर्वसाधारण वेळ
ड) जर हातगाडी फिरती असेल तर कोणत्या भागात फिरणार त्याचा तपशील.
इ) जर हातगाडी विविध ठिकाणी स्थिर ठेवून धंदा करण्यात येत असेल तर त्या ठिकाणचा संपूर्ण पत्ता.

वर "इ" मध्ये नमुद केलेल्या भागाकरीता उपविधी ४ (२) आधिन महानगरपालिकेची पुर्व परवानगी आवश्यक आहे.

१) प्रत्येक हातगाडीला महानगरपालिका नंबर (बिल्ला) देईल व अशी नंबरप्लेट प्रत्येक हातगाडीला लावणे आवश्यक आहे. वरील नंबर प्लेट ही अहस्तांतरणीय आहे व त्याचा गैर उपयोग झाल्यास परवाना रद्द करण्याचा अधिकार अधिकृत अधिकाऱ्यांना राहतील.

२) अधिकृत अधिकारी, परवानाधारकांना हातगाडी बरोबर असणाऱ्या नोकरा करिता एक पास देतील, वरल पास मध्ये हातगाडीचा नंबर व लायसेन्स नंबर वाहून नेणाऱ्या मालाचा तपशील देण्यात यावा.

**१२) परवान्याची मुदत:-**

१) परवान्याची मुदत एक वर्षाची राहील व ही ३१ मार्च रोजी संपेल.

२) परवान्याच्या नुतणीकरणासाठी प्रत्येक वर्षाच्या एक मार्चपूर्वी अर्ज करावेत.

१३) हातगाडीचा परवाना, मालक नेहमी स्वत: बरोबर ठेवतील, जर नोकर गाडी चालवत असेल तर त्याचे बरोबर महानगरपालिकेने दिलेला पास नेहमी असावयास पाहिजे. वरील परवाना अगर पास अधिकृत अधिकारी मागतील तेव्हा त्यांना दाखविण्यात आला पाहिजे. तसेच अधिकृत अधिकाऱ्यांनी मागणी करताच हातगाडीतल्या मालाचा त्यांना संपूर्णपणे तपासणी करु देतील.

**१४) परवाना रद्द करणे:-**

वरील उपविधीच्या कोणत्याही शर्तीच्या भागाबद्दल अधिकृत अधिकारी परवाना रद्द करु शकतील.

**१५) परवाना तात्पूरता स्थगीत करणे:-**

खाली नमूद केलेल्या अटींचा भंग झाल्यास अधिकृत परवाना विविक्षीत काळापूरता स्थगीत करतील.

अ) उपविधी शर्तीचा वरचेवर केलेला भंग.

ब) अधिकृत अधिकाऱ्यांच्या मताने परवानाधारकांना परवाना न देण्याजोगी परिस्थिती उदभवल्यास, त्याची कारणे अधिकृत अधिकाऱ्याने द्यावीत.

**१६) अपील:-**

वरील उपविधी १४ व १५ च्या अनुसार केलेल्या कार्यवाही बद्दल परवानाधारक आयुक्ताकडे अपील करु शकतील व मा. आयुक्त यांचा या संबंधातील निर्णय अखेरचा व बंधनकारक राहील.

**१७) परवान्याचे हस्तांतरण:-**

परवाना अहस्तांतरणीय आहे, परंतू जर परवानाधारकांचा अकाली मृत्यू झाल्यास किंवा परवानाधारक शारीरीकदृष्टया धंदा करावयास कार्यक्षम नसेल तर अधिकृत अधिकारी परवानाधाराकांकडून अर्ज घेऊन परवाना हस्तांतर करु शकेल.

१) परवानाधारकांच्या मृत्यू नंतर परवाना त्यांचे वारसाकडे जर त्यांनी अर्ज केला तर होऊ शकेल.

२) जर परवानाधारक शारीरीकदृष्टया अपात्र असेल तर परवानाधारकांच्या घरातील परवानाधरकाने नेमून दिलेला कोणीही व्यक्ती.

उपविधी ५ अन्वये वापरात असलेली हातगाडी बदलून नविन गाडी घेतांना नवीन परवाना घेतांना जी कार्यवाही करण्यात येते तीच कार्यवाही करण्यात यावी.

**१८) <u>परवाना नसलेल्या हातगाडयांचा ताबा</u>:-**

आयुक्तांनी अधिकार दिलेला कोणताही अधिकारी परवाना नसलेली हातगाडी तपासणीत आढळली असता जप्त करु शकेल.

अ) खुलासा:-

वरील नियमांच्या पूर्तीसाठी हातगाडयांना नंबरप्लेट (बिल्ला) लावला नसेल तर सदर हातगाडी बिगर परवाना समजण्यात येईल. तसेच मागणी केल्यानंतर संबंधित इसम परवाना वा पास दाखवू शकत नसेल तर सदर हातगाडी बिगर परवाना समजण्यात येईल.

ब) अशी जप्त केलेली हातगाडी परवानाधारकाने ७२ तासांच्या आत स्वत: परत घेऊन जावी, परंतू

अ) त्यांनी अशा जप्त केलेल्या हातगाडीची तपशील अधिकृत अधिकारी ठरवतील.

ब) परवाना किंवा पास आणून दाखविल्यास

क) सदर हातगाडी बिगर परवाना चालवणार नाही अशी लेखी हमी देत असल्यास वर "ब" मध्ये नमुद केलेली कार्यवाही जर परवानाधारकाने केली नाही, तर हातगाडी व हातगाडी वरील मालाचा अधिकृत अधिकारी लिलाव पुकारतील व मिळालेली रक्कम महानगरपालिकेचा खर्च वजा जाऊन उर्वरीत रक्कम तीन महिन्या पर्यंन्त परवानाधारकाकडून काही कार्यवाही न झाल्यास महानगरपालिका निधीत जमा करतील.

परंतू, हातगाडीवरील माल जर नाशवंत असेल तर अधिकृत अधिकारी ७२ तासात लिलाव करुन रक्कम महानगरपालिकेच्या निधीत जमा करतील.

असे जरी असेल तरी उपविधीचा भंग केल्याबद्दल योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्याचा आयुक्तांचा अधिकार अबाधीत राहील.

जप्त केलेल्या, ताब्यात ठेवलेल्या कालावधीच्या गाडया बद्दल व हातगाडीच्या लिलावा बद्दल अधिकृत अधिकारी प्रत्येत प्रकरणात स्थायी समितीची मंजुरी घेईल.

वरील हातगाडीच्या जप्ती मध्ये हातगाडी ताब्यात ठेवण्याच्या कालावधी मध्ये अगर हातगाडीतील मालाच्या नुकसानी बद्दल महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

## <u>औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.</u>

## <u>नमूना "ब"</u>

## <u>प र वा ना</u>

परवाना क्र. ३१ मार्च, १९ पर्यंन्त

औरंगाबाद महानगरपालिका खालील
हातगाडीधारकांना संस्थेला मुंबई प्रांतिक
महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या
कलम ४५८ (३०) अन्वये १ एप्रिल १९----- ते ३१ मार्च १९------

**फोटो**

च्या मुदतीचा परवाना देती येईल. हा परवाना दि. ३१/३/१९--- पर्यन्त अंमलात राहील. महानगरपालिकेने केलेल्या उपविधीच्या कोणत्याही उपविधीचा भंग झाल्यास सदर परवाना रद्द होईल.

१) परवानाधारकाचे नाव व संपूर्ण पत्ता--------------------------

२) हातगाडीतील वाहून नेण्यात येणाऱ्या मालाचा तपशील.

३) धंदयासाठी हातगाडी वापरावयाची सर्वसाधारण वेळ------

४) जर हातगाडी फिरती राहणार असेल तर कोणत्या भागात राहणार त्याचा तपशील

५) जर हातगाडी एका ठिकाणी थांबवून धंदा करणार असेल तर त्याचा तपशील----

६) परवानाधारकाने नेमलेल्या नोकराचे संपूर्ण नांव, पत्ता

७) परवानाधारकाची सही-----------

८) परवान्याचे नुतणीकरण खालीलप्रमाणे केलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | ३१ मार्च १९ | सही |
| २. | ३१ मार्च १९ | सही |
| ३. | ३१ मार्च १९ | सही |
| ४. | ३१ मार्च १९ | सही |
| ५. | ३१ मार्च १९ | सही |

९) सदर परवानाधारकाजवळ नेहमी करता ठेवण्यात यावा व अधिकृत अधिकाऱ्यांने मागितला असता तो दाखविण्यात यावा.

१०) जर धंदामध्ये बंद झाला असेल तर परवाना महानगरपालिकेकडे परत करावा तसेच नुतणीकरणाचे वेळी व परवाना रद्द करण्याचे वेळेस सदर परवाना महानगरपालिकेकडे योग्य त्या कार्यवाहीस्तव परत करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| | परवाना फी जमा | रसीद नं. | तारीख |
| १. | नुतणीकरण | रसीद न. | तारीख |
| २. | नुतणीकरण | रसीद न. | तारीख |
| ३. | नुतणीकरण | रसीद न. | तारीख |
| ४. | नुतणीकरण | रसीद न. | तारीख |
| ५. | नुतणीकरण | रसीद न. | तारीख |

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
मा. महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

**ठराव क्र. ८७/१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५८ (३०) अन्वये हातगाडीवाल्यांना परवाने देणे व परवाने न घेता फिरणाऱ्या हातगाडया विषयी औरंगाबाद महानगरपालिकेने उपविधी तयार केले असून, सोबतच्या प्रारुप नियमाच्या मसुदयास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८८/२:-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५८ (४८) अन्वये डुकरे पालन विषयी औरंगाबाद महानगरपालिकेस आवश्यक वाटल्यावरुन उपविधी तयार करण्यात आले असून, त्या बाबतचा प्रारुप उपविधीचा मसुदा सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**<u>औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.</u>**

मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५८(४८) अन्वये डुकर पालना विषयी उपविधी:-

**१) <u>संक्षिप्त नांव व प्रारंभ</u>:-**

अ) हया उपविधीस " औरंगाबाद शहराच्या महानगरपालिकेचे सुकर पालना विषयीचे उपविधी" असे म्हणता येईल.

ब) ते शासकीय राजपत्रात संपूर्ण तथा प्रकाशित झाल्याच्या दिनांकापासुन अंमलात येतील.

**२) <u>व्याख्या</u>:-**

अ) विषय व संदर्भानुसार इतर अर्थाचे असेल ते खेरीज करुन,

ब) अधिनियम म्हणजे मुंबई प्रांतीक महानगरपालका अधिनियम १९४९

क) "अनुज्ञापक प्राधिकरण" म्हणजे आयुक्ताने हया बाबतीत प्रधिकृत केलेला कोणताही महानगरपालिका अधिकारी.

ड) "कलम" म्हणजे या अधिनियमाचे कलम या मध्ये वापरलेले व व्याख्या व केलेल्या शब्द प्रयोगांना अधिनियमामध्ये अनुक्रमे नेमून दिलेले अर्थ असतील.

**३) <u>सुकर पालना करिता अनुज्ञाप्ती</u>:-**

कोणतीही व्यक्ती औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत महानगरपालिका आयुक्तांच्या अनुज्ञाप्ती शिवाय डुकरे पाळणार नाही.

**४) <u>अनुज्ञाप्ती करिता कार्यपध्दती:-</u>**

डुकरे पाळण्याची इच्छा असलेली व्यक्ती सुकर पालनाच्या अनुज्ञाप्ती करिता पालिका आयुक्तांकडे लेखी अर्ज करील.

अर्जदार अर्जामध्ये जेथे तो डुकरे ठेऊ इच्छितो ती जागा, त्या जागेचे क्षेत्रफळ व हद्दी व ती जागा ज्या क्षेत्रात येते ते क्षेत्र व त्या क्षेत्राचा तपशील अर्जामध्ये नमुद करील.

कोणतीही व्यक्ती निवासी क्षेत्रात १५ हुन अधिक डुकरे ठेवणार नाही.

**५) <u>डुकरे बंदीस्त शेडमध्ये ठेवण्याबाबत</u>:-**

डुकरे बंद छपरी मध्ये ठेवली जातील. डुकरे डासांच्या उपद्रवापासून मुक्त राहतील अशा रीतीने छप्पर बांधण्यात यावे.

**६) <u>मलमुत्राची विल्हेवाट</u>:-**

डुकारांच्या मलमुत्राच्या विल्हेवाटीची योग्य व्यवस्था असली पाहिजे. डुकरांची जागा महापालिकेच्या कायम स्वरुपाच्या जलनि:सारणाच्या गटारीशी जोडलेली असली पाहिजे.

डुकरांच्या मलमुत्राची नियमितपणे विल्हेवाट लावली जाईल व ते साठवून ठेवण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

**७) मोकाट डुकरे:-**

अ) डुकरांना मोकळे सोडण्यात येणार नाही व त्यांना मोकाट फिरु दिले जाणार नाही.

ब) कोणतीही डुकरे महानगरपालिका हद्दीत मोकाट फिरतांना आढळली तर ती महापालिकेकडून पकडली जातील व नष्ट केली जातील आणि अशा रीतीने नष्ट करण्यात आलेल्या डुकराबद्दल कोणतीही नुकसान भरपाई दिली जाणार नाही.

**८) डुकरांच्या जागेची व्यवस्था:-**

डुकराचा प्रभारी असलेली व्यक्तीही डुकारांची व त्याच्या सभोवतालची जागा सार्वजनिक आरोग्य व सफाईच्या दृष्टीने स्वच्छ व आरोग्यकारक स्थितीत ठेवली.

वारंवार कीटकनांशकांचा वापर करुन डुकरांची जागा स्वच्छ ठेवली जाईल. किटकनाशके जर महानगरपालिकेच्या एजन्सी मार्फत वापरली गेली तर त्या संबंधी निश्चित केलेले आकार डुकराच्या प्रभारी व्यक्तीकडून वसूल केले जातील.

**९) साथीच्या रोगांचा प्रतिबंध:-**

शहरामध्ये साथ रोगाचा प्रतिबंध करण्याकरिता सार्वजनिक आरोग्य व स्वच्छतेच्या दृष्टीने महानगरपालिका आयुक्तास जेव्हा व जशी आवश्यकता असेल त्या प्रमाणे डुकरे महानगरपालिका हद्दीच्या बाहेर हलवण्यात आली पाहिजेत. हया बाबतीत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. आयुक्तांच्या सुचनेप्रमाणे डुकरे जर महानगरपालिका हद्दीतून हलविली गेली नाही तर, ती पकडून नष्ट केली जातील व त्याबद्दल भरपाई मंजूर केली जाणार नाही.

**१०) अनुज्ञाप्ती:-**

नगरपालिका आयुक्ताने सुकर पालनास परवानगी दिली तर सुकर पालन करणारी व्यक्ती स्थायी समितीच्या मंजुरीने आयुक्ताने निश्चित केलेली अनुज्ञाप्ती की, देण्यास पात्र ठरेल.

महानगरपालिका आयुक्ताच्या परवानगी व्यतिरीक्त महानगरपालिका हद्दीत कोणतेही डुक्कर मारले जाणार नाही व त्याचे मांस साठवण्यास परवानगी दिली जाणार नाही.

**११) हया उपविधीच्या उल्लंघना बद्दल शिक्षा:-**

हया उपविधी पैकी कोणत्याही उपविधीचे उल्लंघन करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस अपराधी नंतर

अ) शंभर रुपया पर्यन्त असु शकेल एवढी दंडाची शिक्षा दिली जाईल आणि सतत उल्लंघन केल्यास त्याबाबतीत पहिल्या उल्लंघनाच्या अपराध सिध्दी नंतर उल्लंघना

नंतरच्या प्रत्येक दिवसास वीस रुपया पर्यंन्त असू शकेल एवढी दंडाची शिक्षा दिली जाईल.

ब) आयुक्त/अनुज्ञापक प्राधिकारी यांच्याकडून लेखी नोटीस मिळाल्या नंतर उल्लंघन चालू ठेवल्यास ते बंद करी पर्यंन्तच्या कालावधीतील प्रत्येत दिवसा करिता २०/- रु पर्यंन्त असू शकेल एवढी दंडाची शिक्षा दिली जाईल.

**१२) <u>विद्यमान उपविधी किंवा नियम यांचे अधिक्रमण</u>:-**

हया उपविधीच्या सुरुवातीच्या दिनांकास हया विषयी वरील हया उपविधीसी संबंधी जर कोणतेही उपविधी किंवा नियम अस्तित्वात असतील तर ते अधिक्रमण होतील.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| पशूधन विकास अधिकारी, | आयुक्त, |
| मनपा औरंगाबाद. | मनपा औरंगाबाद. |

**ठराव क्र. ८८/२:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४५८ (४८) अन्वये डुकरे पालन विषयी औरंगाबाद महानगरपालिकेस आवश्यक वाटल्यावरुन उपविधी तयार करण्यात आली असून त्याबाबत सोबतच्या प्रारुप नियमाचा उपविधीच्या मसुदयास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८९/३:-**

मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ (१३) आणि ४५८ (४८) अन्वये गुरांच्या कोंडवाडयासंबंधी औरंगाबाद महानगरपालिकेस आवश्यक वाटल्यावरुन उपविधी तयार करण्यात आलेले असून, त्या बाबतचा प्रारुप उपविधीचा मसूदा सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

## <u>औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.</u>

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ६३ (१३) आणि ४५८ (४८) अनुसार गुरांच्या कोंडवाडया संबंधिचे उपविधी.

**१) <u>संक्षिप्त नांव व प्रारंभ</u>:-**

अ) या उपविधीस "औरंगाबाद शहराच्या महानगरपालिकेचे गुरांच्या कोंडवाडया संबंधिचे उपविधी" असे म्हणता येईल.

ब) शासकीय राजपत्रात अंतिमरित्या प्रसिध्द करण्यात आल्याच्या दिनांकापासून ते अंमलात येतील.

**२) <u>व्याख्या</u>:-**

अ) विषय किंवा संदर्भानुसार विरुध्द अर्थाचे असेल ते खेरिज करुन या उपविधीमध्ये:-

१) "अधिनियम" याचा अर्थ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ असा आहे.

२) "नमुना" याचा अर्थ उपविधींनां जोडलेला नमुना असा आहे.

३) "कोंडवाडयाचा रखवालदार" याचा अर्थ कोंडवांडयाचा रखवालदार म्हणून नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती असा आहे.

४) "अनुसूची" याचा अर्थ या उपविधींना जोडलेली अनुसूची असा आहे.

५) "कलम" याचा अर्थ या अधिनियमाचे कलम असा आहे.

६) ब) या ठिकाणी वापरलेले परंतू व्याख्या न दिलेले शब्द व शब्द प्रयोग यांना अधिनियमात दिलेलेच अर्थ असतील.

**३) <u>सार्वजनिक कोंडवाडे आणि कोंडवाडयाचे रखवालदार</u>:-**

१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भुत असले तरी, महानगरपालिका आपल्या अधिकार क्षेत्राच्या मर्यादित महानगरपालिकेस योग्य ठरेल त्याप्रमाणे वेळोवेळी सार्वजनिक कोंडवाडयासाठी जागा निश्चित करील अणि अशा कोंडवाडयाचे रखवालदार म्हणून योग्य अशा व्यक्तीची नियुक्ती करील.

२) अशा प्रकारे नियुक्त करण्यांत आलेला कोंडवाडयाचा प्रत्येक रखवालदार आपली कर्तव्ये पार पाडतांना आयुक्तांचे निर्देश व नियंत्रण यांच्या अधिक असेल.

**४) <u>जप्तीची नोंदवही</u>:-**

अ) कोंडवाडयाची रखवालदार नमूना "अ" मध्ये जप्तीची नोंदवही ठेवील.

ब) इतर नोंदवही आणि विवरण:- कोंडवाडयाचा रखवालदार नमूना "ब" मध्ये कोंडवाडयाच्या जमा खर्चाचा हिशोब ठेवील.

**५) <u>गुरे कोंडवाडयात ठेवणे</u>:-**

अ) कोणत्याही रस्त्यावर आढळणारी मोकाट सुटलेली गुरे किंवा महानगरपालिकेच्या क्षेत्रातील खाजगी किंवा सार्वजनिक जागेत बेकायदा शिरणारी गुरे जप्त करुन ती कोणत्याही सार्वजनिक कोंडवाडयात कोंडून ठेवणे. हे प्रत्येक पोलीस अधिकाऱ्यांचे कर्तव्य असेल. तसेच आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा नोकराने अशा प्रकारे गुरे जप्त करुन कोंडवाडयात टाकणे कायदेशीर असेल.

ब) कोणत्याही खाजगी किंवा सार्वजनिक मालमत्तेचा मालक किंवा प्रभारी असणारी व्यक्ती यांना अशा मालमत्तेच्या ठिकाणी बेकायदा प्रवेश करणाऱ्या किंवा तिचे नुकसान करणाऱ्या गुरांना पकडुन कोणत्याही सार्वजनिक कोंडवाडयात कोंडून टाकण्याची परवानगी असेल.

**६) <u>कोंडवाडयाची फी</u>:-**

अ) प्रत्येक गुरावर/जनावरावर आकारावयाची कोंडवाडा फी ही पहिल्या अनुसूचित विहीत केल्याप्रमाणे असेल व स्थायी समितीच्या मंजुरीने वेळो वेळी वाढ करण्यात येईल.

ब) कोंडवाडयाचा रखवालदार, कोंडवाडयात ठळक दिसेल. अशा ठिकाणी कोंडवाडयाच्या फी ची एक यादी लावील.

**७) <u>कोंडवाडयाची फी आणि इतर खर्च यांची आकारणी</u> :-**

कोंडवाडयात कोंडलेल्या प्रत्येक गुरासाठी रखवालदार:-

अ) पहिल्या अनुसूची मध्ये त्या त्या वेळी विहीत केलेल्या दराने कोंडवाडा फी आकारील.

ब) आयुक्ताने वेळोवेळी निश्चित केलेल्या दराने गुराढोरांना खाऊ घालण्याचा खर्च आकारील.

क) औषधउपचाराचा (औषधोपचार करण्यात आला असल्यास) खर्च आकारील.

इ) इतर खर्च आकारील.

यात यापुढे तरतूद करण्यात आल्याप्रमाणे रखवालदार अशा गुरांच्या चाऱ्या बद्दलचा खर्च वसूल करील आणि गुरांची विल्हेवाट लावण्यात येईल पर्यन्त त्यांना पिण्यासाठी पाणी देण्याची व्यवस्था करील.

कोंडवाडयाची फी आणि आकारला जाणारा खर्च या बद्दलचा प्रत्येक प्रदानाची रखवालदाराकडून पावती दिली जाईल. या प्रयोजणार्थ प्रत्येक रखवालदाराला महामंडळाकडून निश्चित करण्यात येईल. अशा नमुण्यात एक पावती पुस्तक देण्यात येईल. या पुस्ताकातील पृष्टांवर लागोपाठचे क्रमांक आयुक्तांची सही व शिक्का असेल. या पुस्तकात कोऱ्या पावत्याच्या मुळ व स्थळ प्रती असतील.

**८) <u>कोंडवाडयाच्या फी चा भरणा</u>:-**

कोंडवाडयाचा रखवालदार गोळा केलेली संपूर्ण फी महानगरपालिकेच्या कोषागरात भरील व त्या सोबत किती रक्कम भरली त्याच्या नमूना "क" मधील दोन प्रतीतील ज्ञापन जोडील.

**९) <u>दहा दिवसांच्या आत गुरांची मागणी करण्यात न आल्यास करावयाची कार्यवाही</u>:-**

गुरे कोंडवाडयात कोंडण्यात आल्यापासून दहा दिवसांच्या आत अशा गुरांचे मालक असल्याचे आढळून येणारी कोणीही व्यक्ती अशा गुरांची मागणी करीत नसेल किंवा गुरांचा मालक किंवा एजंट असणारी व्यक्ती गुरांची मागणी करीत असेल, परंतू कोंडवाडयाची फी आणि आकारला जाणारा इतर खर्च देण्याचे नाकारीत असेल, तर कोंडवाडयाचा रखवालदार असा कालावधी संपताच ही गोष्ट नमूना " ड " मध्ये आयुक्ताना ताबडतोब कळवतील.

**१०) <u>लिलावाची नोटीस</u>:-**

१) गुरे कोंडवाडयात कोंडल्यापासून दहा दिवसांच्या आत अशा गुरांचा मालक असल्याचे आढळून येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने गुरांची मागणी केलेली नाही किंवा त्या गुरांचा मालक किंवा ऐजंट असणाऱ्या व्यक्तिने गुरांची मागणी केलेली आहे. परंतू कोंडवाडयाची फी आणि आकारला जाणारा इतर खर्च देण्यात कसून केली आहे. अशा अर्थाचा अहवाल आयुक्ताला कोंडवाडयाच्या रखवालदाराकडून मिळाल्या नंतर आयुक्त नमुना "ई" मधील एक नोटीस महानगरपालिकेच्या नोटीस बोर्डावर लावण्याची आणि कोंडवाडयातील ठळक ठिकाणी व शहरामध्ये स्पष्टपणे दिसेल. अशा जागी लावण्याची व्यवस्था करील. या नोटीशीत पुढील गोष्टी नमूद केलेल्या असतील.

अ) गुरांची संख्या आणि वर्णन

ब) जनावार जेथे जमा मरण्यात आले होते ती जागा.

क) ज्या कोंडवाडयात कोंडून ठेवले आहे त्या कोंडवाडयाची जागा.

ड) होणाऱ्या लिलावाच्या दिनांक, वेळ, आणि जागा आणि ज्यास आधिन राहून असा लिलाव केला जाईल त्या शर्ती:-

२) आयुक्त लिलावाच्या नोटीसीला मोठया प्रमाणावर प्रसिध्दी देईल.

३) कोणतेही पोलीस अधिकारी, नगरपालिका सदस्य, कर्मचारी किंवा अधिकारी अथवा कोंडवाडयाचा रखवालदार लिलावाच्यां वेळी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही गुरांची खरेदी करणार नाही.

**११) <u>लिलाव आयोजित करणे आणि विक्री उत्पन्न निकालात काढणे:-</u>**

१. उपविधी १० अनुसार नोटीशीत विनिदिष्टे केलेल्या दिनांकासं, वेळी आणि ठिकाणी लिलाव आयोजित केला जाईल.

२. लिलावाच्या वेळी आयुक्त किंवा महानगरपालिकेची पशुवैद्य/डॉक्टर गुराची किमान विक्री किंमत निश्चित करील मात्र ही किंमत गुंरांच्या मालकाला आपले जनावर सोडवून घेण्यासाठी घाऱ्या लागणाऱ्या किमान रक्कमेहून कमी असणार नाही. लिलावाची बोली जर अशा प्रकारे निश्चित केलेल्या किमान किंमतीहून कमी असेल आणि गुरे विल्हेवाट लावण्यासाठी महानगरपालिकेने आपल्या ताब्यात ठेवल्यास अधिक फायदयाचे होईल. अशी आयुक्तांची किंवा पशु वैद्याची खात्री झाल्यास आयुक्त किंवा पशुवैद्य उपविधी १४ मध्ये घालून दिलेल्या पध्दतीने गुरांची विल्हेवाट लावील.

**१२) <u>लिलाव कोणत्या वेळी आयोजीत करु नये याबाबत:-</u>**

लिलाव सुरु होण्यापूर्वी कोणत्याही वेळी, जर गुरांचा मालक असल्याचे दिसून येणारी व्यक्ती कोंडवाडयाची फी आणि आकारण्यांत येणारा खर्च आणि अशा गुरांच्या संबंधात तारण म्हणून ठेवावयाची रक्कम देण्यास तयार असेल तर अशा लिलाव केला जाणार नाही आणि आयुक्तास योग्य वाठेल त्या प्रमाणे ते जमावर त्या व्यक्तिस देण्यात येईल.

**१३) <u>लिलावासाठी आलेल्या गुरांबाबतची नोंदवही:-</u>**

कोंडवाडयाचा रखवालदार त्याच्याकडे लिलावासाठी आलेल्या गुरांची नमुना "एक" मध्ये एक नोंदवही ठेवील.

**१४) <u>विकल्या न गेलेल्या गुरांची विल्हेवाट लावणे:-</u>**

गुरे लिलावात विकली न गेल्यास महानगरपालिकेस फायदयाचे होईल. अशा पध्दतीने त्यांची विल्हेवाट लावण्यात येईल आणि कोंडवाडा फी आणि आकारला जाणारा इतर खर्च या बद्दलची वसूल न झालेली वसूल न होण्याजोगी रक्कम म्हणून स्थायी समितीच्या ठरावानुसार वसूल न होण्याजोगी रक्कम म्हणून निलिबिंत करण्यात येईल.

**१५) <u>कोंडवाडयात मेलेल्या गुरांची विल्हेवाट लावणे:-</u>**

कोंडवाडयात कोंडल्या नंतर जर एखादे जनावर मेले आणि मालका कडून त्याची मागणी करण्यात आली नाही, तर आयुक्त किंवा या संबंधात प्राधिकृत करण्यात आलेल्या अधिकाऱ्याच्या मते ज्या योगे महानगरपालिकेच्या फायदयाची होईल. अशा पध्दतीने त्या जनावराची विल्हेवाट लावण्यात येईल. कोंडवाडा फी आणि आकारला जाणारा इतर खर्च या

बद्दलची वसूल न झालेली रक्कम स्थायी समितीच्या ठरावानुसार वसूल न होण्याजोगी रक्कम म्हणून निर्लेखित करण्यात येईल.

**१६) कोंडलेल्या गुरांची मालकी घोषित करणे आणि अशा गुरांसाठी तारण म्हणून ठेव ठेवणे:-**

१) कोंडवाडया कोंडलेले कोणेतेही जनावर सोडून देण्यापूर्वी प्रत्येक कोंडवाडया रखवालदार:-

अ) अशा जनावरांच्या मालकाला किंवा त्याच्या एंजंटला, नमूना "अ" मध्ये अशा जनावराच्या मालकी संबंधिचे एक प्रतिज्ञापत्र करु देण्यास फर्मावील. गुरांवरील आपली मालकी प्रस्थापित करण्याचा पुरावा म्हणून अशा मालक आयुक्ताकडे कागदपत्र सादर करील.

ब) अशा मालकास किंवा त्याच्या एजंटास, अनुसूचीच्या स्तंभ २ मधील स्तंभ १ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक गुरांसाठी तारण म्हणून ठेव ठेवण्यास फर्मावील.

१) महानगरपालिकेकडून प्रत्येक कोंडवाडयाच्या रखवालदाराला एक पावती पुस्तक देण्यात येईल. रखवालदार तारण म्हणून ठेव ठेवण्यांत आल्या नंतर टोकन म्हणून मालकास किंवा एजंटास पावती देईल.

२) खंड (१) नुसार ज्याने तारण म्हणून ठेव ठेवली आहे. अशा मालकाचे कोणतेही जनावर ठेव ठेवल्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत कोंडवाडयात टाकले गेले असेल आणि गुरांची ही जप्ती बेकायदा असल्या बद्दल निर्णय देण्यात आला नसेल तर या ठेवीच्या निम्मी रक्कम महानगरपालिकेकडे समर्पित करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल आणि उक्त सहा महिन्याच्या कालावधी आणखी जनावरे जप्त केली गेल्यास उर्वरीत रक्कम महामंडळाकडे समप-हत केली गेली असल्याचे समजण्यात येईल. वर सांगितल्याप्रमाणे जनावर जर कोंडले गेले नसेल तर, तारणे म्हणून ठेवण्यात आलेल्या ठेवीची रक्कम ठेवीदाराने किंवा त्याच्या वतीने अन्य कोणी अर्ज केल्यावर उक्त कालावधी संपल्यानंतर त्याला परत करण्यात येईल.

**१७) नोंदवहया आणि लेख यांची तपासणी :-**

आयुक्त किंवा या संबंधात त्याने प्राधिकृत केलेला अन्य कोणताही अधिकारी, कोंडवाडयाच्या रखवालदाराने ठेवलेल्या नोंदवहया आणि लेखे यांची तपासणी करील आणि किमान दर तीन महिन्यांनी एकदा रोखी ताळे बंदाची तपासणी करील आणि अशी तपासणी केल्या बद्दल आपली सही करील.

**१८) शिक्षा:-**

जो कोणी या उपविधी नुसार जप्त करण्यास पात्र असणारे कोणेतेही जनावर जप्त करण्यास बळाने विरोध करील आणि जप्त केल्यानंतर कोंडवाडयातून ते घेऊन जाईल. त्यास पाचशे रुपया पर्यन्त असू शकेल इतक्या आणि या उपविधीच्या भंग करण्याचे त्याने चालू ठेवल्यास पहिल्यांदा उपविधीचा भंग करण्या बद्दलचा दोष सिध्दी नंतर या कालावधीत तयाने असा भंग करण्याचे चालू ठेवलेल्या कालावधीत दर दिवशी २०/- रु. एवढया रक्कमे पर्यन्त असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा केली जाईल.

**१९) निरसन आणि व्याप्ती:-**

हे उपविधी ज्या दिनांकाला अंमलात आले त्या दिनांकाला अंमलात असणारे आाणि या उपविधीसी अनुरुप असणारे कोणतेही नियम किंवा उपविधी हे नियम किंवा उपविधी या नुसार करण्यात आलेल्या किंवा करण्याचे कळविण्यात आलेलया गोष्टी खेरीज करुन, निरासित झाल्याचे समजण्यात येईल.

**संवाद:-**

श्री मोहसीन अहमद :- झोन अधिकारी यांनी याबाबतचे अधिकार देण्यात यावे.

मा. महापौर :- ठिक आहे.

**ठराव क्र. ८९/३:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मु. प्रा. मनपा अधिनियम १९४९ चे कलम ६३ (१३) आणि ४५८ (४८) अन्वये गुरांच्या कोंडवाडया संबंधी औरंगाबाद महानगरपालिकेस आवश्यक वाटल्यावरुन उपविधी तयार करण्यात आले असून त्या बाबतचा सोबतचा प्रारुप उपविधीचा मसुदयास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरित/-
पशुधन विकास अधिकारी,
औरंगाबाद महानगरपालिका.

स्वाक्षरित/-
आयुक्त,
औरंगाबाद महानगरपालिका.

**नमुना "अ"**
**(उपविधी ४(१) पहा)**
**जप्त करुन कोंडवाडयात टाकलेल्या गुरांची नोदंवही**
**जनावरांचे वर्णन**

| अ.क्र. | ज्या व्यक्तीने जनावर जप्त केले तिचे नांव आणि निवासस्थान जनावर कोंडण्यात आल्याचा दिनांक, वेळ, महिना व वर्ष | जनावर जेथे जप्त केले ते ठिकाण | जप्त करणाऱ्या किंवा कोंडवाडयात जनावर घेऊन येणाऱ्या व्यक्तिची सही किंवा आंगठयाचा ठसा. | गुरांची संख्या | प्रकार | वय | मुल्य | उंची | विशेष खूण आणि रंग | मालकाचे नाव आणि माहिती असल्यास त्याचे राहण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |

| मालकाला जनावर परत केल्याचा दिनांक आणि जनावर घेणाऱ्याची सही आणि अंगठयाचा ठसा | कोंडवाडा फी | आकारणी योग्य खर्चाची रक्कम | स्तंभ १३ व १४ ची बेरीज | घेतलेल्या रक्कमेचा पावती क्र. | उपविधी ९ नुसार आयुक्ताला कळविल्याचा दिनांक | दि. | विक्रीसाठी कोंडवाडयाचा गुरे पाठविल्याचा रखवालदाराची सही |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ |

स्वाक्षरित/-
पशुधन विकास अधिकारी,
मनपा, औरंगाबाद.

**नमुना "ब"**
**(उपविधी ४(२)पहा)**

----------------येथील कोंडवाडयाचा या वर्षातील जमा खर्चाचा हिशोब

**खर्च :-** जमा

| दि. | तपशील | रक्कम | दि. | तपशील | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| दिवस महिना | | रु. पै | दिवस, महिना | | रु. पै. |
| | जनावर नोंदवल्या बद्दलची कोंडवाडा फी क्रमांक | | | जनावर नोंदवल्या बद्दल आकारणी योग्य असलेल्या खर्चापोटी स्वत: केलेले प्रदान क्रमांक | |
| | जनावर नोंदवल्या बद्दल आकारला जाणारा खर्च क्र. | | | | |

टिप:-

१. व्यवहार होईल त्याप्रमाणे कोंडवाडयाची फी आणि आकारला जाणारा खर्च यांच्या रुपात वसूल केल्या जाणाऱ्या सर्व रक्कमाची रखवालदारा कडून दररोज या नोंदवहीत नोंद केली जाईल.

२. हिशोबात गाळण्यात आलेल्या नोंदी बद्दल व चुका बद्दल कोंडवाडयाचा रखवालदार व्यक्तिश जबाबदार असेल.

स्वाक्षरित/-
पशुधन विकास अधिकारी,
महानगरपालिका, औरंगाबाद.

**नमुना "क"**
**(उपविधी ८पहा)**

कोंडवाडयाच्या रखवालदाराने करावयाच्या वित्त प्रेषणाच्या अहवालाचा नमूना

| दिनांक<br>१ | नोदंणी क्रमांक<br>२ | कोंडवाडा फी ची रक्कम<br>३ |
|---|---|---|
| | | |

कोंडवाडयाच्या रखवालदाराची सही

तळटीपः-

हा अहवाल दोन प्रतित तयार करण्यात यावा. कोषाध्यक्षाने मिळालेली रक्कम पृष्टांकित करुन एक प्रत परत करावी आणि एक प्रत कार्यालयाच्या अभिलेखार्थ स्वतःकडे ठेवून घ्यावी.

स्वाक्षरित/-
पशुधन विकास अधिकारी,
महानगरपालिका, औरंगाबाद.

**नमुना "ड"**
**(उपविधी ९ पहा)**

कोंडवाडयाच्या रखवालादाराने --------------------- आयुक्ताकडे अहवाल पाठवण्याबाबत.

| **जनावराचे वर्णन** | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | नोदंवही क्रमांक जनावर जात केलेल्या व्यक्तिचे नांव, ज्या ठिकाणी जनावर जप्त करण्यात आले ती जागा आणि ते जनावर कोडवाडयात टाकल्याचा दिनांक व वेळ | प्रकार | वय | मुल्य | वजन | विशेष खुणा आणि रंग | कोंडवाडा फी | रखवालदाराने आकारावयाचा खर्च | शेरा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

स्वाक्षरित/-
पशुधन विकास अधिकारी,
महानगरपालिका, औरंगाबाद.

**नमुना "ई"**

**(उपविधी १० पहा)**

याद्वारे नोटीस देण्यात येत आहे की, खाली वर्णनाची आणि ---------------- जेथे जप्त करण्यात असलेली गुरे -------------रोजी औरंगाबाद शहराच्या महानगरपालिका क्षेत्रतील कोंडवाडयात पाठवण्यात आली असून, दहा दिवसांहून अधिक होईल इतक्या कालावधीसाठी ती येथे ठेवून घेण्यात आली आहेत. उपरोक्त गुरांची हक्क मागणी कराणाऱ्या कोणत्याही व्यक्तिस फर्मविण्यात येत आहे की, तो आपली हक्क मागणी सिध्द करुन दाखवण्यासाठी उक्त शहराच्या कोंडवाडयाच्या रखवालदारा पुढे हजर व्हावे आणि कोंडवाडयाची फी व आकारण्यात येणारा खर्च यासह उक्त गुरांच्या संबंधात तारण म्हणून ठेवीची रक्क्म देऊन आपली गुरे सोडवून घ्यावीत. नोटीसीच्या दिनांका नंतर सात दिवसाच्या आत अशा प्रकारे गुरे सोडवून घेण्यात अशा कोणत्याही व्यक्तिने कसूर केल्यास गुरांचा सार्वजनिक लिलाव करुन विक्री केली जाईल. कोंडवाडयाची फी व इतर खर्च लिलाव करुन केलेल्या विक्री उत्पन्नातून वजा केला जाईल. यातून काही रक्कम उरल्यास उपविधीच्या तरतूदी नुसार तिची विल्हेवाट लावण्यात येईल. ही गुरे दिनांक ------------ रोजी--------- येथे मध्यान्हपूर्वी/मध्यान्होत्तर-----------वाजता सार्वजनिक लिलाव करुन विकली जातील.

सार्वजनिक लिलाव पुढील शर्तीच्या आधिन राहून केला जाईल त्या शर्ती अशाः-

१.
२.
३.
४.

गुरांचे वर्णन.

स्वाक्षरित/-
पशुधन विकास अधिकारी,
औरंगाबाद महानगरपालिका.

स्वाक्षरित/-
आयुक्त,
औरंगाबाद महानगरपालिका.

**नमुना "क"**
**(उपविधी १३पहा)**
**लिलावासाठी कोंडवाडयाच्या रखवालादाराकडे आलेल्या गुरांच्या प्रकरणांची नोंदवही**

| **गुरांचे वर्णन** | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जेथून जनावर मिळाले त्या कोंडवाडयाचे नांव | कोंडवाडयाचा नोंदणी क्रमांक जनावर जप्त करणाऱ्या व्यक्तिचे नांव, ज्या ठिकाणी जप्त करण्यात आले ती जागा, कोंडवाडयात टाकल्याचा दिनांक व वेळ | प्रकार | वय | मुल्य | उंची | विशेष खुणा आणि रंग | नोटीस काढल्याचा दिनांक | आपली हक्क मागणी सिध्द करुन जनावर सोडवून घेण्याचा व्यक्तिची सही किंवा खुण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

| खरेदी करवण्याचे माप आणि जनावर मिळाल्याचे चिन्ह म्हणून सही | विक्रीचा दिनांक आणि विक्री उत्पन्नाची रक्कम | गुरांना वैरन घालने इ. संबंधी कोंडवाडयाच्या रखवालदाराला देण्यात आलेल्या खर्चाचा दर आणि ज्या कालावधीसाठी हा खर्च देण्यात आला तो कालावधी | कोंडवाडा फी ची रक्कम | विक्री उत्पन्नातून मिळालेली ज्यादा रक्क्म मालकाकडे परत करणे. |
|---|---|---|---|---|
| ११ | १२ | १३ | १४ | १५ |

स्वाक्षरित/-
पशुधन विकास अधिकारी,
महानगरपालिका, औरंगाबाद.

**नमुना "ग"**
**(उपविधी १९पहा)**

कोंडवाडयात टाकलेल्या गुरांच्या मालकी संबंधीचे प्रतिज्ञापत्र आणि तारणाच्या स्वरुपात ठेव म्हणून ठेवावयाची रक्कमः-
कोंडवाडयाचे रखवालदार
----------------------
----------------------

यास,

मी------------------------ याद्वारे प्रतिज्ञापित करतो की, कोंडवाडयात कोंडून ठेवण्यात आलेल्या पुढील गुरांच्या मी मालक आहे. मी श्री. ----------------- याद्वारे कोंडून ठेवण्यात आलेल्या उक्त गुरांच्या संबंधात तारणा म्हणून रु-----------एवढी रक्क्म ठेवीत आहे. मी आणखी असे प्रतिज्ञापित करतो की, या दिवसापासून सहा महिन्याच्या आत माझ्या मालकीची कोणतेही जनावर कोंडवाडयात कोंडले गेले व ही जप्ती बेकायदा असल्या बद्दल न्यायनिर्णय देण्यात आला नसेल तर पहिल्या जप्ती बद्दल ठेवीची अर्धी रक्क्म आणि नंतरच्या जप्तीसाठी ठेवीची उर्वरीत अर्धी रक्क्म महामंळाकडे समपऱ्हत झाली असल्याचे समजण्यात येईल.

ज्याची गुरे कोंडवाडयात टाकण्यात
आली त्या गुरांच्या मालकीची किंवा
त्याच्या एजंटाची सही/अंगठयाचा ठसा.

स्वाक्षरित/-
पशुधन विकास अधिकारी
महानगरपालिका, औरंगाबाद.

**पहिली अनुसूची**
**(उपविधी ६ (१) पहा)**

| गुरे | प्रत्येक गुरासाठी प्रत्येक दिवसासाठी असलेली कोंडवाडा फी |
|---|---|
| हत्ती | रु. ५०.०० |
| उंट किंवा म्हैस | रु. ५०.०० |
| घोडा, घोडी, गोल्डींग, तटट, शिंगरु, खेचर, वळू, बैल, गाय, कालवड | रु. २५.०० |
| वासरु, गाढव किंवा डुक्कर | रु. २५.०० |
| मेंढा, ओ, मेंढी, कोकरु, बकरी, बकरीचे करडू. | रु. २०.०० |

स्वाक्षरित/-
पशुधन विकास अधिकारी
महानगरपालिका, औरंगाबाद.

**दुसरी अनुसूची**
**(उपविधी १६ पहा)**

| गुरे | प्रत्येक गुरासाठी प्रत्येक दिवसासाठी असलेली कोंडवाडा फी |
|---|---|
| हत्ती | रु. १५०.०० |
| घोडा, घोडी, गोल्डींग, तटट, शिंगरु, खेचर, वळू, बैल, गाय, कालवड | रु. १००.०० |
| उंट किंवा म्हैस | रु. १००.०० |
| वासरु, गाढव किंवा डुक्कर | रु. ५०.०० |
| मेंढा, ओ, मेंढी, कोकरु, बकरी, बकरीचे करडू. | रु. ३०.०० |

स्वाक्षरित/-
पशुधन विकास अधिकारी
महानगरपालिका, औरंगाबाद.

**संवाद :**

श्री. मोहसीन अहमद : झोन अधिकारी यांना याबाबतचे अधिकार ठेवण्यात यावे.

मा. महापौर : ठीक आहे.

**ठराव क्र. ८९/३ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ (१३) आणि ४५८ (४८) अन्वये गुरांच्या कोंडवाडयासंबंधी औरंगाबाद महानगरपालिकेस आवश्यक वाटल्यावरुन उपविधी तयार करण्यात आलेले असून, त्याबाबतचा सोबतचा प्रारुप उपविधीच्या मसुदयास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९०/४:-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७ (२) (क) १४९(१), ४५४ ४५७ (७), १७ अन्वये कुत्र्यावर कर लावणे बाबतचे प्रारुप नियम सर्वसाधारण सभेने मंजुर केलेले असून नियमाप्रमाणे नागरीकाकडून वरील प्रारुप नियमाबाबत हरकती वा तक्रारी मागविल्या असता एकही तक्रार व हरकत या कार्यालयात प्राप्त झालेली नाही. म्हणून प्रारुप नियम सर्वसाधारण सभेस मंजुरीस्तव सादर.

## औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १२७ (२) (क) १४९(१), ४५४,४५७(७) (१७).

**१. संक्षिप्त नांव:-**

संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर हया नियमात:-

अ) "अधिनियम" म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९

ब) "आयुक्त" म्हणजे शहराकरिता कलम ३६ अनुसार नियुक्त केलेला महानगरपालिका आयुक्त व यामध्ये कलम ३९ अनुसार नियुक्त केलेला हंगामी आयुक्त याचा अंतर्भाव होतो.

क) "पशुवैद्यकीय डॉक्टर" म्हणजे महानगरपालिकेचा पशुवैद्यकीय डॉक्टर.

ड) "कलम" म्हणजे अधिनियमाचे कलम.

इ) "कुत्रा" यामध्ये तीन महिने किंवा अधिक वयाच्या लहान कुत्रीचा व कुत्र्याच्या समावेश आहे.

फ) "कर" म्हणजे कलम १२७ (२) च्या खंड (क) अन्वये कुत्र्यांवर बसवण्या जोगा कर.

ग) "वर्ष" म्हणजे एक एप्रिल पासून सुरु होणोरे वर्ष

**२.** हया नियमांमध्ये वापरलेल्या, परंतू व्याख्या न केलेल्या शब्दांना व शब्द प्रयोगांना अधिनियमामध्ये त्यांना जो अर्थ आहे तोच अर्थ राहील.

**३. कुत्रा पाळणे:-**

आयुक्तांच्या लेखी परवानगीशिवाय किंवा अशा परवानगीच्या अटीशी अनुरुप असेल त्याशिवाय कोणतीही व्यक्ती कुत्रा पाळणार नाही किंवा त्याच्या आवाराच्या कोणत्याही भागात कुत्रा ठेवण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

**४. व्यक्ती कर देण्यास पात्र असणे:-**

नियम १२ स अधीन राहून महानगरपालिका क्षेत्रातील आपल्या जागेत कुत्रा पाळणारी व्यक्ती कर देण्यास पात्र राहील.

**५. कराचा दर:-**

दर वर्षात किंवा त्याच्या कोणत्याही भागास प्रत्येक कुत्र्यागणिक रु. ३०/- या दराने कर वसूली केली जाईल व ती स्थायी समितीच्या मंजुरीने वेळोवेळी वाढ करण्यात येईल.

**६. आगाऊ कर भरणे:-**

संपूर्ण वर्षाचा कर हा त्या वर्षाच्या एप्रिल महिन्यात आगाऊ भरला जाईल.

**७. कर भरण्याची पध्दत:-**

महानगरपालिका क्षेत्रातील आपल्या जागेत कोणत्याही वर्षात कुत्रा पाळण्याची इच्छा असलेल्या व्यक्तीने त्या वर्षाचा एप्रिल महिना संपण्यापूर्वी कुत्रा पाळण्यासाठी परवानगी मिळण्याकरिता नमुना "अ" मध्ये आयुक्ताकडे अर्ज करावा.

मात्र त्या वर्षाचा एप्रिल महिना संपल्यानंतर कोणत्याही वेळी कोणत्याही व्यक्तीची कुत्रा पाळण्याची इच्छा असल्यास त्याला कुत्रा पाळल्या नंतर सात दिवसांचे आत अर्ज करता येईल.

अशा प्रत्येक अर्जा सोबत कराची पूर्ण रक्कम भरण्यात आलेली असेल.

आयुक्त, अर्ज मिळाल्यावर नमूना "ब" मध्ये आवश्यक ती परवानगी देईल. कराचा भरणा केल्यानंतर बिल्ला व अनुक्रमांकासह परवानगी देण्यात येईल. आयुक्त वर्षा वर्षाला निश्चित करील अशी रक्कम ही अशा बिल्लयाची फी म्हणून करा सोबत देय राहील.

**८. कुत्रा मरण पावणे अथवा हरवणे इ कळवणे:-**

कुत्र्याच्या बाबतीत कोणतीही व्यक्ती कर देण्यास पात्र असेल तर अशी व्यक्ती कुत्रा हरवला किंवा तो दुसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतरीत केला किंवा स्थंलातरीत करण्यात आला किंवा मरण पावला तर त्या बाबतीत तशी लेखी सूचना देईल. अशी माहिती मिळाल्यानंतर उक्त कुत्र्याच्या बाबतीतील कर देण्याचे दायित्व नंतरच्या वर्षापासूनच्या सुरुवाती पासून रद्द होईल. अशा सूचने अभावी अशी व्यक्ती कर देण्यास पात्र राहील.

**९. काही प्रकंरणात पूढील कराचे प्रदान आवश्यक असणे:-**

१. कोणत्याही वर्षात कुत्रा बाळगण्यामध्ये जर कोणताही बदल झाला असेल तर, त्यावर्षीसाठीच्या कराचा पूर्वीचे भरणा झालेला असेल तर त्यावर्षी कर देय होणार नाही. मात्र कुत्र्याचा ताबा ज्या व्यक्तीकडे आला ती व्यक्ती कुत्र्याला आयुक्तापुढे सादर करील. कुत्र्याचे जसे नांव त्यात दाखल करण्याकरिता लेखी परवानगी देण्यांत यावी.

२. ज्या कुत्र्याच्या बाबतीत ज्या कोणत्याही वर्षात कर भरण्यात आला असेल त्या वर्षात जर तो कुत्रा मरण पावला असेल तर त्या कुत्र्या बाबतची परवानगी असलेल्या व्यक्तीने एक रुपयाचा कर भरला तर त्या व्यक्तीस त्या परवानगीमध्ये वर्षाच्या उर्वरित भागाकरिता इतर कोणताही कूत्रा बाळगता येईल.

**१०. बिल्ला संबंधातील तरतुदी:-**

१. नियम ६(३) खाली पुरविण्यात आलेल्या बिल्ला संबंधीत कुत्र्याच्या गळयात पक्का बांधला जाईल.

२. असा कोणताही बिल्ला हरवल्यास नियम ६(३) मध्ये समाविष्ट असलेल्या फी चे प्रदान केल्यांनतर व त्या नविन बिल्लयाचा दुरुपयोग टाळण्यासाठी आयुक्त आवश्यक ती चौकशी केल्या नंतर असा नविन बिल्ला देईल.

**११. <u>कुत्रे जप्त करणे व नष्ट करणे यासाठी तरतूद:-</u>**

१. अनुज्ञाप्ती व बिल्ला याशिवाय असलेला कोणताही कुत्रा हा बेवारशी व मोकाट समजला जाईल व आयुक्त किंवा त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी त्याला जप्त करील.

२. नियम ११ च्या खंड (एक) अनुसार जप्त करण्यात आलेला कोणताही कुत्रा हा आयुक्तास योग्य वाटेल त्या प्रमाणे मोकाट म्हणून नष्ट केला जाईल किंवा बांधुन ठेवण्यात येईल.

३. नियम ११ च्या खंड (एक) खाली कुत्रा जप्त करुन आणल्या नंतर नष्ट करण्यात आला तर आयुक्त त्या बाबतची कोणतीही मागणी विचारात घेणार नाही.

४. कुत्रा जर बांधुन ठेवण्यात आला असेल तर, मालक किंवा प्रभारी व्यक्ती यांनी आपल्या मालकी बाबत खात्री पटवल्या नंतर ३ दिवसांच्या आत मागणी केली पाहिजे.

५. मालकी विषयी समाधान करुन दिल्या नंतर मालक किंवा प्रभारी व्यक्ती अनुज्ञाप्तीच्या बाबतीतील बाकी रक्कम व आयुक्ताने उक्त कुत्र्यासठी केलेला परिक्षण खर्च, लस टोचणी खर्च किंवा इतर खर्च यांच्या बाबतीतील सर्व बाकी रक्कम देईल.

६. मालक लस टोचणीच्या अनुसूची प्रमाणे कुत्र्याला प्रतिबंधक लस टोचली आहे. या विषयी आयुक्तांचे किंवा महानगरपालिकेच्या आयुक्ताचे किंवा पशुवैद्यकीय डॉक्टरचे समाधान करु शकला नाही तर, ए. आर. पी. लस टोचल्या शिवाय कोणत्याही कुत्र्याची मुक्तता केली जाणार नाही.

७. कोणताही अनुज्ञाप्ती प्राप्त कुत्रा सार्वजनिक ठिकाणी एका वर्षात सलक ३ वेळा मोकाट फिरण्याबाबत जप्त केला गेला असेल तर तो मुक्त केला जाणार नाही व आयुक्तास योग्य वाटल्यास इतर मोकाट कुत्र्या प्रमाणे नष्ट केला जाईल.

८. कोणतीही परवानगी नसलेला कुत्रा कोणत्याही आवारातून बेवारस किंवा मोकाट म्हणून आयुक्त किंवा कोणताही प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून जप्त करण्यांत येईल.

**१२. <u>सार्वजनिक ठिकाणी मोकाट फिरण्यास प्रतिबंध:-</u>**

महानगरपालिका आयुक्तास किंवा त्यांनी यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास कुत्रा यथोचितरित्या अनुज्ञाप्ती असलेला असला तरी सुध्दा त्याला योग्य रीतीने मुसक्या बांधुन ठेवावा किंवा त्यास सार्वजनिक रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी मोकाट फिरण्यास प्रतिबंध करावा. अशी कोणत्याही मालकाला किंवा कुत्र्याच्या प्रभारी व्यक्तीला नोटीस किंवा सार्वजनिक नोटीस देऊन निर्देश देता येईल.

**१३. <u>कुत्रा निरिक्षण करीता दाखल करणे:-</u>**

आवश्यक करण्यात येईल तेव्हा, कुत्रा बाळगण्यास परवानगी दिलेल्या प्रत्येक व्यक्तीने त्याच्या जवळचा कुत्रा हा आयुक्त किंवा त्याने हया करिता प्राधिकृत करण्यात आलेल्या इतर अधिकाऱ्याच्या समोर निरिक्षणा करिता व पडताळणी करिता सर्व योग्य वेळी दाखल करणे हे त्यावर बंधनकारक राहील.

**१४. कुत्र्याला आलर्क (रॅाबीज) प्रतिबंधक लस टोचणेः-**

कुत्र्याच्या मालक किंवा प्रभारी व्यक्ती कुत्र्याला आलर्क प्रतिबंधक लस टोचणीचे प्रमाणपत्र दाखल करील. मालकाने दाखल केलेल्या आलर्क विरोधी किंवा लसटोचणी प्रमाणपत्राची महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय डॉक्टराचे पडताळणी केल्या शिवाय कोणतीही परवानगी दिली जाणार नाही.

**१५. वाद, खटला आणि कायेदेशीर कार्यवाहीः-**

हया उपविधीच्या तरतुदीनुसार सदर हेतूने केलेल्या कोणत्याही कामाच्या बाबतीत कोणत्याही व्यक्ती विरुध्द कोणताही वाद, खटला किंवा कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**१६. सुटः-**

महानगरपालिका क्षेत्रातून जाणाऱ्या् खऱ्याखुऱ्या प्रवाशा जवळील किंवा महानगरपालिका क्षेत्रात १० दिवसाहून अधिक दिवस नसेलेल्या व सहज राहणाऱ्या रहिवाशाजवळील कुत्र्याला नियमातील काहीही लागू होणार नाही.

१७. परवानगीच्या नविकरणासाठी अर्ज करण्यास उशीर झाल्यास खाली दिल्याप्रमाणे अतिरिक्त कर भरावा लागेलः-

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | ३० दिवसांच्या आत | -- | काही नाही |
| ब) | ३१ ते ६० दिवस | -- | वार्षिक कराच्या १० टक्के |
| क) | ६० दिवसापेक्षा वर | -- | वार्षिक कराच्या १०० टक्के |

**१८. नियमात भरः-**

अधिनियमाच्या अनुसूचीत जर कोणताही नियम असेल तर त्यात हया नियमाची भर पडेल.

**१९. निरसन व व्यावृतिः-**

महानगरपालिकेने कर बसण्यास सुरुवात केल्यानंतर कोणत्याही दराने महानगरपालिकेने कर वसूली नियम महानगरपालिका क्षेत्रात अंमलात आणले तर त्या क्षेत्रात हया नियमांच्या सुरुवाती पूर्वी अंमलात असलेले असे नियम त्या क्षेत्रात निरसीत होतील व त्या नियमाच्या निरसना पूर्वी त्या नियमानुसार केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या बाबी मात्र यास अपवाद करतील.

स्वाक्षरित/-
पशुधन विकास अधिकारी,
औरंगाबाद महानगरपालिका.

स्वाक्षरित/-
आयुक्त,
औरंगाबाद महानगरपालिका.

**नमुना " अ"**
**(नियम ६ पाहा)**

नगरपालिका आयुक्त,
महानगरपालिका,
औरंगाबाद.

अर्जदाराचे नांव ------------------------
पत्ता (जागेचे नाव)-------------------------------

महोदय,

मी ब्लॉक क्र./घर क्र.-------------------------वार्ड---------------येथे राहात असून महानगरपालिका क्षेत्रात ----------------------या वर्षात खालील वर्णनाचा कुत्रा मी बाळगू इच्छितो.

वर्णन — वय
कुत्रा/कुत्री — रंग व ओळखीच्या खुणा कोणत्याही असल्यास---------------

| आलर्क प्रतिबंधक लस टोचल्याचा दिनांक | पहिला डोस | ब्रुस्टर |
|---|---|---|

मी महानगरपालिकेचे कुत्र्या वरील कर विषयक नियम वाचले आहे व मी त्यांना बांधील राहीन, मी अधिनियमाच्या व तरतुदी सुध्दा वाचल्या आहेत, मी या सोबत -----रुपये आगाऊ रक्कम उक्त कुत्र्या वरील कर म्हणून अग्रेषीत करीत आहे व मला ३१ मार्चला संपणाऱ्या वर्षात महानगरपालिका क्षेत्रात माझ्या ताब्यात कुत्रा ठेवण्यासाठी नियमानुसार परवानगी द्यावी अशी विनंती आहे.

ठिकाण — अर्जदाराची सही/-
औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
पशुधन विकास अधिकारी,
महानगरपालिका, औरंगाबाद.

## नमूना "ब"

श्री./श्रीमती/कुमारी-----------------------------------यांना औरंगाबाद शहराच्या महानगरपालिका क्षेत्रात --------------------१९------ पासून सुरु होणाऱ्या वर्षात अर्जात नमुद केलेल्या वर्णनाचा कुत्रा आपल्या ताब्यात ठेवण्यास उक्त नियमानुसार देण्यात येणारा बिल्ला कुत्र्याच्या गळयात नेहमी अडकवलेला असेल व अधिनियमात व नियमात घालून दिलेल्या आवश्यक शर्तीचे यथोचितरीत्या पालन करण्यात येईल. या शर्तीवर याद्वारे परवानगी देण्यात येत आहे.

उक्त वर्षात आयुक्तांनी किंवा त्यांनी हया बाबतीत यथोचितरीत्या लेखी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीने मागाणी केली असता, ही परवानगी दाखल करण्यास उपरोक्त व्यक्तीस याद्वारे सांगण्यात आले आहे.

दिनांक :

बिल्ला क्रमांक :

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| पशुधन विकास अधिकारी, | आयुक्त, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका औरंगाबाद. |

**ठराव क्र. ९०/४:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मु. प्रा. मनपा अधिनियम १९४९ चे कलम १२७ (२) (क) १४९(१), ४५४ ४५७ (७), १७ अन्वये कुत्र्यावर कर लावणे बाबतचे प्रारुप नियम सर्वसाधारण सभेने मंजुर केलेले असून नागरीकांकडून वरील प्रारुप नियमाबाबत हरकती वा तक्रारी मागविल्या असता, एकही तक्रार वा हरकत आलेली नाही. करिता सोबतच्या प्रारुप नियमाच्या मसुदयास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९१/५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्राणी संग्राहालया करिता सध्या प्रतिनियुक्तीवर दोन पशुधन पर्यवेक्षक कार्यरत आहेत. प्राणी संग्राहालया अंतर्गत पडेगाव कत्तलखान्याचे काम सुध्दा येते. अवैध कत्तल थांबवणे, अवैध कत्तलखान्यावर बंदी घालने त्या करिता त्यावर देखरेख ठेवणे शहरात फिरणाऱ्या मोकाट जनावरांच्या बंदोबस्त करणे, कोंडवाडयावर देखरेख ठेवणे, जनावरांचे दवाख्ान्यासाठी सहाय्य करणे, अवैध असणाऱ्या कत्तलखाण्याची चेकींग करणे इ. कामासाठी दोन पशुधन पर्यवेक्षक अपुरे पडतात. तरी मनपाच्या अस्थापनेवर पशुधन पर्यवेक्षकाची दोन नविन पदे वेतन श्रेणी रु. १२००-३०-१४४०-दक्षता रोध-३०-१८०० मध्ये निर्माण करण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**<u>संवाद:-</u>**

श्री अजिजुल्ला बेग:- या प्रस्तावा संदंर्भात एकंदरीत किती खर्च वार्षीक येते व या विभागामध्ये प्रतिनियुक्तीवर किती कर्मचारी आहेत.

मा. महापौर:- संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

उप आयुक्त:- दोन कर्मचारी प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत.

श्री. अजिजुल्ला बेग, श्री. मोहसिन अहमद:- दोन कर्मचाऱ्यांना प्रतिनियुक्तीवर घेतलेले असल्यास त्यांना त्यांचे विभागात पाठवून कर्मचाऱ्यामधुन ती पदे भरण्यात यावी.

मा. महापौर:- ठिक आहे. पुढील वेळेस तसे करुन घ्यावे. प्रस्ताव मंजुर.

**ठराव क्र. ९१/५:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्राणी संग्राहालया करिता सध्या प्रतिनियुक्तीवर दोन पशुधन पर्यवेक्षक कार्यरत आहेत. प्राणी संग्रहालया अंतर्गत पडेगाव कत्तलखान्याचे काम येते. तेथील सर्व कामे उदा. कत्तल थांबवणे, अवैध कत्तलखान्यावर बंदी घालणे, त्यावर देखरेख ठेवणे,

शहरात फिरणा-या मोकाट जनांवराचा बंदोबस्त करणे, कोंडवाडयावर देखरेख ठेवणे, जनावरांचे दवाखान्यासाठी सहाय्य करणे, अवैध असणाऱ्या कत्तलखान्यांची चेकींग करणे, इ कामासाठी दोन नविन पदे मनपाच्या आस्थापनेवर पशुधन पर्यवेक्षक म्हणून रु १२००-३०-१४४०- दक्षता रोध-३०-१८०० या वेतन श्रेणीत निर्माण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९२/६**

औरंगाबाद शहराच्या जुन्या हद्दीसाठी मंजुर विकास योजनेतील नगर विकास क्षेत्र वगळून व सिडकोने डिनोटिफाईड केलेलया क्षेत्रासाठी विकास योजना सुधारीत करण्याचा इरादा महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ व २३ (१) अन्वये ठराव क्र. ७ दिनांक १८/६/८८ अन्वये जाहीर केला आहे. या कामी सहाय्यक संचालक, नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांची "नगर रचना अधिकारी" म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. नगर रचना अधिकारी यांची कलम २५ अन्वये सर्व्हेक्षण पुर्ण करुन विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करुन तो मा. आयुक्त यांचेकडे दि. २७/३/९१ रोजी सादर केला आहे. आता महानगरपालिकेच्या विनंती वरुन शासनाने उप संचालक, नगर रचना, विकास योजना औरंगाबाद यांच्या अधिपत्याखाली विशेष घटक स्थापन केला असून, ते कार्यालय १८ जून १९९२ पासून कार्यरत आहे. विकास योजना सुधारित पुढील काम या कार्यालयामार्फत होईल. करिता उप संचालक, नगर रचना विकास योजना औरंगाबाद यांची उक्त कायदयाच्या कलम २४ अन्वये "नगर रचना अधिकारी" म्हणून नव्याने नेमणूक करण्यात येत आहे.

वरील प्रमाणे " नगर रचना अधिकारी" नियुक्ती झाल्यावर उप संचालक, नगर रचना, विकास योजना, औरंगाबाद यांचेकडून आवश्यक ते सर्वेक्षण व माहिती संचलन होउुन सुधारीत विकास योजनेचे प्रारुप नकाशे तयार होतील व त्यांनतर प्रारुप विकास योजनेच्या प्रस्तावानंतर मा. संचालक नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे यांची पुर्व मान्यता घेऊन बैठक प्रस्ताव अंतिम करण्यात येतील व त्यांनंतर सुधारित विकास योजनेचे प्रारुप नकाशे व अहवाल तयार करुन " नगर रचना अधिकारी" महानगरपालिकेला प्रसिध्दीसाठी सादर करतील. या सर्व कार्यवाहीला लागणारा कालावधी लक्षात घेता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ (१) खालील मुदत वाढवून घेणे आवश्यक आहे.

उक्त अधिनियमाचे २६(१) प्रमाणे विकास योजना तयार करण्याचा इरादा कलम २३ अन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्या पासून दोन वर्षाच्या कालावधीत विकास योजना प्रसिध्द व्हावयास हवी, अथवा त्याला शासनाकडून मुदतवाढ घ्यावी लागते. दोन वर्षापर्यंन्तचा कालावधीसाठी मा. संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून प्रत्येक वेळी सह/सहा/महिने याप्रमाणे मुदतवाढ मंजुर हेते. व दोन वर्षा नंतरचे मंदतवाढीचे अधिकार शासनाकडे आहेत.

वरील परिस्थितीत आता पुढील सहा महिन्या करिता म्हणजेच दिनांक ४/४/९३ पर्यन्त मुदतवाढ देण्याकरिता प्रस्ताव मा. संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडे सादर करण्या करिता या प्रस्ताव सर्वसाधारणे सभेच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्र. ९२/६:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराच्या जुन्या हद्दीसाठी मंजुर विकास योजनेतील नगर विकास क्षेत्र वगळून व सिडकोने डिनोटीफाइड केलेल्या क्षेत्रासाठी विकास योजना सुधारीत करण्याचा इरादा मनपाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधि. १९६६ चे कलम ३८ व २३(१) अन्वये ठराव क्र. ७ दिनांक १८/६/८८ अन्वये जाहीर केला आहे. या कामी सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका यांची "नगर रचना अधिकारी" म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. आता महानगरपालिकेच्या विनंती वरुन शासनाने उपसंचालक नगर रचना विकास योजना औरंगाबाद यांच्या अधिपत्याखाली विशेष घटक स्थापन केला असून ते कार्यालय १८ जून १९९२ पासून कार्यरत आहे. विकास योजना सुधारित पुढील काम या कार्यालया मार्फत होईल. करिता उपसंचालक नगर रचना विकास योजना औरंगाबाद यांची उक्त कायदयाच्या कलम २४ अन्वये नगर रचना अधिकारी म्हणून नव्याने नेमणूक करण्यात येत आहे.

विकास योजना सुधारित करण्याचा कलम २३ खालील इरादा शासन राजपत्र दिनांक ५/१०/८९ रोजी प्रसिध्द झाला आहे. त्यामंळे विकास योजना प्रसिध्द करावयाची कलम २६ (१) खालील मुदत दि. ५/१०/९१ रोजी संपली व महानगरपालिकेच्या विनंती वरुन या संचालकांशी यापूर्वी दिनांक ४/४९२ व त्यांनतर दिनांक ४/१०/९२ पर्यन्त मुदत वाढ मंजुर केलेली आहे. वरील परिस्थितीत आता पुढील सहा महिन्या करिता म्हणजे दिनांक ४/४/९३ पर्यन्त मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९३/७:-**

औरंगाबाद महानगरपालिकेने औरंगाबाद शहराच्या जून्या हद्दीसाठी मंजुर विकास योजनेतील नाविकास क्षेत्र वगळून व सिडकोने डिनोटीफाइड केलेल्या क्षेत्रासाठी सुधारीत विकास योजना तयार करण्याचा इरादा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ व २३ (१) अन्वये ठराव क्र.७ दिनांक १८/६/८८ अन्वये जाहीर केला आहे. त्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेले आदेश क्र. AMC/T.P.S./ATPO/४७९०/१९८९ दिनांक २८/१२/८९ अन्वये सहाय्यक संचालक, नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद यांची " नगर रचना अधिकारी" म्हणून नेमणूक केली आहे. नगर रचना अधिकारी यांनी त्यानुसार कलम २५ अन्वये सर्व्हेक्षण पुर्ण करुन विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करुन तो मा. आयुक्त महानगरपालिका यांचेकडे दिनांक२७/३/९१ रोजी सादर केलेला आहे.

त्यानंतर महानगरपालिकेच्या विनंती वरुन शासनाने नगर विकास विभाग आदेश क्र. टीपीव्ही -२१९०-६०७ प्र. क्र. १२१/९० युडी-२७ दिनांक २७/५/९२ अन्वये औरंगाबाद शहराची विकास योजना सुधारित करणेसाठी उपसंचालक, नगर रचना यांच्या अधिपत्या खालील विशेष घटक स्थापन केले असून सदर कार्यालय दिनांक १८/६/९२ पासून कार्यरत आलेले आहे. सबब विकास योजना (स) पूढील काम करण्यासाठी उक्त कायदयाचे कलम २४ अन्वये आता उप संचालक, नगर रचना, विकास योजना औरंगाबाद यांची "नगर रचना अधिकारी" म्हणून नेमणूक होणे आवश्यक आहे.

तरी या ठरावाद्वारे औरंगाबाद शहराच्या जुन्या हद्दीसाठी मंजुर विकास योजनेतील नाविकास क्षेत्र वगळून व सिडकोने डिनोटीफाइड केलेल्या क्षेत्रासाठी विकास योजना (सुधारीत) तयार करण्याच्या कामी विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करण्यानंतरचे काम करण्यासाठी

म्हणून सहाय्यक संचालक, नगर रचना महानगरपालिका औरंगाबाद यांचे ऐवजी उप संचालक नगर रचना, विकास योजना औरंगाबाद यांची महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये "नगर रचना अधिकारी" म्हणून नेमणूक करण्यासाठी प्रस्ताव सादर.

**ठराव क्र. ९३/७:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ व २३ (१) अन्वये ठराव क्र. ७ दिनांक १८-६-८८ अन्वये जाहीर केला. त्याप्रमाणे मनपाने आदेश क्र. एएमसी/टीपीएस/एटीपीओ/४७९०/१९८९ दि. २८/१२/८९ अन्वये सहाय्यक संचालक नगर रचना यांची "नगर रचना अधिकारी" म्हणून नेमणूक केली. औरंगाबाद शहराच्या जुन्या हद्दीसाठी मंजुर विकास योजनेतील नाविकास क्षेत्र वगळून व सिडकोने डिनोटीफाईड केलेल्या क्षेत्रासाठी विकास योजना (सुधारीत) तयार करण्याच्या कामी विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करण्यानंतरचे काम करण्यासाठी म्हणुन सहाय्ययक संचालक नगररचना मनपा यांचे ऐवजी उपसंचालक नगररचना विकास योजना औरंगाबाद यांची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये नगररचना अधिकारी म्हणून नेमणूक करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९४/८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सुरक्षा विभागासाठी सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सुरक्षा अधिकाऱ्यांनाच सर्व कामे करावी लागतात. जकात नाका, महापौर बंगला, आयुक्त बंगला या ठिकाणी सुरक्षा रक्षक कार्यरत ठेवणे, त्यांना शिफटींग देणे, वेळोवेळी सुरक्षिततेच्या दृष्टीने विविध कामे करुन घेणे, अतिक्रमण हटाव मोहीम राबवितांना कर्मचाऱ्यालाच संरक्षण देणे, तसेच अतिक्रमण हटविण्यास मदत करणे इ. काम सुरक्षा अधिकाऱ्यालाच पार पाडवी लागतात. त्यामुळे त्यांना सहाय्य करण्यासाठी महानगरपालिकेच्या अस्थापनेवर एक सहाय्यक सुरक्षा अधिकाऱ्यांचे पद निर्माणे करणे आवश्यक आहे. करिता वेतनश्रेणी रुपये १२०० ते १८०० मध्ये सहाय्यक सुरक्षा अधिकाऱ्यांचे पद निर्माण करण्यास शिफारस करण्यात येते. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ९४/८:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुरक्षा विभागासाठी सध्या कार्यरत असलेलया कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महानगरपालिकेच्या अस्थापनेवर एक सहाय्यक सुरक्षा अधिकारी हे पद रुपये १२०० ते १८०० या वेतनश्रेणी निर्माण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९५/९:-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन आदेश क्र. पीओडी-१९९१/२१४/सेवा-१ मंत्रालय, मुंबई दिनांक २८/१०/९१ अन्वये श्री. के. जे. पाटील यांची महानगरपालिकेमध्ये एक वर्षाकरिता शहर अभियंता या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली होती. त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक ८/१/९३ रोजी संपत असल्यामुळे, महानगरपालिकेतील त्यांच्या विभ्ागातील चालू असलेलया कामाची पुर्तता करुन

घेण्यांच्या दृष्टीने त्यांना ३१ मार्च ९३ पर्यन्त मुदत वाढ द्यावी. म्हणून शिफारस करण्यात येते. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवादः-**

श्री. अजिजुल्ला बेगः- संबंधित अधिकाऱ्यांची मुदतवाढ एका वर्षांनी करावी.

श्री. प्रदिप जैस्वाल, श्री प्रकाश जावळेः- शहर अभियंता यांचे बाबतीत अनेक तक्रारी आहेत. करिता प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणेच मंजुरी व्हावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉयः- केवळ तीन महिन्याची मुदतवाढ देवून त्यांनतर दुसरा शहर अभियंता मागविणार काय?

श्री. बंडु प्रधानः- कर्मचाऱ्यामधुन शहर अभियंता पद भरण्याची कर्यवाही व्हावी.

श्री. गंगाधर गाडे ,श्री. प्रकाश जावळेः- शहर अभियंता यांचे बाबतीत अनेक तक्रारी असून, स्लम विभागातील कामे काहीही

झालेली नाहीत. करिता त्यांना मुदतवाढ जादा देवु नये.

मा. महपौरः- तिन महिन्याची मुदतवाढ देण्यात येते.

**ठराव क्र ९५/९:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग आदेश क्र. पीओजी ११९१/२१४/१/सेवा-१ मंत्रालय मुंबई दिनांक २८/१०/९१ अन्वये श्री. के. जे. पाटील यांची महानगरपालिकेत एक वर्षाकरिता शहर अभियंता या पदावर प्रतिनियुक्ती झाली होती. त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक ८/१/९३ रोजी संपत असल्याने महानगरपालिकेतील त्यांच्या विभागातील चालू असलेल्या कामाची पुर्तता करुन घेण्याच्या दृष्टीने त्यांना ३१ मार्च ९३ पर्यन्त मुदतवाढ देण्यास सार्वनुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९६/१०:-**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, स. सदस्यांनी महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते व चौकाच्या नामकरणाचे प्रस्ताव प्रथम मा. आयुक्त यांचेकडे सादर करावेत मा. आयुक्त यांनी छाननी केल्यानंतर सदरचे प्रस्ताव बांधकाम व स्थायी समितीच्या सभेत बहुमताने मंजुर झालेला प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे अंतिम मंजुरीस्तव मांडले जातील. सभागृहाची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही होईल. तसेच प्रसिध्द व्यक्तिचे नांव रस्त्यास अथवा चौकास एकदाच दिले जातील. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवादः-**

श्री. आलफखाँनः- सदरचा विषय मा. आयुक्तामार्फत मांडण्यात यावा.

मा. महापौरः-सदरील प्रस्ताव स्थगित ठेवावा.

**ठराव क्र ९६/१०:-**

सदरील प्रस्ताव स्थगित ठेवावा. असे सर्वानुमते ठरेल.

**विषय क्र. ९७/११:-**

**१) <u>योजनेचे नांव</u>:-** "सावित्रीबाई मुले विद्यार्थी सहाय्यक योजना".

## २) उद्दिष्टः-

औरंगाबाद महानगरपालिकेच्या अंतर्गत ७३ प्राथमिक (मराठी व उर्दु) शाळा चालविल्या जातात. या शाळामध्ये सामान्यपणे गरीब कुंटुबांतील मुले-मुली शिक्षण घेतात. गरीब विद्यार्थ्यांना त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे गणवेष पाटी, पुस्तके व इतर शैक्षणिक साधने त्यांना वेळेवर मिळत नाहीत. त्यामुळे अशा गरीब विद्याथ्यांना शैक्षणिक सुविधा पासून दूर राहावे लागते. गरीब व मागासवर्गीय कुंटबातील मुलांमुलीना शिक्षणासाठी सुविधा पुरविण्याचे काम शासनाचे, स्थानिक स्वराज्य संस्थाचे स्वयंसेवी संस्थाचे व विस्ताराने समाजातील सर्व नागरीकांचे आहे. त्या दृष्टीने औरंगाबाद महानगरपालिकेने गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणास सहाय्यभुत व्हावे या उद्देशाने ही योजना धोरण म्हणून सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर केली आहे. या योजनेद्वारा मनपाच्या प्राथमिक शाळांमधुन शिक्षण घेणारे गरीब व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वर उल्लेख केलेले शैक्षणिक साहित्य पुरवून त्यांची शैक्षणिक वृध्दी वाढवावी. असे उद्यिष्ट डोळया समोर ठेवले आहे.

## ३) योजनेची व्याप्तीः-

सदर योजनेची व्याप्ती महानगरपालिका, औरंगाबाद या क्षेत्रातील मनपाच्या मराठी, उर्दु प्राथमिक शाळातील विद्यार्थी/विद्यार्थीनी यांच्या पुरतीच मर्यादित आहे. या शाळांमधील वर्ग १ ते ७ पर्यन्ताच्या विद्यार्थी/विद्यर्थीनीना फक्त ही योजना लागू राहील.

## ४) कार्यवाहीः-

योजनेची कार्यवाही करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या मराठी, उर्दु प्राथमिक शाळा मधुन शिकणाऱ्या गरीब व होतकरु विद्यार्थ्याच्या नांवाच्या शिफारशी शाळाच्या मुख्याध्यापकाकडून अशा गरीब व होतकरु विद्यार्थ्याच्या यादया शाळा सुरु झाल्यानंतर सामान्यपणे एक महिन्या पर्यन्तच्या कालावधीत मागविण्यात येतील. मुख्याध्यापकाकडून प्राप्त झालेल्या यादयामधुन आर्थिक तरतूदीच्या अधिन राहून आर्थिक सहाय्यासाठी विद्यार्थ्यांची निवड शिक्षणाधिकारी, मनपा यांच्या पातळीवर केली जाईल. परंतू यादी अंतिम मान्याता आयुक्तांची राहीत. आर्थिक सहाय्य हे पैशाच्या स्वरुपात विद्यार्थ्यांना दिले जाणार नाही. विद्यार्थ्यांना लागणारे शैक्षणिक साहित्य मनपा एकत्रित पणे खरेदी करुन त्याचे वाटप एकत्रित कार्यक्रमाद्वारे करण्यात येईल. विद्यार्थ्याची निवड करतांना भाषा, जातीधर्म याला कोणतेही स्थान राहणार नाही. विद्यार्थ्यांची परिस्थिती हा प्राधान्याचा निकष मानण्यात येईल. मुलांच्या शिक्षणाला आर्थिक प्राधान्य मिळावे या उद्देशाने निवडीमध्ये विद्याथीनींची संख्या अधिक राहील. विद्यार्थ्याची निवड करतांना मनपाच्या सर्व प्राथमिक शाळांमधील विद्यार्थी/विद्यार्थीनींचा त्यांत समावेश राहील असे पाहिले जाईल.

## ५) आर्थिक तरतुदीः-

१) औरंगाबाद महानगरपालिकेतील सर्व सन्माननीय नगरसेवक या योजनेसाठी त्यांच्या स्वेच्छा निधिमधुन प्रत्येकी पाच हजार रुपये देतील. (या संबंधिची घोषणा मा. महापौर व अन्य पदाधिकाऱ्यांनी दिनांक ५-९-९२ रोजी केलेली आहे. त्यानुसार ही तरतूद सुचविण्यात आलेली आहे.)

२) औरंगाबाद महानगपालिकेच्या अंतर्गत ६५५ एवढे प्राथमिक शिक्षक आहेत. या शिक्षकांनी सदर योजनेसाठी स्वइच्छेने प्रतीमहा रुपये ३/- किंवा वार्षिक रुपये ३५/- सहाय्य निधीं द्यावा. अशी अपेक्षा आहे. तसे अभिवचन शिक्षक संघटनांनी दिलेले आहे.

३) औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी संघटना व कर्मचारी संघटना या योजनेसाठी स्वइच्छेने आर्थिक सहाय्याचे योगदान करील. अशी अपेक्षा आहे.

४) औरंगाबाद शहरातील सर्वसामान्य नागरिक यासाठी देणगीद्वारे मदत करु शकतील. तसेच शहरातील दानशूर धनिक मंडळी व उद्योगपती यांचेकडून या उपक्रमासाठी देणगी रुपाने निधी गोळा करण्यात येईल. या संबंधीचे जाहीर आवाहन करुन निधी प्राप्त करण्याचा प्रयत्न केला जाईल.

५) औरंगाबाद महानगरपालिका या योजनेसाठी वेळोवळी सोव्हीनियर काढुन मदत प्राप्त करील. सोव्हीनियर काढण्याची जबाबदारी शिक्षण विभागाची राहील.

**६) <u>निधी व निधीचा उपयोग:-</u>**

अ) या प्रकारे मदतीतून सुमारे रुपये १०/- (दहा) लाख निधी गोळा करण्यात येईल व सदर निधी मनपामध्ये स्वतंत्र बजेट हेड अंतर्गत ठेवण्यात येईल.

ब) सदरचा निधी हा कायम ठेव या स्वरुपात ठेवण्यात येईल. व या कायम ठेवीच्या व्याजा मधुन निर्माण होणाऱ्या उत्पन्नावर या योजनेची कार्यवाही करण्यात येईल. त्यामुळे ही योजना प्रती वर्षी कायम ठेवीवरील व्याजातून चालू राहील.

क) प्रतिवर्षी कायम ठेवीमध्ये भर घालण्याचीही तरतूद योजने अंतर्गत ठेवण्यात येत आहे. ज्यामुळे कायम ठेवीचा निधी या योजनेसाठी सातत्याने वाढेल.

ड) या योजनेचा निधी मनपाच्या कोणत्याही अन्य कामासाठी वापरता येणार नाही व काढता येणार नाही.

इ) आयुक्त हे या योजनेचे मुख्य समन्वयक अधिकारी राहतील. शिक्षणाधिकारी हे या कामी आयुक्तांना सचिव म्हणून मदत करतील.

सदर प्रशासकीय प्रस्ताव आयुक्तामार्फत सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे. प्रस्तावाला मंजुरी देण्यासाठी अग्रेषित.

**<u>संवाद:-</u>**

सौ. लता दलाल:- प्रस्तावित अनु. क्र. ५ मध्ये सर्व स. सदस्यांनी रु. पाच हजार त्यांच्या स्वेईच्छा निधीतून देतील असे आहे. त्याबाबत सर्वांना सक्ती केलेली आहे.

मा. महापौर:- नाही. सर्व स. सदस्यांना सक्ती म्हणून केलेली नाही. परंतू संत एकनाथ रंगमंदिर येथे शिक्षक दिनाच्या दिवशी जो कार्यक्रम झाला, त्यावेळी अशी सूचना केलेली होती. ते आपल्या स्वइच्छने राहील.

श्री मनमोहनसिंग ओबेरॉय:- तशी योजना चांगली आहे किंवा विरोध नाही, परंतू नगरसेवकांच्या निधीतून केलेल्या खर्चाची माहिती मिळणे आवश्यक आहे.

मा. महापौर :- सदरचा योजनेमुळे शाळेतील गरीब मुलामुलींना याचा फायदा हेईल. करिता या योजनेस सहकार्य करणे योग्य होईल.

सौ. लता दलाल:- सदरील खर्च कोणत्या वर्षी करणार?

मा. महापौर :- सन १९९३ च्या आर्थिक वर्षात याचा खर्च अपेक्षित आहे.

श्री अजिजुल्ला बेग:- ज्या वार्डात मनपाच्या शाळा नाहीत, परंतू त्या वार्डात खाजगी शाळा आहेत. अशा खाजगी शाळेतील मुलामुलींना याचा फायदा हेईल काय?

मा. महापौर :- नाही तसे शक्य नाही. केवळ मनपाच्या शाळेतील मुलांमुलीसाठी ही योजना आहे. तेव्हा प्रस्ताव मंजुर.

**ठराव क्र ९७/११:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सावित्रीबाई फुले विद्यार्थी सहाय्यक योजने अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेतील ७३ प्राथमिक (मराठी व उर्दु शाळांमधुन गरीब व मागासवर्गीय कुंटुबातील इय्यता १ ली ते ७ वी पर्यन्त शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनी यांना त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे गणवेश, पाटी पुस्तके, व इतर शेक्षणिक साधने देवून त्यांची शैक्षणिक वृध्दी वाढवावी. या व इतर उद्दिष्ट व योजनेच्या व्याप्तीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९८/१२:-**

मा. आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका क्षेत्रतील नामवंत मंडळीचा "महानगरपालिका पुरस्कार" देऊन सत्कार करण्यात यावा. सदरील पुरस्कारामुळे औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील शहराच्या विकासात विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व प्राविण्य मिळविणाऱ्या गुणी नगरवासिंयाच्या गुणग्राहकतेचा हा गौरव होईल. हा गौरव त्या त्या वर्षातील त्यांच्य कार्यानुसार करण्यात यावा.

सदरील पुरस्कारात सन्मान चिन्ह, रोख रुपये १००१/- मानधन, शाल व श्रीफळ व सन्मानपत्र यांचा समावेश असेल. प्रतिवर्षी या सन्मानासाठी ११ व्यक्तिची निवड प्रशासानाने निवड समिती मार्फत निकषांच्या आधारे करावी.

प्रस्तावित "महानगरपालिका पुरस्कारासाठी" रुपये ५०,०००/- ( रुपये पन्नास हजार) ची तरतूद अंदाजपत्रात करण्यात यावी व १ मे, महाराष्ट्र दिनी हा पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात यावा.

**संवाद:-**

श्री. रशद मामू :-सदरील प्रस्तावित पुरस्काराची किंमतीत वाढ करण्यात यावी.

मा. महापौर :-प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. ९८/१२:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील नामवंत मंडळीचा "महानगरपालिका पुरस्कार देऊन सत्कार करण्यात यावा. ज्यामध्ये शहराच्या विकासात विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व प्राविण्य मिळविणाऱ्या गुणी नगरवासियांच्या गुणग्राहकतेचा गौरव होईल व तो गौरव त्यांनी केलेल्या कार्यानुसार होईल. यासाठी प्रतिवर्षी ११ सन्माननिय व्यक्तिंची निवड प्रशासनाने निवड समिती मार्फत निकषांच्या आधारे या पुरस्कारासाठी रु. ५०,०००/-(रुपये पन्नास हजार) ची तरतूद अंदाजपत्रकात करुन १ मे, महाराष्ट्र दिनी हा पुरस्कार रोख रु १००१(एक हजार एक) मानधन, शाल, श्रीफळ व सन्मानपत्र देवून करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९९/१३:-**

मा. आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५८ अन्वये पाणी पुरवठयाबाबत उपविधी तयार केलेले आहेत. सदरील उपविधीतील कलम तीन (३) मध्ये पाणीपट्टीचे सध्या अस्तित्वात असलेले दर अपुरे आहेत. कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे सध्या पाणी पुरवठयाच्या व्यवस्थेवरील खर्च व पाणी खरेदीसाठी रक्कम रुपये ३६६.४०/- लाख इतका व पाणी करापोटी (नळ कनेक्शन) द्वारे एकुण उत्पन्न रुपये २००.०० लाख आहे.

महाराष्ट्र पाणीपुरवठा जलनिःसारण मंडळाने पाणी दरात दिनांक १.६.९२ पासून प्रति १००० लिटरला रुपये १.६५ ऐवजी रुपये २.०० हया प्रमाणे वाढ केल्यामुळे पाणी पुरवठा व्यवस्था व पाणी खरेदी यासाठी प्रतिवर्षी खर्च एकुण रु. ५५०.०० लाख एवढा खर्च होईल. तसेच मनपास हा खर्च भरुन काढण्याच्या दृष्टीने सध्याचे नळ कनेक्शन व पाणी दरात वाढ करणे अनिवार्य आहे.

सोबत वाढीव दर, खर्च व उत्पन्नाचे विश्लेषण प्रस्तावित केले असून याद्वारे मिळणारे उत्पन्न रुपये ५००.०० लाख आहे.

| प्रस्तावित दरापासून<br>मिळणारे उत्पन्न | पाणीपुरवठा व्यवस्था व<br>पाणी खरेदी खर्च |
|---|---|
| रुपये ५००.०० लाख | रुपये ५५०.०० लाख |

तुट (--) रुपये ५० लाख

तसेच या वाढीव दरामुळेही पाण्याच्या वितरण खर्चाच्या अंदाजपत्रकात तुट राहते. तथपि कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जलनिःसारण हयांनी दर प्रस्तावित केल्यानुसार पाणीपुरवठा उपविधी सुधारीत १९८७ च्या कलम ३ च्या परिशिष्ट मध्ये बदल करण्यात येतील. (सोबत प्रस्तावित दर व पुर्वीचे दराची तक्ता जोडला आहे.)

प्रस्तावित बदला बाबत नागरिकांना काही हरकती सुचना असतील त्याची सुनावणी स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द झाल्यापासून ६ (सहा) आठवडयांचा कालावधी देऊन घेण्यात येईल. अंतिम प्रस्ताव मंजुरीस्तव ठेवण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>नळ कनेक्शनचे जुने दर व प्रस्तावित वाढीव दर, मिटरचे दर खालील प्रमाणे.</u>**

| जुने नळ कनेक्शनचे दर | | | नविन नळ कनेक्शनचे दर | |
|---|---|---|---|---|
| **नळ कनेक्शन** | **जुने दर** | **मिटरचे दर** | **प्रस्तावित वाढीव दर** | **प्रस्तावित मिटरचे वाढी दर** |
| **घरगुती वापरासाठी** | | | | |
| १५ एम.एम.Ø (१/२") | रु. ४००.०० | १००० लि. ला रु. १.१५ | ५००/- | १०००लिटरला रु. २.५० |
| २० एम. एम. Ø (३/४") | रु. ७३०.०० | १००० लि. ला रु. १.१५ | १०००/- | १०००लिटरला रु. २.५० |
| २५ एम. एम. Ø (१") | रु. ११६०.०० | १००० लि. ला रु. १.१५ | २५००/- | १०००लिटरला रु. २.५० |
| **उदयोग धंदयासाठी** | | | | |
| १५ एम.एम. Ø (१/२") | रु. १४५०.०० | १००० लि. ला ४.०० रु. | ३०००/- | १००० लिटरला रु. ८.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० एम. एम. Ø (३/४") | रु. २६५०.०० | १००० लि. ला ४.०० रु. | ४०००/- | १००० लिटरला रु. ८.०० |
| २५ एम. एम. Ø (१") | रु. ४२००.०० | १००० लि. ला ४.०० रु. | १०,०००/- | १००० लिटरला रु. ८.०० |
| **तात्पुरत्या स्वरुपाचे** | | | | |
| १)१५ एम.एम. Ø (१/२") | रु. २००.०० दरमहा | -- | -- | ३००/- दरमहा |
| २)२० एम. एम. Ø (३/४") | रु. ३५०.०० दरमहा | -- | -- | ६००/- दरमहा |
| ३)२५ एम. एम. Ø (१") | रु. ५५०.०० दरमहा | -- | -- | १०००/- दरमहा |
| ४)१००० लि. ला दरमहा बांधकामासाठी | रु. ४.५० पैसे | -- | -- | ८/- |

**संवाद :-**

श्री. गिरजाराम हाळनोरः- शहरातील पाणी पुरवठयाची मागणी किती प्रमाणात असते. याची माहिती द्यावी. त्याचप्रमाणे ६०% लोक नियमित पाणीपट्टी भरतात. तर ४०% भरीत नाही. याबाबत बाकीच्या नागरीकांनी करवी. सक्तीने वसूल करण्याची आवश्यकता आहे.

श्री. पांडूरंग पैठणकरः- जोपर्यंन्त झोन मधुन वसूली झाल्याचे रजिष्टर येत नाही. तोपर्यंन्त त्याची पडताळणी करुन पुढील कार्यवाही करावी तोपर्यंन्त प्रस्ताव स्थगित ठेवावा.

श्री अलफखाँन :- शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था योग्यरितीने हाताळणे आवश्यक आहे. काही भागामध्ये पाणीपुरवठा सुरळीत असतो. तर काही भागातील नागरिकांची ओरड असते. याबाबत संबंधित अधिकारी यांनी लक्ष देऊन कार्यवाही करावी. सदरील प्रस्ताव वाढीव दराचा आहे. सध्या नागरिकांवर वाढीव दराचा बोजा लादने ठिक नाही. यामध्ये दिलेल्या दरानुसार कमी दर लावणे आवश्यक आहे. तसेच हर्सुल येथील तलावाची पातळी वाढविण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

मा. महापौर :-हर्सुल तलावाची पातळी वाढविण्यासाठी सर्व स. सदस्यांनी आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी सुचना घाव्यात असे मला वाटते.

श्री. मुजीब आलमशा खानः- ज्या भागातील नळाद्वारे गेल्या ३/४ वर्षापासुन नळाला मुळीच पाणी येत नाही. अशा नळांचे बिले भरपूर आलेले आहेत. उदा. रशिदपूरा, गणेश कॉलनी, भागातील नागरीकांना पाणीपट्टी कमी करण्यात येणार आहे किंवा नाही.

श्री. नारायण फत्तेलष्करः- सन १९७२ ला हर्सुल तलावाची साफसफाई झालेली होती. त्यावेळेस पासून अद्यापही साफसफाई आलेली नाही. त्यामुळे यावर योग्य ती कार्यवाही व्हावी.

श्री चंद्रकांत खैरेः- महाराष्ट्र शासनाकडून सिंचन विभागामार्फत हर्सुल येथील तलावाची पातळी वाढविण्याकरिता काम करवून घेण्याचे प्रयत्न करावेत. ज्यामुळे भविष्यात शहरातील नागरिकांना पुरेशे पाणी सुरळीत मिळू शकेल. त्याप्रमाणे परिसर

अभियांत्रिकी विभागाकडून मनपाला किती पाणीपुरवठा केला जातो याची माहिती द्यावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :- नविन नळ कनेक्शन दर जे दर्शविण्यात आलेले आहे. त्यामध्ये जादा वाढ न करता १००० लिटरला घरगुती वापारासाठी अर्धा इंची नळाची वाढ रु. ६००/- करण्यात यावे.

श्री अजिज जहागिरदार :- सिडको येथील पाणी पट्टी आकारणी थकीत वसूली किती आहे. सिडकोतील नागरीकांकडून पाणीपट्टी सक्तीने वसूली केली जाते काय याची माहिती द्यावी.

श्री. स. हुसैन स. रफतः- शहरात बऱ्याच ठिकाणी अनाधिक्त नळ कनेक्शन आहेत. त्या व्यतिरिक्त मोठ मोठे हॉटेलास, गॅरेज इ. ना सुध्दा कनेक्शन अनाधिकृत घेतलेले आहेत. त्या सर्वाचे बाबतीत झोनकडे रजिस्टर वरती रेकॉर्ड येणे आवश्यक आहे.

श्री शांताराम काळेः- प्रत्येक वार्डवाईज शहरातील अनाधिकृत व अधिकृत नळाचे बाबतीत सर्व्हे करुन माहिती झोन मध्ये राहणे महत्वाचे आहे. त्या शिवाय मनापाकडून जे चोरुन अनाधिकृत नळ घेतात त्यांचे बाबतीत पेनल्टी लावून कर करणे आवश्यक आहे. ज्यामुळे मनपाची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

श्री. रशिद मामूः- पाणीपट्‌टी वाढीव दर ज्यादा न आकारता जसेच्या तसे ठेवावे. मनपा हद्दीतील नळ कनेक्शन देतांना त्या कनेक्शन सोबत मिटर बसविणे आवश्यक आहे. कारण मिटर वरुन रिडींग नुसार पाणीपट्टी आकारणी होऊ शकते.

श्री नारायण फत्तेलष्करः- माझ्या मते घरगुती वापरासाठी अर्धा इंची नळाचे दर रुपये १०००/- ऐवजी रु. ६०० तर ३/४ इंची नळाला रुपये १८००/- ऐवजी रुपये १०००/- व १ इंची नळासाठी रुपये ३६००/- ऐवजी रुपये २५००/- ची आकारणी व्हावी आणि उद्योग धंदयासाठी रुपये ३६००/- ऐवजी रु. ३०००/- तर रुपये ४५००/- ऐवजी रुपये ४०००/- व रुपये १३,०००/- ऐवजी रूपये १०,०००/- करण्यात यावे.

श्री अजिजुल्ला बेगः- घरगुती वापरासाठी प्रस्तावित वाढीव दर रु. १०००/- दर्शविलेले आहे. त्यास आमचा विरोध असून तो कमी करण्यात यावा.

श्री. मुजिब आलमशाः- अनाधिकृत व अधिकृत नळ कनेक्शन बाबत वार्डवाईज झोनमधील कनिष्ठ अभियंता व सबओव्हरसिअर यांनी त्या त्या वार्डातील स. सदस्यांना सोबत घेऊन पाहणी करावी.

श्री अलफखान, श्री शंकर मगर, श्री प्रकाश जावळे, श्री गंगाधर गाडेः- पाणीपट्टी दराची वाढ या प्रस्तावात दर्शविलेल्याप्रमाणे योग्य नसून बऱ्याच मोठया प्रमाणात अनाधिकृत नळ कनेक्शन शहरात आहेत. त्याबाबत सर्व्हे करुन कार्यवाही होणे आवश्यक आहे. आणि जर काही भागामध्ये पाण्याच्या समस्या असतील त्या सुरळीत होण्यासाठी उपाय योजना त्वरीत होणे महत्वाचे आहे. काही लोक अनाधिकृत नळ कनेक्शन कट करण्यास आडकाठी येत असल्यास पोलीसाच्या सहकार्याने कार्यवाही करावी.

श्री. मोतीराम घडोमोडेः- पाणी दर वाढ करणे आावश्यक नसुन शहरातील प्रत्येक घरोघरी पुरवठा सुरुळीत होतो काय याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. नुसती वाढ

करण्यात काही अर्थ नाही. नळाला पुरेशे पाणी पुरवठा येत नसल्यास नागरीक पाणी पट्टी भरणार नाहीत.

श्री. रतनकुमार पंडागळे:- शहरातील ज्या नागरिकांकडे अनाधिकृत नळ कनेक्शन घेतलेले आहेत. त्या सर्व नागरिकांच्यासाठी नळ रेगुलर करुन घेणेबाबत काही पेनालटीसाठी स्थानिक वर्तमानपत्रात सुचना देवून जाहिर करावे आणि त्या व्यतिरिक्तही जे नागरिक नळ रेगुलराईज्ड करणार नाहीत. त्यांचे वर कार्यवाही करावी. आज अचानक दरवाढ न करण्यापेक्षा दरवर्षी थोडीशी वाढ करावी. एकदम दहा वर्षाने मोठी वाढ नागरीकांवर करणे योग्य नाही.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय:- अनाधिकृत नळ कनेक्शन धारकांना रेगुलराईज्ड करुन घेणेसाठी प्रशासकानेही सहकार्य करणे आवश्यक आहे.

श्री. प्रभाकर विधाते :-दर वाढीच्या प्रस्तावास माझा विरोध आहे.

श्री नारायण फत्तेलष्कर :- वार्डवाईज पाहणी करुन अनाधिकृत नळ कनेक्शन कट करण्याची कार्यवाही व्हावी.

श्री अजिज जहागिरदार:- अनाधिकृत नळ कनेक्शन धारकांना रुपये ६००/- पेनल्टी लावून रेगुलराईज्ड करुन घ्यावे.

श्री मोतीराम घडामोडे:- अर्धा इंची नळ कनेक्शनला अजिबात वाढ करु नये. बाकी कनेक्शनला वाढ करावी. परंतू अर्धा इंचीला वाढ करण्यास आमचा विरोध आहे.

श्री प्रदिप जैस्वाल श्री अलफ खॉंन:- घरगुती वापरासाठी रुपये १०००/-ऐवजी रुपये ५००/- तर रुपये १८००/- ऐवजी रुपये १०००/- ऐवजी आणि रुपये ३६००/- ऐवजी रुपये २५००/- करण्यात यावे.

श्री पांडूरंग पैठणकर:- पाणीपट्टी दर वाढीचा मी निषेध व्यक्त करतो.

श्री. चंद्रकांत खैरे:- पाणीवाढ न करता जी आहे तशीच ठेवावी त्यास आमचा विरोध म्हणून सभात्याग करतो ( अंदाजे २.१० वाजता सर्व सेना सदस्यांनी सभात्याग केला.)

श्री मनमोहनसिंग ओबेरॉय:- राजकारणासारखे डावपेच या ठिकाणी आखणे योग्य नाही.

श्री तकीहसन खान:- स. सदस्य श्री. खैरे एक आमदार असून पाणीपट्टी दरवाढीचा प्रस्ताव शासनाकडून आलेला आहे. तेव्हा जर नागरिकांचे हित पाहणारे आमदार असतील तर त्यांनी विधान सभेने प्रस्ताव मंजुर का करु दिला आणि या ठिकाणी सभात्याग लोकांना दाखविण्यासाठी करतात. अशा स. सदस्यांच्या बाबतीत सर्वांनी विरोध करावा.

श्री. मोतीराम घडामोडे:- अर्धा इंची नळाला रुपये ४००/- जसे दर आहे तोच ठेवण्यात यावा अन्यथा मी निषेध म्हणून सभात्याग करतो. (अंदाजे ३.१२ वाजता) त्याच वेळी शिवसेना सदस्यांचाही सभागृहात प्रवेश.

मा. महापौर :- सर्व स. सदस्यांच्या भावना लक्षात घेता प्रस्तावात दर्शाविल्याप्रमाणे नविन दर वाढ जास्तीचा न करता घरगुती वापरासाठी अर्धा इंची मुळ कनेक्शनसाठी रुपये १०००/- ऐवजी रुपये ५००/-तर ३/४ इंची साठी रुपये १८००/- ऐवजी १०००/- तर १ इंची नळासाठी रुपेय ३६००/- ऐवजी रुपये २५००/- करावे. त्याचप्रमाणे उद्योग धंदयासाठीचे दर अर्धा इंचीसाठी रुपये ३६००/- ऐवजी रुपये ३०००/-तर ३/४ इंची साठी रुपये ४५००/-ऐवजी रुपये ४०००/- व १ इंची साठी रुपये १३,०००/- ऐवजी १०,०००/- आकारण्यात यावे. आणि तात्पूरत्या स्वरुपासाठी

अर्धा इंची साठी रुपये ५००/- ऐवजी रुपये ३००/- तर ३/४ इंची साठी ८७५/- ऐवजी रुपये ६००/- व १ इंची साठी रुपये १३७५/- ऐवजी रुपये १०००/-व १०००/- ल. ला वाढी दर रुपये ८/- बांधकामासाठी करण्यात यावे.

**ठराव क्र ९९/१३:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतीक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४५८ अन्वये पाणी पुरवठयाचे उपविधी तयार केलेले आहेत. सदरील उपविधीतील कलम तील (३) मध्ये पाणीपट्टीचे सध्या अस्तित्वात असलेले दर अपुरे आहेत. महाराष्ट्र पाणी पुरवठा जलनिःसारण मंडळाने पाणी दरात दिनांक १/६/९२ पासून प्रति १०००/- लिटरला रुपये १.६५ ऐवजी रुपये २/- प्रमाणे वाढ केलेली आहे. त्यामुळे पाणी पुरवठा व्यवस्था व पाणी खरेदी यासाठी प्रतिवर्षी खर्च एकूण रु ५५०.०० लाख होईल. हा खर्च मनपास भरुन काढण्याच्या दृष्टीने सध्याचे नळ कनेक्शन व पाणी दरात वाढ करणे अनिवार्य आहे. या वाढीव दराबाबतही कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण हयांनी दर प्रस्थापित केल्यानुसार पाणीपुरवठा उपविधी सुधारित १९८७ च्या कलम ३ च्या परिशिष्ट मध्ये बदल करण्यात येतील त्यानुसार सोबतच्या तक्त्यात बदल केल्यानुसार प्रस्थापित बदलाबाबत नागरिकांना काही हरकती सुचना असतील त्यांची सुनावणी स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द झाल्या पासून सहा आठवडयांच्या कालावधी देऊन करण्यास सर्वानुमते कालावधी देऊन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. (सोबत तक्ता जोडला आहे.)

**<u>नळ कनेक्शनचे जुने दर व प्रस्तावित वाढीव दर, मिटरचे दर खालील प्रमाणे.</u>**

| जुने नळ कनेक्शनचे दर | | | नविन नळ कनेक्शनचे दर | |
|---|---|---|---|---|
| **नळ कनेक्शन** | **जुने दर** | **मिटरचे दर** | **प्रस्तावित वाढीव दर** | **प्रस्तावित मिटरचे वाढी दर** |
| **घरगुती वापरासाठी** | | | | |
| १५ एम.एम.Ø (१/२") | रु. ४००.०० | १००० लि. ला रु. १.१५ | ५००/- | १०००लिटरला रु. २.५० |
| २० एम. एम. Ø (३/४") | रु. ७३०.०० | १००० लि. ला रु. १.१५ | १०००/- | १०००लिटरला रु. २.५० |
| २५ एम. एम. Ø (१") | रु. ११६०.०० | १००० लि. ला रु. १.१५ | २५००/- | १०००लिटरला रु. २.५० |
| **उदयोग धंदयासाठी** | | | | |
| १५ एम.एम. Ø (१/२") | रु. १४५०.०० | १००० लि. ला ४.०० रु. | ३०००/- | १००० लिटरला रु. ८.०० |
| २० एम. एम. Ø (३/४") | रु. २६५०.०० | १००० लि. ला ४.०० रु. | ४०००/- | १००० लिटरला रु. ८.०० |
| २५ एम. एम. Ø (१") | रु. ४२००.०० | १००० लि. ला ४.०० रु. | १०,०००/- | १००० लिटरला रु. ८.०० |
| **तात्पुरत्या स्वरुपाचे** | | | | |
| १)१५ एम.एम. Ø (१/२") | रु. २००.०० दरमहा | -- | -- | ३००/- दरमहा |
| २)२० एम. एम. Ø (३/४") | रु. ३५०.०० दरमहा | -- | -- | ६००/- दरमहा |
| ३)२५ एम. एम. Ø (१") | रु. ५५०.०० दरमहा | -- | -- | १०००/- दरमहा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४)१००० लि. ला दरमहा बाधकामासाठी | रु. ४.५० पैसे | -- | -- | ८/- |

## ऐनवेळचा विषय

**विषय क्र. १००/१४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासनाच्या मेहतर मुक्ती कार्यक्रमांतर्गत व कमी खर्चाची स्वच्छता योजना अंतर्गत विविध महानगरपालिका व नगरपालिका नविन संडास बांधण्याचे उददीष्ट देण्यात आले आहे. त्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेस कमी उत्पन्न गट वर्गासाठी एकूण ११००/- नविन संडास बांधण्याचे उद्दीष्ट देण्यात आले आहे. शासनाच्या परिपत्रकास अधिन राहून सदरील कामाचे रक्कम रुपये ३१,६२,५००.०० (रु. एकतीस लाख बासष्ट हजार पाचशे फक्त) चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. शासनाच्या हिशोबाने प्रति संडास रुपये २७००.०० (रु सत्ताविशे) एवढा खर्च धरला आहे. सदरील तरतुद समोर ठेवून अंदाजपत्रक तयार केले असता, प्रति संडास खर्च रुपये २८७५.०० (रु. अठ्ठाविशे पंच्याहत्तर) एवढा खर्च प्रत्यक्षात लागणार आहे. सदर योजना औरंगाबाद शहरातील फक्त कमी उत्पन्न गटातील घरांसाठीच बनवलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाचे दिनांक २७/८/९० चे परिपत्रकानुसार खालील प्रमाणे तत्व ठरवून दिले आहे.

| अर्थ सहाय्य | कर्ज | लाभधारकाकडून वर्गणी |
|---|---|---|
| २५% | ६०% | १५% |

वरील तरतुदीनुसार मनपाने एक संडास बाधंणेसाठी लागणार अपेक्षित खर्च रुपये २८७५/- एवढा धरला आहे. त्यापैकी अर्थसहाय्य रुपये ७१८.७५ पैसे एवढे असेल. कर्ज रुपये १७२५.०० एवढे घ्यावे लागेल व लाभधाराकांकडून वर्गणी रुपये ४३१.२५ पैसे घ्यावी लागणार आहे. तसेच यातील कर्जाच्या रक्कमेची फेड लाभधारकाने पाच वर्षात मालमत्ता कराबरोबर करावी. अशी अट लाभधारकावर ठेवण्यात येईल. त्यानुसार एकूण ११००/- संडससाठी खालील प्रमाणे एकंदरीत आर्थिक तत्व राहील.

| शासनाकडून सहाय्य | हडकोकडून कर्ज | लाभधारकाकडून वर्गणी |
|---|---|---|
| २५% | ६०% | १५% |
| (७,९०,६२५.००) | (१८,९७,५००.००) | (४,७४,३७५.००) |

वरील तत्वात एक संडाससाठी अंदाजे खचे रु २८७५.०० एवढा धरला आहे.

तर यापैकी ६०% कर्ज रु. १८,९७,५००.०० हडकोकडुन घ्यावे लागणार आहे. सदरील कर्ज घेण्यास मंजुरी मिळवी त्यासप्रमाणे अंदाजतपत्रक रक्कम रु. ३१,६२,५००.०० ला मंजुरी

मिळावी. तसेच या योजनेचा लाभ मिळाल्याच्या तारखेपासून पाच वर्षाच्या आत लाभार्थीकडून ६०% कर्ज वसुली करणेस मंजुरी मिळावी.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :-**

मा. महापौर :- मंजुर.

**ठराव क्र. १००/१४:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासनाच्या मेहतर मुक्ती कार्यक्रमांतर्गत व कमी खर्चाची स्वच्छता योजना अंतर्गत विविध महानगरपालिका व नगरपालिका नविन संडास बांधण्याचे उद्घिष्ट देण्यात आले. त्याचप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिक कमी उत्पन्न गट वर्गासाठी एकूण ११००/- नविन संडास बांधण्याचे उद्घिष्ट देण्यात आले. शासनाच्या परिपत्रकास अधिन राहून सदरील कामाचे रक्कम रुपये ३१,६२,५००.०० चे अंदाजपत्रक आहे. शासनाच्या हिशोबाप्रमाणे प्रति संडास रु २७००.०० एवढा खर्च धरला आहे व ही तरतुद समोर ठेवून रुपये २८७५.०० प्रत्यक्षात खर्च लागणार आहे. सदरची योजना औरंगाबाद शहरातील फक्त कमी उत्पन्न गटातील घरासाठीच बनविण्यात आलेली आहे. यापैकी शासनाकडून २५% अर्थ सहाय्य रु. ७,९०,६२५.०० तर हडकोकडून कर्ज ६०% रु. १८,९७,५००.०० व लाभधरकाकडून वर्गणी १५% रुपये ४,७४,३७.०० होणार यासाठी अंदाजपत्रकातील रक्कम रुपये ३१,६२,५००.०० च्या खर्चास मंजुरी व या योजनेच्या लाभ मिळल्याच्या तारखेपासून पाच वर्षाच्या आत लाभार्थीकडून ६०% कर्ज वसुली करणेस सर्वासनुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरित/-<br>
सचिव,<br>
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २०/२/१९९३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधरण सभेचे इतिवृत्त**

**शनिवार दिनांक २०/२/९३ रोजी (अंदाजे, ठिक ११.१० वाजता मा. महापौर श्री. यादव अशोक सायन्ना यांचे अध्यक्षतेखाली "वंदे मातरम्" या गिताने सर्वसाधारण सभेस सुरुवात झाली. गणपुर्ती आभावी सभा दुपारी २.०० वाजेपर्यन्त तहकूब करण्यात आली. दुपारी २.३० वाजता सभेस पुन्हा सुरुवात झाली.**

**या सभेस मा. आयुक्त, उप आयुक्त तथा अधिकरी आणि खालील स. सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री अजिमखान दादामियाँ अ. रहेमान | स. सभासद |
| २. | मा. श्री विधाते प्रभाकर सिताराम | -//- |
| ३. | मा. श्री अजिजुल्ला बेग वाहेद बेग | -//- |
| ४. | मा. श्री पंडागळे रतनकुमार नारायण | -//- |
| ५. | मा. श्री गंगाखेडकर धनंजय मनोहरराव | -//- |
| ६. | मा. श्री सोनवणे केशव काशिनाथ | -//- |
| ७. | मा. श्री भगुरे तुळशीराम छगन | -//- |
| ८. | मा. श्री सुर्यवंशी महादेव पुडंलीक | -//- |
| ९. | मा. श्री पाटील नरेंद्र यादवराव | -//- |
| १०. | मा. श्री घडोमोडे मोतीराम नारायणराव | -//- |
| ११. | मा. श्री म. आयुब गुलाब जिलानी | -//- |
| १२. | मा. श्री मुजीब आलमशा खान | -//- |
| १३. | मा. श्री प्रधान बंडू गोविदराव | -//- |
| १४. | मा. श्री नारायण मोहन फत्तेलष्कर | -//- |
| १५. | मा. श्री जावेद हसनखान कासिमहसन खान | -//- |
| १६. | मा. श्री तकीहसनख्ंान कासिमहसन खान | -//- |
| १७. | मा. श्री स. अहमद एकबालूद्दीन स. मा. कुतुबुद्दीन | -//- |
| १८. | मा. श्री गिल इकबालसिकंग प्रितमसिंग | -//- |
| १९. | मा. श्री अ. रशिदखान (मामू) अ. हमीदखान | -//- |
| २०. | सौ. दलाल लता श्रीनिवास | -//- |
| २१. | मा. श्री जैस्वाल प्रदिप शिवनारायण | -//- |
| २२. | मा. श्री खैरे चंद्रकांत भाऊराव | -//- |
| २३. | मा. श्री कवडे शिवाजी लक्ष्मणराव | -//- |
| २४. | मा. श्री ज. संचेती चेनकरण गणेशलाल | -//- |
| २५. | मा. श्री म. इस्माईल अ. करीम | -//- |
| २६. | मा. श्री अलम बेग मिर्झा कलम बेग | -//- |
| २७. | मा. श्री मोहसिन अहमद बशीर अहमद | -//- |
| २८. | मा. श्री स. हुसैन स. अहमद | -//- |
| २९. | मा. श्री मानकापे नामदेवराव शामराव | -//- |

३०. मा. श्री पैठणकर पांडूरंग भिमाजी -//-
३१. मा. श्री सुग्रीम हरलाल रिडलान -//-
३२. मा. श्री अलफखान हुसैन खान -//-
३३. मा. श्री वाघमारे सुदाम भानुदास -//-
३४. मा. श्री पेरकर विठ्ठल कोंडाजी -//-
३५. मा. श्री थोरात किशोर गोविंदराव -//-
३६. मा. श्री शिंदे मधुकरराव माणिकराव -//-
३७. मा. श्री डॉ काळे शांताराम यंशवंतराव -//-
३८. मा. श्री दत्त प्रदिपकुमार एस. -//-
३९. मा. श्री ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग -//-
४०. मा. श्री बारवाल गजानन रामकिसन -//-
४१. मा. श्री मोटे राधाकृष्ण तुळशीराम -//-
४२. मा. श्री जावळे प्रकाश शिवराम -//-
४३. मा. श्री गाडे गंगाधर सुखदेव -//-
४४. मा. श्री हाळनोर गिरजाराम नानाराव -//-
४५. मा. श्री कुमावत अविनाश लक्ष्मणराव -//-
४६. मा. श्री नवपुते कचरु चंद्रभान -//-

**संवाद :-**

मा. महापौर :- सभागृहात कोरम अभावे दुपारी २.०० वाजेपर्यंन्त सभा तहकुब करण्यात " तहकुब" करण्यात आलेली अंदाजे दुपारी २.३० वाजता पुन्हा सुरु केली.

श्री. रतनकुमार पंडागळे:- शहरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नामवंत व्यक्ती औरंगाबाद महानगरपालिके मार्फत पुरस्कार प्रदान करण्याचे ठरलेले असतांना एका मा. आमदाराच्या सुचनेनुसार ठरविण्यात आलेले कार्यक्रम ऐनवेळी रद्द करण्यात आला. याबाबत मी एक निवेदन करित आहे कृपया माहिती द्यावी.

श्री. अविनाश कुमावत :- सदरचा विषय इतिवृत्तातील नसल्याचे यावर विचार करता येऊ नये. (यावेळी अनेक स. सदस्यांमध्ये बोलण्यास आवाज ऐकू येतो. काहीही ऐकू येत नाही.)

श्री. रतनकुमार पंडागळे:- शहरातील प्रतिष्ठीत नागरीकांच्या सन्माना बरोबरच कर्मचारी वर्गाचांही सत्कार होणार होता. परंतू सदरील कार्यक्रमच रद्द झाल्याने हा सन्मान कर्त्याचा अपमान झालेला आहे, नव्हेतर याबाबत सभागृहाचाही अपमान झालेला आहे.

श्री. धनंजय गंगाखेडकर:- नियोजीत कार्यक्रम ठरल्याप्रमाणे होणे आवश्यक होते.

श्री. नरेंद्र पाटील:- ऐनवेळी कार्यक्रम रद्द झाल्याने प्रतिष्ठीत नागरीकांचा अपमान झालेला आहे. ही बाब खेदाची आहे.

(यावेळी सेना सदस्य प्रदिप जैस्वाल गिरजाराम हाळनोर, मधुकर शिंदे, व रतनकुमार पंडागळे वगैरचा मोठमोठयाने आवाज काहीही ऐकू येत नाही.

श्री रतनकुमार पंडागळे:- एका मा. आमदरांच्या सुचनेनुसार कार्यक्रम रद्द करणे योग्य नसुन या बाबत आम्ही आंमदारांचा निषेध करुन सभात्याग करतो. (यावेळी आमदार चंद्रकांत खैरे यांचा निषेध व्यक्त करित कॉंगेस आघाडीचे नगरसेवक सभात्याग करतात. अंदाजे २.४० वाजता) त्याच वेळी प्रत्युत्तर म्हणून सेना सदस्य आमदार चंद्रकांत खैरे यांचा विजय असो अशा घोषना सभागृहात देतात.)

श्री. गंगाधर गाडे:- सत्काराचा कार्यक्रम ऐनवेळी रद्द होण्यास कारण काय याची माहिती द्यावी.

(त्यावेळी सभात्याग केलेल्या सदस्यांचे सभागृहात प्रवेश अंदाजे २.४१ वाजता)

श्री. नारायण फत्तेलष्कर:- मी एक प्रश्न तोंडी उपस्थित करीत आहे. एखादया स. सदस्यांचे एखादया अधिकारी/कर्मचारी यांचे बरोबर काहीही बिनसले तर अधिकारी याचे सुचनेनुसार कार्यालयीन तक्रार नोंदविल्या जाते व कार्यवाही होते. तथापि एखादया कार्यालयीन वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्यांचे अधिपत्याखाली कामकरणाऱ्या कर्मचाऱ्याने चाकू दाखवून धाक दाखविला ते अधिकारी म्हणजे जकात अधिक्षक यांना चाकू दाखविण्यात आला. त्याबाबत तक्रार नोंदविण्यात आली काय? याची माहिती द्यावी.

श्री. रशिद मामू:- याबातची माहिती सभागृहात मिळणे आवश्यक आहे.

मा महापौर :- जकात अधिक्षक यांनी माहिती द्यावी. केवळ याच प्रश्नावर चर्चा होईल त्यांनतर इतिवृत्तावर चर्चा होईल.

जकात अधिक्षक:- स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाप्रमाणे मला आतापर्यंन्त कुणीही चाकू दाखविलेला नाही. जर असा प्रकार घडला असता तर तक्रार नोंदविली असती.

श्री. नारायण फत्तेलष्कर:- संबंधित अधिकाऱ्यांना जर चाकू दखविला नसेल. ही गोष्ट स्पष्ट असल्यास मी माझ्या नगरसेवक पदाचा राजीनामा देण्यास तयार आहे, नाही तर संबंधित अधिकाऱ्यांनी राजीनामा द्यावा किंवा त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात यावे. या संदर्भात जकात विभागातील अनेक तक्रारी असून जकात नाक्यावरील मोंढा, बस स्टॅंड, नगरनाका व मुंबई नाका येथील जकात वसुलीचा गेल्या दोन महिन्यातील माहिती येत्या २४ तासात स्थायी समितीच्या बैठकीत देण्याची व्यवस्था ठरावी. अन्यथा मला अनेक मार्ग अवलंबवावे लागतील. त्या विभागातील जवान काय कामे करतात ते पाहणी करावी.

मा. महापौर :- ठिक आहे. आपण सुचित केल्याप्रमाणे सविस्तर माहिती देण्यात येईल.

श्री. नारायण फत्तेलष्कर:- मी जे बोलतो ते सर्व सत्य असून, संबंधित अधिकाऱ्यांना विचारुन सांगावे अन्यथा याबाबत चौकशी व्हावी. संबंधित बाबतीत एका स. सदस्यायंचे बंधु असुन त्याबाबतीत त्वरीत कार्यवाही व्हावी.

श्री. प्रदिप जैस्वाल:- स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे मा.महापौरांनी चौकशी करावी.

श्री. गंगाधर गाडे:- स. सदस्य श्री फत्तेलष्कर जबाबदारीने आपले मत मांडत असून या मागे काय सत्यता आहे ते खोलात जाऊन पाहणे आावश्यक आहे किंवा संबंधित अधिकारी हे जकात विभागाचे असून अशा प्रकारे धाक दाखवून त्यांनी कुठेही वाटता करु नये असे जर असेल तर ते योग्य नाही.

श्री. धनंजय गंगाखेडकर:- स. सदस्य श्री. फत्तेलष्कर यांच्या सुचनेनुसार संबंधित कर्मचारी कोण आहे. त्याचे बाबतीत चौकशी व्हावी आणि वेळ पडल्यास बदली करावी.

श्री. मधुकर शिंदे:- स. सदस्यांनी सुचित केल्यानुसार सदरील कर्मचाऱ्याचे नाव जाहीर करावे.

मा. महापौर :- याबाबत एक चौकशी समितीचे गठण करण्यात येत असून, त्यामध्ये सभागृह नेता, विरोधी पक्ष नेते, स्थायी समिती सभापती आणि स. सदस्य श्री. गाडे हे राहतील. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना चाकु दाखविला ही बाब चौकशी करुन सभागृहात अहवाल सादर करतील.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय:- या प्रकरणाची चौकशी करण्याची आवश्यकता नाही.

श्री. रतनकुमान पंडागळे:-अद्यापपर्यन्त किती प्रकरणाची चौकशी करण्यात आली. याची माहिती द्यावी.

मा. महापौर :- आता इतिवृत्तांवर चर्चा करण्यात यावी.

## इतिवृत्तावर चर्चा

**विषय क्र. १०१/१:-**

दिनांक १९/१/९३ (दिनांक १९/१२/९२ रोजी तहकुब करण्यात आलेली आणि ३०/१२/९२ रोजी पुढे ढकलण्यात आलेली) आणि दिनांक २०/१/९३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेस इतिवृत्त कायम करणे.

**संवाद:-**

श्री. प्रकाश जावळे:- इतिवृत्तातील पान क्र. १३ मध्ये मा. महापौर यांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे बाबतीत मा. आयुक्त चौकशी करतील असे सुचित केले होते. त्यानुसार सभागृहात अहवाल दाखवावा आणि त्याच्या प्रति सर्व सदस्यांना घाव्यात.

श्री. प्रदिप जैस्वाल:- आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे बाबतीततील चौकशी रद्द करण्यात यावे, या संदर्भात ४८ स. सदस्यांनी पत्राद्वारे मा. महापौर व मा. आयुक्त यांना दिलेले आहे. त्युानसार चौकशी रद्द व्हावी.

श्री. गंगाधर गाडे:- सभागृहा बाहेरील कामकाज आणि सभागृहातील कामकाज यामध्ये फरक आहे. सभागृहात मा. माहापौरांनी दिलेला निर्णय सभागृहाच्या बाहेर गेल्यांनंतर पत्राने लिहून देणे योग्य नसुन स. सदस्य श्री. प्रदिप जैस्वाल यांनी सुचित केल्यानुसार ४८ स. सदस्यांचे स्ववाक्षरित असलेले आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांची चौकशी होऊ नये. बाबत मागणी अमान्य करावी ही विनंती. कारण शहरातील जनतेला आरोग्य व विशेषत: गॅस्ट्रोने मृत्यूमुखी पडलेल्या संदर्भात काय घडले याची माहिती मिळणे आवश्यक आहे.

श्री. तकीहसन खान:- ज्या ४८ स. सदस्यांनी आपल्याकडे लेखी निवेदन दिलेले आहे. त्याबाबत त्यांची मागणी मान्य करणे योग्य आहे. कारण महापौरांच्या वार्डातील एका शाळेतील शिक्षकास निलंबीत केले परंतू इतिवृत्त कायम करतेवेळी तो निर्णय सभागृहाच्या संमतीने पुन्हा निलंबन रद्द करण्यात आला. त्यानुसार याचाही विचार व्हावा.

श्री. प्रकाश जावळे:- सभागृहात झालेला निर्णय आणि सभागृहा बाहेरुन पत्राने कळविण्यात आलेला निर्णय यामध्ये तफावत आहे.

श्री. रशिद मामू:- यापूर्वी असे झालेले आहे की, सभागृहाने घेतलेल्या निर्णयावर स्थायी समितीमध्ये संबंधित कर्मचारी/अधिकारी यांना परत घेतले जातात. तर या सभागृहास अर्थच काय? ४८ स. सदस्यांना ज्या स्वाक्षाऱ्या केलेल्या आहेत. त्यांना काहींना उल्लू बनवून स्वाक्षरी घेतले आहेत.

श्री. रतनकुमार पंडागळे:- स. सदस्यांनी उल्लू बनवून स्वाक्षरी केल्या, ते बोलणे योग्य नाही.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय:- स. सदस्यांनी सभागृहात स. सदस्यांना उल्लू म्हणून संबोधित केले. त्याबाबत सभागृहाची माफी मागावी.

मा. महापौर :- स. सदस्य श्री रशिद मामू याबाबत आपण सभागृहाची माफी मागावी.

श्री. रशिद मामू:- स. सदस्य श्री. पंडागळे यांनी म्हटले की, उल्लू बनवून स्वाक्षऱ्या केल्या तर ६० स. सदस्य उल्लू आहेत काय असे म्हटले, त्यामुळे माफी मागण्याचा प्रश्नच नाही.

श्री. बंडू प्रधान:- स. सदस्य श्री.रशिद मामू यांनी सभागृहात माफी मागितली नाही तर, आम्हीही पुढे कधीच माफी मागणार नाही.

श्री. प्रदिप जैस्वाल:- स. सदस्यांनी आपले शब्द परत घ्यावे.

श्री. प्रकाश जावळे:- सभागृहात कोणत्याही स. सदस्यांनी बेजबाबदार पणे बोलणे योग्य नसून, संबंधितांना ताकीद देण्यात यावी.

मा. महापौर :- स. सदस्य श्री. रशिद मामू आपणांस सुचित करण्यात येते की, याबाबत आपण माफी मागावी.

श्री. रशिद मामू:- स. सदस्य श्री. पंडागळे यांनी म्हटले की, उल्लू बनवून स्वाक्षऱ्या घेतल्या तर, मी म्हटले मग ६० स. सदस्य उल्लू आहेत काय?

मा. महापौर :- स. सदस्य श्री रशिद मामू आपणांस सुचित करण्यात येते की, आपण आपले शब्द परत घ्यावे.

श्री. रशिद मामू:- मी माझे शब्द परत घेत नाही. आपणास मला निलंबीत करावयाचे असल्यास करावे.

श्री. मधुकर शिंदे:- मा. महापौर आपणांस स. सदस्य धमकी देतात ते सभागृहात योग्य वाटत नाही.

मा. उप महापौर:- सभागृहात ६० स. सदस्य असतात. त्यापैकी काही वरिष्ठ सदस्य गप आहेत, त्या सर्वांचा विचार करणे आवश्यक आहे.

मा. महापौर :- स. सदस्य श्री. रशिद मामू आपणांस पुन्हा एकदा विनंती करण्यात येते की, स. सदस्यांच सुचनेनुसार सभागृहात माफी मागावी किंवा आपले शब्द परत घ्यावे.

श्री. रशिद मामू:- मी तसे बोललेला आहे, परुंतू मी माफी मागणार नाही.

श्री. बंडू प्रधान, गंगाधर गाडे, मधुकर शिंदे , प्रकाश जावळे:- याबाबत निर्णय व्हावा. ज्यादा चर्चा सभागृहात करणे ठिक नाही.

मा. महापौर :- स. सदस्य श्री. रशिद मामू याबाबत आपण माफी मागावी.

मा. महापौर :- आपले एक दिवसाचे (आजचे ) सदस्यत्व रद्द करण्यात येते. (यावेळी स. सदस्य श्री. रशिद मामू जातीयवादी निर्णय म्हणून सभागृहाबाहेर निघुन जातात. वेळ अंदाजे ३.२५ वा.)

श्री. मनमोहनसिंग आबेरॉय :- स. सदस्यांनी जातीयवादाचा उल्लेख केला तो इविृत्तातून वगळण्यात यावा.

श्री. अविनाश कुमावत :- एका महिन्यासाठी स. सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात यावे.

श्री. गंगाधर गाडे :- तिन महिन्यासाठी स. सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात यावे.

मा. महापौर :- ठिक आहे. आता यावर पडदा पडत आहे.

श्री. मुजिब आलमशा :- मी आपल्याकडे ऐनवेळचा प्रस्ताव दिलेला आहे. त्यावर कार्यवाही व्हावी. मजनुहील येथी शताब्दीनगर (अशोक नगर) येथे जी घरे बांधून दिली त्या ठिकाणी आठ दिवसापूर्वी ग्रामीण पोलीस विभागाने रस्त्यावर तार कंपाऊड केलेले आहे. ज्यामुळे नागरीक जाणे येणेचा रस्ताच बंद झालेला आहे. त्यावर त्वरीत कार्यवाही व्हावी. मी गेल्या एक महिन्यापासून त्यावर चर्चा करीत आहे.

मा. महापौर :- संबंधित निवेदनावर इतिवृत्त कायम केल्यानंतर चर्चा करण्यात येईल. आता स. सदस्य श्री प्रकाश जावळे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर इतिवृत्तातील पान क्र. १३ मध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे बाबतीत एक चौकशी मा. आयुक्त यांचे मार्फत करण्याचे सर्वानुमते ठरेल आणि त्याप्रमाणे मा. आयुक्त यांनी चौकशी गोपनीय अहवाल माझ्याकडे सादर केलेला आहे आणि तो अहवाल एकंदरीत ४० ते ५० पानाचा असून वाचून दाखविणे शक्य नसल्याने सर्व स. सदस्यांना याच्या झेरॉक्स प्रति देण्यात येतील याबाबतचा योग्य तो निर्णय सभागृहाने घ्यावयाचा आहे. स. सदस्य श्री. प्रदिप जैस्वाल यांनी सुचित केल्याप्रमाणे ४८ स. सदस्यांच्या स्वाक्षऱ्या असलेले निवेदन दिले परंतू स. सदस्यांनीच निर्णय घेतल्यानंतर व महापौरांनी त्यावर निर्णय दिल्यानंतर सदरील अहवाल प्राप्त झाला आहे. तेव्हा आपल्याला काय करायचे तो आपण सर्वांनी निर्णय घ्यावयाचा आहे.

श्री. मधुकर शिंदे :- चौकशी करायची किंवा नाही यावर पोल करण्यात यावे.

श्री प्रदिप जैस्वाल :- सदरील अहवाल रद्द करण्याबाबत ४८ स. सदस्यांनी स्वाक्षऱ्या केलेले निवेदन आपल्याकडे दिलेले आहे. त्यामुळे प्रश्नच उद्‌भवत नाही (यांवेळी सभागृहात जोरजोरात आवाज होत असतो, काहीही ऐकू येत नाही)

श्री प्रकाश जावळे :- अहवाल संदर्भात काय आहे ते सभागृहात वाचून दाखविले तर अधिक चांगले होईल आणि जोपर्यंन्त अहवालाच्या झेरॉक्स प्रति सर्व स. सदस्यांना देण्यात येणार तोपर्यंन्त मा. महापौर यांच्या कस्टडीत असावी.

श्री मधुकर शिंदे:- मो. पडेगाव येथील घडलेल्या प्रकरणा बाबतचा अहवाल सभागृहात दाखल करावा.

मा. महापौर :- सदरचा विषय या ठिकाणी नसून यावर चर्चा करता येणार नाही.

श्री. बंडू प्रधान :- मा. महापौर आपण कोणत्याही बाबतीत बळी न पडता आपला निर्णय ठाम ठेवावा. आम्हीही ४८ स. सदस्यांच्या पेक्षाही जास्त स. सदस्याच्या स्वाक्षऱ्या असलेल्या व अहवाल विरोध नसल्याचे निवेदन आणुन देतो. कृपया आपण बळी पडू नका.

श्री. मनमोहनसिंग आबेरॉय, श्री नारायण फत्तेलष्कर, श्री नरेंद्र पाटील, श्री बंडू प्रधान, श्री रतनकुमार पंडगळे:- आपण जो निर्णय दिलेला आहे तो निर्णय स. सदस्यांना मान्य असून त्यानुसार कार्यवाही व्हावी.

श्री. तकीहसन खान:- सदरील निर्णय आम्हाला मान्य नसून सभागृहात हात उंचावून निर्णय घेण्यात यावा.

मा. महापौर:- सर्व स. सदस्यांना अहवालाच्या झेरॉक्स प्रती वाटप करण्यात येणार आहेत. त्यामुळे होकार किंवा नकार याचा निर्णय आपण ठरविणार आहात.

श्री. प्रदिप जैस्वाल:- ४८ स. सदस्यांच्या स्वाक्षऱ्या असलेले निवेदन इतिवृत्त कायम करणेपूर्वी दिलेले आहे. त्यामुळे अहवाल रद्द करण्यात यावा. त्यावर निर्णय होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

मा. महपौर :- स. सदस्य श्री. प्रदिप जैस्वाल आपण सुचित केल्याप्रमाणे ४८ स. सदस्यांनी स्वाक्षरी केलेले निवेदन दिले परंतू सभागृ्हाने केलेला निर्णय होता. त्यानुसार कार्यवाही झालेली आहे. तेव्हा झेरॉक्सच्या प्रति वाटप केल्यानंतर आपणास अहवाल रद्द करायचा किंवा नाही त्यावर निर्णय ठरवायचा आहे.

श्री. धनंजय गंगाखेडकर:- सध्या पाचवा महापौरांचा कालावधी चालू आहे. परंतू पाच वर्षाच्या कालावधीत बऱ्याचशा चौकशी समिती यांचे गठण करण्यात आले. परंतू कोणताही अहवाल सभागृहासमोर आलेला नाही. आश्चर्य वाटते की, सभागृहाने ठरविल्यानुसार प्रशासनाने चौकशी करुन इतक्या लवकर शिस्तीने सदस्या अहवाल सादर केला. यायोगे काही तरी हेतू आहे. ही एक गंभीर बाब आहे की, नगरसेवकांनी मांडलेल्या प्रश्नावर प्रशासनाने एवढया पोटनिवडणूकीने अहवाल सादर केला आणि इतर काही सभागृहातील निर्णय नगरसेवकांचे असल्यास त्याचे प्रशासन अंमलबाजावणी करीत नाही. त्यामुळे प्रशासनास वाटले तर करायचे आणि नाही वाटले तर करायचे नाही. ही बाब योग्य नसून आतापर्यन्त जेवढया चौकशी समित्या नेमण्यात आलेल्या होत्या. त्या सर्व संदर्भाने पुढील बैठकीत अहवाल येणे आवश्यक आहे. ही आमची भूमीका आहे. ज्यांना पाठीशी घालावयाचे असते. त्यांना पाठीशी घातल्या जाते याचे गांभीर्य लक्षात घ्यावे.

श्री. बंडू प्रधान :- सभागृह नेत्यांना माहिती नसावी की, या चौकशी संदर्भात स. सदस्यांच्या भावना प्रतिक्रिया किती तिखट होत्या त्या जाणून घ्याव्यात.

श्री. प्रकाश जावळे :- सहा लाख जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने हितावह आहे. किंवा नाही या बाबत गांभीर्याने चर्चा चालू असतांना चौकशी करण्याचा निर्णय झालेला आहे. त्यानुसार चौकशी अहवाल प्राप्त झाला. यामध्ये कोणत्याही अधिकारी/कर्मचारी यांचे विरोध/बाजुने हेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यामुळे सभागृह नेत्यांनी केलेला आरोप परत घेण्यात यावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :- चौकशी अहवाला बाबत सभागृहात झालेला निर्णय होता. त्यामुळे आदर करणे आवश्यक आहे. एका बाजूला निर्णय झाल्यानंतर प्रशासनाने काय कार्यवाही केली अशी ओरड आपण सर्वच जण करतो. तर दुसरीकडे प्रशासनाने कार्यवाही करुन अहवाल दिला तर त्यावरही नगरसेवकांचे प्रतिक्रीया येतात म्हणजे यामुळे प्रशासनाने काम करावे किंवा नाही असा मार्ग निर्माण होतो. ४८स. सदस्यांनी या अहवालावर विरोध म्हणून स्वाक्षाऱ्या करुन निवेदन दिले तर दुसरीकडे सभागृहात आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे

बाबतीत चौकशी व्हावी असे ठामपणे म्हणत होते म्हणजे स. सदस्य श्री. प्रदिप जैस्वाल स. सदस्य मध्ये दोन गट पाडत आहेत. त्यामुळे कोणतीही कार्यवाही होणे शक्य नाही. असे मला वाटते.

सौ. लता दलाल :- पाच वर्षाच्या कालावधीमध्ये बऱ्याचशा चौकशा समित्यांचे गठण करण्यात आले. परंतू कोण्त्याही चौकशीचे अहवाल या ठिकाणी प्राप्त झाले नाही. आणि आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे बाबतीतला चौकशी अहवालावर इतिवृत्तात कोणताही असा उल्लेख नाही की, सदरचा अहवाल एक महिन्याच्या आत व इतिवृत्त कायम होणेपुर्वी सभागृहासमोर ठेवावा. जर तसा उल्लेख असेल तर मी राजीनामा देण्यास तयार आहे. असे नसतांनाही इतक्या तातडीने अहवाल सभागृहासमोर येणे म्हणजे निश्चितच यामागे राजकारण आहे.

श्री. नरेंद्र पाटील :- गेल्या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये सभागृहात अधिकारी/कर्मचारी यांचे बाबतीत जास्तीची चर्चा होत असते. सर्व वेळ यामध्ये वाया जात असतो. जर एखादया अधिकारी कर्मचारी वर्गाचा काही दोष असल्यास मा. आयुक्त यांनी स्वत: चौकशी करुनच नंतर स. सदस्यांनी त्यांवर बोलावे. अन्यथा वेळ वाया घालविण्यात काहीही अर्थ नाही. चौकशी अहवालासंबंधी पुढील बैठकीत योग्य तो निर्णय होईल. आता यावर जास्त चर्चा न करता येथेच चर्चा संपवावी.

श्री. प्रदिप जैस्वाल :- माझ्या वार्डामध्ये आरोग्य केंद्र आहे. मी मागील सभेत सुचविले होते की, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे बाबतीत चौकशी करावयाची झाल्यास आताच सभागृहाबाहेर जावून आरोग्य केंद्राची पाहणी करावी त्यावेळी कुणीही धजले नाही. तेव्हा ४८ स. सदस्यांनी दिलेल्या निवेदनाप्रमाणे इतिवृत्त कायम होणेपूर्वी संबंधित अहवालास विरोध दर्शवून रद्द करण्याचे सुचित केले आहे. त्यावर कायम व्हावे अशी मी विनंती करतो.

श्री. मुजिब आलमशा खान :- मो. गणेश कॉलनी ते पंचायत समिती फाजलपुरा भागामध्ये रुपये ४ ते ४.५० लाखाचे ड्रेनेज लाइन टाकून देण्याचे अंदाजपत्रक संमत करण्यात आले, परंतू अद्यापही त्यावर कार्यवाही झालेली नाही. याबाबत गेल्या दोन तीन वेळेस सभागृहात विचारणा केली असता, चौकशी करण्यात येईल असे सुचित करण्यात आले . त्यामुळे या प्रश्नावर चौकशी करुन माहिती द्यावी.

श्री. गंगाधर गाडे :- सभागृहा नेता यांनी केलेल्या निवेदनाबाबत मला आश्चर्य वाटते की, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी स्लम भागातील गरीब लोकांसाठी जे उपचार करावयास औषधी व पुरवठा करावयास पाहिजे ते करीत नाही. उलट स्लम भागातील चार पाच मृत्युमूखी पडले त्याचे गांभीर्य लक्षात घेता आणि मागील सभेत मी सुचित केल्याप्रमाणे अन्न व भेसळ या कार्यालयातील तपासणी पथक औषंधाची तपासणी करण्यासाठी आले, असतांना त्यांना योग्य ते सहकार्य न करणे ही खेदांची बाब नव्हे काय, मग अशा प्रश्नावर सहा लाख जनतेच्या जिव्हाळयाचा असल्याने त्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे. कृपया यावर निर्णय व्हावा.

मा. महापौर :- याबाबत भरपूर चर्चा झालेली असून इतिवृत्त कायम करण्यात येते.

श्री. अविनाश कुमावत, श्री मुजीब आलमशा खान :- शताब्दी नगर नविन वसाहत मो. अशोकनगर येथे तार कंपाऊडचे अतिक्रमण झालेले आहे. त्यामुळे येथील

लोकांना जाणे येणे करणे कठीण झालेले आहे. या ठिकाणी ड्रेनेज लाइन/ पाणी पुरवठा लाईन रस्ते वगैरे सर्व सुविधा असुन रस्ता मात्र बंद झालेला आहे. त्यावर त्वरीत कार्यवाही व्हावी.

मा. महापौर :- याबाबत मा. आयुक्त हे निवेदन करतील.

मा. आयुक्त :- मो. शताब्दीनगर मध्ये ज्या ठिकाणी तार कंपाऊंड टाकण्यात आलेले आहे. ती संपूर्ण जागा सिडकोची आहे. सिडकोने २० एकराची जागा दिलेली होती. त्यापैकी १७ एकराच्या जागेवर मनपाचा ताबा आहे. तीन एकराच्या जागेबाबत कोर्टात वाद चालू आहे. त्यावर स्टे आला आहे. या ठिकाणी जी जागा बाजूची आहे ती पोलीस ग्राऊंडसाठी ग्रामीण पोलीस विभागाला दिलेली आहे. परंतू सिडकोने मोजमाप दिल्यानुसार पोलीसांनी ते कंपाऊंड टाकले आहे. तो इंटरनल रस्ता २४ फुटाचा आहे आणि पोलीस विभागाच्या मालकीचा आहे, असे त्यांचे म्हणने असल्याने ग्रामीण पोलीस अधिक्षक कार्यालय यांचेशी तसेच डीआयजी यांचेशी याबाबतीत व पोलिस आयुक्त यांचेशी ही चर्चा झालेली आहे आणि या बाबतीत येथील रस्त्यावरुन पाण्याचे टँकर जाईल असा रस्ता, डांबरीकरण विद्युत खांबाची व्यवस्था, मनपाने करुन द्यावी. मालकी हक्क मात्र पोलिस विभागाचे राहील असे लेखी पत्राने कळविले आहे. यावर सोमवारला सिडको ग्रामीण पोलिस विभाग आणि मनपा यांचेतर्फे जागेचे पुन्हा मोजमाप करण्यात येणार आहे.

श्री. मुजिब आलमशा :- मोजमाप करतेवेळी योग्य पध्दतीने होते काय? यासाठी नगररचना विभागाने जातीने हजर राहणे आवश्यक आहे.

मा. महापौर :- सोमवारला संबंधित जागेचे मोजमाप करतेवेळी मा. आयुक्तासमवेत नगररचना अधिकारी, यांनी हजर रहावे व त्यास स. सदस्य श्री. मुजीब आलमशा खान व बंडू प्रधान यांनी सहाकर्य करावे.

श्री. मोतीराम घडामोडे :- खुलताबाद येथे अंदाजपत्रकाच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे बरेचसे अंदाजपत्रक शिल्लक आहेत. तर काही स. सदस्यांनी रु. १४/- हजारांचे छोटे छोटे कामाचे अंदाजपत्रक तयार केलेले आहेत. त्यावर मा. आयुक्त यांनी शेरा मारुन बाजूला ठेवलेले आहेत. त्याचीही चौकशी करुन माहिती द्यावी. त्याचप्रमाणे इतिवृत्ततील पान क्र. २९ मध्ये मा. महापौर यांनी पाणी पुरवठयाच्या दराच्या संदर्भात जो निर्णय दिलेला आहे. त्याबाबत विरोधी पक्ष व एका अपक्ष सदस्यांनी विरोध केलेला आहे. त्याचबरोबर जनतेचाही विरोध आहे. यासाठी इतिवृत्त कायम करण्यात येऊ नये व तो दरवाढ होऊ नये असे माझे म्हणने आहे.

श्री. पांडुरंग पैठणकर :- इतिवृत्तातील पान क्र. २ मध्ये कैलास गॅरेज ते चंपा मजिद येथील रोडच्या कामा संदर्भात मी विचारणा केली, परंतू मला अद्यापही माहिती मिळालेली नाही. संबंधित रोडचे काम का बंद आहे. याबाबत काही अडचणी आहेत काय? किंवा स. नगरसेवकांचे सहकार्य लाभत नाही काय?

मा महापौर :- संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

प्रभारी अति शहर अभियंता :- गुलशन महल ते चंपा मसजिद पर्यन्तचे सध्या काम चालू आहे. परंतू तेथील लॅड एक्वीझीशनची प्रोसीजर चालू आहे.

श्री. मुजिब आलमशा खान :- गुलशन महल या रोडलगत येणाऱ्या रोडच्या भागातील मी एक नगरसेवक असून, मला पुर्णपणे माहिती आहे. या रोडचे अद्यापही काम पूर्णत्वाकडे झालेले नाही. गुलशन महल जवळील रस्त्यावर काही घरे येतात त्याबाबत अद्यापही निर्णय झालेला नाही व रोडची लांबी रुंदी ही निश्चित केलेली नाही. सर्वत्र खड्डे आहेत. जी घरे रस्त्यामध्ये बांधीत होतात त्या संदर्भात लॅड एक्वीझीशन विभागास साधे करवू शकत नाही. रस्त्याचे रुंदीकरण होत नाही ही बाब फार गंभीर आहे. कित्यकवेळा संबंधित अधिकाऱ्यांना सांगुन चर्चा केली. परंतू योग्य कार्यवाही काही झालेली नाही.

श्री. प्रदिप जैस्वाल :- गुलशन महल ते चंपा मजिद व कैलास गॅरेज या रस्त्यावरील काही घरे बांधीत होत असल्यास, तेथील घरांचे लॅड एक्वीझीशन तर्फे कार्यवाही होणे आवश्यक आहे. यासाठी संबंधित लोकांना मनपाकडे बोलावून परस्पर चर्चा करुन रस्ता रुंदीकरण करण्याची प्रक्रीया पूर्ण करावी, असे मला वाटते.

श्री. मुजिब आलमशा खान :- स. सदस्य श्री. प्रदिप जैस्वाल यांनी सुचित केल्याप्रमाणे योग्य आहे. परंतू नगररचना विभागातील कर्मचारी आपल्या विभागात हजर राहतच नाही.

श्री. मोहसिन अहमद :- गुलशन महल ते जालना रोड रस्ता रुंदीकरण करणेची सध्याच आवश्यकता नाही. कारण या रोडच्या संदर्भात प्रत्येकी तीन वार्डाचे स. नगरसेवक प्रतिनिधीत्व करीत असून, माझ्याही वार्डातील काही लोकांची घरे तसेच दर्गा व मसजीद बांधीत होते. त्यामुळे काही अडचणी येत आहेत. यासाठी सदरचा रोड १०० फुट डी. पी. ऐवजी ७० फुट डीपी करण्याबाबत संबंधित तीनही स. सदस्यांशी चर्चा करुन पुढील कार्यवाही व्हावी.

श्री. मुजिब आलमशा खान, श्री. नारायण फत्तेलष्कर :- संबंधित रोडचे रुंदीकरण होणे आवश्यक आहे.

श्री. बंडू प्रधान :- रोड त्वरील मोठा करुन डांबरीकरण करावे अन्यथा मी माझ्या वार्डातील १७२ घरे जी शताब्दीनगर येथे शीफ्ट केली ती परत आणून बसविन.

श्री. मोतीराम घडामोडे :- या ठिकाणी प्रशासनाची चूक असून सर्वस्वी मा. आयुक्त हेच जबाबदार आहेत.

श्री. नामदेव मानकापे :- गुलशन महल पर्यन्त जर रस्ता रुंदीकरण होत असल्यास जालना रोड ते कैलासनगर भवानीनगरच्या बडी गिरणी पर्यन्त बीड रुंदीकरण करण्याची कार्यवाही व्हावी.

श्री. अलफखॉन हुसैनखान :- नांदेड मुनिसीपल परिषदेचे एक केस हायकोर्टात गेलेली होती. त्या केसच्या संदर्भात सुप्रीम कोर्टात स्टे दिलेला आहे. औरंगाबाद हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे की, या संदर्भात अमका सेक्शन दुरुस्त करा. जोपर्यन्त दुरस्त करीत नाही, तोपर्यंन्त जमीन ॲक्वॉयर करु शकत नाही. या निर्णयाच्या पुर्वीची जी जमीन ॲक्वॉयर करु शकत नाही. या निर्णयाच्या पूर्वीची जी जमीन ॲक्वायर केली त्या जमीनीची मालकी आपण घेत आहोत. या निर्णयाच्या नंतर जमीन एक्वॉयर केलेली नाही. त्या ठिकाणी आपली मजबूरी आहे. यामध्ये प्रशासनाची कोणत्याही प्रकारची चूक नसून सुप्रिम कोर्टाचा निर्णयापर्यन्त काहीही करणे शक्य नाही.

श्री. मुजिब आलमशा खान, श्री मोतीराम घडामोडे :- प्रशासनाने पर्यायी जागा देवून रोड रुंदीकरणाची कार्यवाही करावी.

मा. महापौर :- मा. आयुक्त याबाबत माहिती देतील.

मा. आयुक्त :- गुलशन महल ते चंपा मसजिद रोडच्या दरम्यान एक सॉईल कॉन्झरव्हेशनचे एक कार्यालय आहे. आता या कार्यालयाला आपण जागा देण्याचे मान्य केलेले होते. त्यानुसार विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समोरील कार्यालयासाठी जागा औरंगपूरा सुपर मार्केट मध्ये आम्ही देण्यास तयार आहोत. परंतू या कार्यालयातील काही अधिकारी वर्ग बदलल्याने जवळपास सात ते आठ महिन्याच्या कालावधी पर्यंन्त वाट पाहिली व नंतर सध्या जे टाऊन प्लॅनिगंचे जे युनिट आहे. त्या कार्यालयास तेथील जागा देण्यात आले. सॉईल कॉन्झरहेश्नची इमारत पाडावी किंवा पाडू नये. याबाबत विभागीय आयुक्त यांचेकडे दोनदा बैठका झाल्यात तथापि यावर अखरेचा निर्णय होऊ शकलेला नाही. सदरची जागा शासनाची असल्याने या ठिकाणी अडचण निर्माण झालेली आहे. आणि पुढे काही त्या ठिकाणी प्रापर्टीज आहेत. रोडच्यामध्ये येणारी त्या संबंधीत व्यक्तींनी चर्चेसाठी आम्ही बोलावले होते. त्यांनीही काही पर्यायी जमिनी मागतिल्या. त्यामुळे तो प्रश्न सुटू शकला नाही. परंतू काही प्रॉपर्टीजच्या व्यक्तिंनी लॅन्ड एक्वीझिशनच्या प्रमाण पैस घेण्योचे कबूल केले. त्याबाबतचे दर ठरविण्याचे काम नगररचना विभागाकडे दिलेले आहे. त्यामुळे प्रशासनाकडून त्या रोडचे संदंर्भात काम बंद आहे असे म्हणने संयुक्तिक नाही. याबाबतचे प्रयत्न सातत्याने चालू आहे.

श्री. मुजिब आलमशा खान :- या रस्त्याच्या संदर्भात जे काही कामे अधुरी राहिलेली आहेत ती त्वरील करण्यात यावे आणि कधीपासून कामास सुरुवात होणार याची माहिती द्यावी.

श्री. मोतीराम घडामोडे :- मा. आयुक्त यांची निष्क्रीयतेमुळे कामांमध्ये वेग दिसत नाही. यासाठी मा. आयुक्तांच्या बाबतीत आमची नाराजी असून त्यांचे ऐवजी दुसरे आयुक्त मुन्सीलाल गौतम यांना बोलविण्याची शिफारस करावी. जेणे करुन अशा रोडच्या कामामध्ये गती येईल.

मा. महापौर :- दिनांक १/३/९३ पर्यन्त संबंधित रोडचे कामाची सुरुवात होईल. यावेळी स. सदस्यांना सुचना देण्यात येतील.

श्री. पांडूरंग पैठणकर :- रस्ता रुदीकरण, संदर्भात तीन वार्डातील स. नगरसेवकांना विश्वासात घेतले गेले पाहिजे अशी नोंद व्हावी.

मा. महापौर :- पाच वर्षाच्या कालावधीत सर्वसाधारण सभेमध्ये किती प्रस्ताव पास झालेले शासनाकडे पाठविले यांची माहिती विचारणा केली ती अद्यापही मिळालेली नाही.

श्री. नरेंद्र पाटील, श्री. नारायण फत्तेलष्कर :- गेल्या पाच वर्षाच्या कालावधी पासून प्रत्येक महापौरांकडे प्रत्येक सर्वसाधारण सभेमध्ये याच संबंधी प्रश्न उपस्थित मी करीत होतो. तरीही मला याची माहिती मिळालेली नाही.

मा. महापौर :- स. सदस्य श्री. प्रदिप जैस्वाल यांनी विचारलेल्या प्रश्नांची माहिती पंधरा दिवसात देण्याची व्यवस्था करावी आणि याबरोबरच इतिवृत्त कायम करण्यात येते.

**ठराव क्र. १०१/१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि. १९/१/९३ (दि. १९/१२/९२) रोजी तहकुब करण्यात आलेली आणि दि. ३०/१२/९२ रोजी पुढे ढकलण्यात आलेली आणि दिनांक २०/१/९३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त या व इतर दुरुस्त्यांसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०२/२ :-**

स्थायी समिती ठराव क्र. ४५६ दिनांक १३/१/९३ अन्वये महाराष्ट्र शासनाचे सन १९९० विधान परिषद विधेयक क्र. १० नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९ मध्ये १२९ अ व १२९ ब अशी सुधारणा करण्यात आल्यामुळे दिनांक १/४/९३ पासून औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील इमारतीवर खालील प्रमाणे पाणी पुरवठा लाभ कर व जलनि:सारण लाभकर लागू करण्यास सर्वानुमते मंजुरी देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे.

| | | |
|---|---|---|
| अ) | पाणी पुरवठा लाभकर | करयोग्य मुल्याच्या १% |
| ब) | जलनि:सारण लाभकर | करयोग्य मुल्याच्या १% |

विचारार्थ सादर.

**ठराव क्र. १०२/२ :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्थायी समिती ठराव क्र. ४५६ दि. १३/१/९३ अन्वये महाराष्ट्र शासानाचे सन १९९० विधान परिषद विधेयक क्र. १० नुसार मुंबई प्रा. मनपा अधिनियम १९४९ चे कलम १२९ मध्ये १२९ अ अ व १२९ ब ब अशी सुधारणा करण्यात आल्यामळे दि. १/४/९३ पासून औरंगाबाद मनप हद्दीतील इमारतीवर अ) पाणीपुरवठा लाभकर करण्यायोग्य मुल्याच्या १ % ब) जलनि:सारण लाभकर करयोग्य मुल्याच्या १% लागू करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०३/३:-**

स्थायी समिती ठराव क्र. ४५७ दि. १३/१/९३ सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्राहालय येथे हत्तीचे घर बांधण्याच्या कामासाठी रक्कम रु. ६,७०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे. विचारार्थ सादर.

**संवाद:-**

श्री. नरेंद्र पाटील :- या प्रस्तावातील ६,७०,०००/- च्या अंदाजपत्रका अन्वये काय काय कामे करणार याची माहिती द्यावी.

मा महापौर :- संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

शहर अभियंता :- सिध्दार्थ उद्यानातील प्राणी संग्राहालयामध्ये दोन हत्ती (पुल्लींग स्त्रिलींग) आणावयाचे असून त्यांना राहणेसाठी ७ x १० चे घर व ३ x ७ फेनलिंग करण्यासाठी हे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

श्री अलफ खान, श्री मोहासिन अहमद :- शहरातील अवस्था लक्षात घेता या प्रस्तावातील रुपयाचा खर्च विविध उद्यानातील लहान मुलांच्या खेळणीसाठी वापर करावा परंतू प्रस्ताव रद्द करावा.

श्री. चेनकरण संचेती :- स. सदस्य श्री अलफ खॉन यांनी सुचित केल्यानुसार सदरचा प्रस्ताव नामंजूर करुन या प्रस्तावातील पैसे शहरातील ड्रेनेज व पाणी पुरवठयासाठी खर्च करण्यास परवानगी द्यावी.

मा. महापौर :- स. सदस्य श्री. अलफखान यांचे सुचने नुसार सदरील प्रस्ताव रद्द करुन यातील राहिलेला सर्व खर्च विविध उद्यानातील लहान मुलांच्या खेळणीसाठी खर्च करणेस काहीच हरकत नाही.

**ठराव क्र.१०३/३ :-**

प्रस्ताव नामंजुर करुन या प्रस्तावातील सर्व रक्कम रुपये ६,७०,०००/- शहरातील विविध उद्याने मधील लहानमुलांच्या खेळणीसाठी खर्च करण्यास सर्वानुमते मंजुर देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०४/४ :-**

स्थायी समितीने विषय क्र. ४९३ दि ३०/९/९३ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण-९ कलम ९९ अन्वये सन ९३-९४ या वित्तीय वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता वरील मालमत्ता कराचे दर करण्योग्य मुल्यावर खालील प्रमाणे आकारण्यास सर्वानुमते मंजुर देउुन सर्वसाधारण सभेस शिफाकस केली.

| | | |
|---|---|---|
| १) | सामान्य कर :- | ३०% ऐवजी २५%<br>(सध्या अंमलात असलेला)<br>दर २% ऐवजी २५% |
| २) | सर्वसाधारण पाणीपट्टी :- | ३% (मु. मनपा अधिनियम १९४९ चे कलम १३० प्रमाणे व ज्या घरांना मनपाचे नळ नाही.) |
| ३) | साफसफाई कर :- | निवास वापरा करिता ३% कलम १२९ (ब) प्रमाणे निवासेत्तर वापरा करिता ६% (सहा) कलम १३० प्रमाणे. |
| ४) | वृक्ष कर :- | ०.०% |
| ५) | अग्निशमन कर :- | ०.७५% |

तसेच शासन नियमानुसार राज्य शिक्षण कर व रोजगार हमी उपकर या कराची करण्यायोग्य मुल्यावर खालील दराने कर आकारणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे.

| अ. क्र. | कर योग्य मुल्य | राज्य शिक्षण कर | | रोजगार हमी उपकर |
|---|---|---|---|---|
| | | निवासी | निवासेत्तर | निवासेत्तर |
| १ | रु. १ ते ७४ | -- | -- | -- |
| २ | रु. ७५ ते १५० | २% | ४% | १% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | रु. १५० ते ३०० | ३% | ६% | १.५०% |
| ४ | रु. ३०० ते ३००० | ४% | ८% | २% |
| ५ | रु. ३००० ते ६००० | ५% | १०% | २.५% |
| ६ | रु. ६००० ते त्यापेक्षा जास्त | ६% | १२% | ३% |

याशिवाय शहरातील मोठया निवासी क्षेत्रावर शासनाचे नियमाप्रमाणे करयोग्य मुल्याचे १०% मोठया निवासी क्षेत्रावरील कर आणि सहन जागेकरिता करयोग्य मुल्यावर सामान्य कराचे दराने कर आकारणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे. विचारार्थ सादर.

**संवाद:-**

श्री. प्रदिप जैस्वाल :- स्थायी समितीने शिफरीस केल्यानुसार सामान्य कर २५% केलेला आहे तो रद्द करुन मागील वर्षी आहे. तोच २२% ठेवावा.

श्री. अलफखान :- हैद्रबाद निजाम सरकारच्या वेळेस १९५३ चा नियम लागू होता. त्यांनंतर शासन निर्णय लागू झाल्यानंतर पहिले प्रशासकांनी २२% कर आकारणी करण्याचे सुचित केले ते आम्हाला आता सर्वांना मान्य आहे. यामध्ये जादा वाढ शक्य नाही. ड्रेनेज व पाणी पुरवठा कर लागू आहेच त्याचप्रमाणे राज्य शिक्षण कर व रोजगार हमी उपकर निवासेत्तर यामध्ये काही % वाढ व्हावी. जेणेकरुन शहराचा विकास करणेसाठी याद्वारे भर पडेल. तरीही सभागृहाने विचार करुन निर्णय घ्यावा.

श्री. नरेंद्र पाटील :- सामान्य कर २२% वरुन २५% केलेली आहे. तर बाकीचे शिक्षणकर वगैरे २% व ४% दर्शविलेले आहे. त्यामध्ये आताचे कोणते व मागील कोणते याची माहिती द्यावी. त्याबरोबरच एकंदरील नफा/तोटा किती होतो, याचीही माहिती द्यावी.

श्री. मधुकर शिंदे :- मंदिर मजिदसाठी कर माफ करण्यात यावे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :- २२% सामान्य कर असावे त्याहीपेक्षा जादा कर लादणे शक्य नाही. सध्या लोकप्रतिनिधीची समाप्तीचा कालावधी असल्याने प्रशासनाने हा जादा कराचा बोजा नागरीकांवर लादलेला आहे. तो लोकप्रतिनीधीने नागरीकांवर बोजा लादू नये, याची काळजी घ्यावी.

श्री. धनंजय गंगाखेडकर :- नागरीकांवर जादा कर लादने ठिक नसून, त्यामुळे नागरीक आर्थिक बोजा सहन करुन शकणार नाही. तेव्हा २२% कर ड्रेनेज व पाणी कर १% तर शिक्षण कर २% ऐवजी १% तर ५% आकारणी व्हावी.

श्री. मोतीराम घडामोडे :- शहरातील नागरीकांवर कराचा बोजा जादा न लावता, आहे त्याच स्थितीत ठेवावे.

सौ. लता दलाल :- जे कर आकारणी केलेली आहे ती, शासनाचे कडून आलेल्या पत्रकानुसार प्रशासनाने केलेले आहे. यामध्ये शिक्षणकर, सामान्य कर, जनतेवर लादू नये.

श्री. महादेव सुर्यवंशी :- कर योग्य मुल्य कशाच्या आधारे लादली याचा खुलासा व्हावा.

मा. महापौर :- याबाबत मा. आयुक्त यांनी माहिती द्यावी.

मा. आयुक्त :- कर योग्य मुल्य सन १९८९ पासून असेसमेंटच्या आधारे लावल्या जात आहे.

श्री. महादेव सुर्यवंशी :- एखादया वस्तीतील झोपडी व दुसऱ्या बाजूला इमारत या दोघामध्ये फरक दिसून येतो. तेव्हा कर कसा लावला जातो. याची माहिती द्यावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय, श्री. मोतीराम घडामोडे, श्री. चंद्रकांत खैरे :- सर्व सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यात येणारे कराविषयी मंजुरी व्हावी. जादा कर आकारणी कोणत्याही प्रकारची करु नये.

श्री. धनंजय गंगाखेडकर :- प्रशासनाने जुन्या करात वाढ करुन प्रस्ताव मांडलेला आहे. त्याऐवजी दुरुस्तीसह करुन कर आकारणी व्हावी.

श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. चंद्रकांत खैरे, श्री अविनाश कुमावत :- कर वाढवू नये त्यास आमचा विरोध आहे.

श्री अलफ खान :- संपूर्ण कर ३१% होतो तर २% वाढविल्यास ३३% झाले व ५०% वाढविल्यास ३३% होईल म्हणजे सामान्य कर २२% करण्यात यावा. यामध्ये वाढ करणे ठिक नसून इतर कर सर्वसाधारण पाणीपट्टी, वृक्षाकर, अग्निशमन कर, राज्य शिक्षण कर वगैरे जसेच्या तसेच असावे. फक्त साफसफाई कर निवासी क्षेत्रासाठी कर योग्य मुल्याच्या ३% व अनिवसी क्षेत्रासाठी करयोग्य मुल्याच्या ६% असावे.

मा. महापौर :- स. सदस्य श्री. अलफखान यांनी सुचित केल्याप्रमाणे प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव क्र. १०४/४:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ९ कलम ९९ अन्वये सन १९९२-९३ या वित्तीय वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील खालील मालमत्ता वरील मालमत्ता कराचे दर करयोग्य मुल्यावर आकारण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १) | सामान्य कर २२% | |
| २) | सर्वसाधारण पाणीपट्टी | ३% (मु. प्रा. मनपा अधिनियम १९४९ चे कलम १३० प्रमाणे व ज्या घरांना मनपाचे नळ नाही) |
| ३) | साफसफाई कर | निवासी वापरा करिता ३% कलम १२९ (ब) प्रमाणे निवासेत्तर वापराकरिता ६% (सहा) कलम १३७ प्रमाणे. |
| ४) | वृक्ष कर | ०.५०% |
| ५) | अग्निशमन कर | ०.७५% तसेच शासन निर्णयानुसार राज्य शिक्षण कर व रोजगार हमी उपकर या कराची करयोग्य मुल्यावर |

| अ.क्र. | | राज्य शिक्षण कर | | रोजगार हमी उपकर |
|---|---|---|---|---|
| | | निवासी | निवासेत्तर | निवासेत्तर |
| १ | रुपये १ ते ७४ | -- | -- | -- |
| २ | रु ७५ ते १५० | २% | ४% | १% |
| ३ | रु. १५० ते ३०० | ३% | ६% | १.५०% |
| ४ | रु. ३०० ते ३००० | ४% | ८% | २% |
| ५ | रु. ३००० ते ६००० | ५% | १०% | २.५% |
| ६ | रु. ६००० ते त्यापेक्षा जास्त | ६% | .१२% | ३% |

याशिवाय शहरातील मोठया निवासी क्षेत्रावर शासनाचे नियमाप्रमाणे करयोग्य मुल्याचे १०% मोठया निवासी क्षेत्रावरील कर आणि सहन जागे करिता करयोग्य मुल्यावर सामान्य कराचे दराने कर आकारणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०५/५:-**

स्थायी समितीने ठराव क्र. ४९४ दिनांक ३०/१/९३ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ अन्वये सर १९९२-९३ वर्षात ज्या दराने जकात कर वसुल करण्यात येत होता. त्याच दराने सन १९९३-९४ या वर्षात जकात कर वसुल करण्यास सर्वानुमते मंजुरी देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे. विचारार्थ सादर.

**संवाद :-**

श्री. बंडू प्रधान :- जकात संदर्भात बी-बीयाने वर जकात कर नाही. तरी बी-बीयाने वर जकार कर लावण्यात यावे.

मा. महापौर :- मंजुर (५० पैसे वाढवून)

**ठराव क्र. १०५/५:-**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार स्थायी समिती ठराव क्र. ४९४ दिनांक ३०/१/९३ अन्वये मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ९९ अन्वये सन १९९२-९३ या वर्षात ज्या दराने जकात कर वसूल करण्यात येत होती. त्याचप्रमाणे त्यामध्ये ५० पैसे वाढ करुन जकात कर वसूल करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०६/६:-**

स्थायी समिती ठराव क्र. ४९७ दि. ३०/१/९३ अन्वये अध्यादेश-२ दिनांक ४/१/९३ अन्वये महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४८ मध्ये १४८-ए व १४८-सी अशी सुधारणा केल्यामुळे औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील

इमारतीवर दिनांक १/४/९३ पासून कलम १४८-ए प्रमाणे खालील दर्शविलेल्या दराने शिक्षण कर आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येऊन सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे.

| | इमारतीचे करयोग्य मुल्य रुपये | टक्केवारी (कर योग्य मुल्यावर) |
|---|---|---|
| १) | १-१५० | माफ |
| २) | १५०-३०० | १% |
| ३) | ३००-३००० | २% |
| ४) | ३०००-६००० | ३% |
| ५) | ६०००व त्यापेक्षा जास्त | ४% |

ब) तसेच कलम १४८-सी प्रमाणे करयोग्य मुल्यावर ५% दराने पथक आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे. विचारार्थ सादर.

**संवाद:-**

मा. महापौर :- मंजुर

**ठराव क्र. १०६/६:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्थायी समिती ठराव क्र. ४९७ दि. ३०/१/९३ अन्वये अध्यादेश-२ दिनांक ४/१/९३ अन्वये महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी मुंबई प्रा. मनपा अधिनियम १९४९ चे कलम १३८-सी अशी सुधारणा केल्यामुळे औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रावरील इमारती वर दि. १/४/९३ पासून कलम १४८-ए प्रमाणे मनपा शिक्षण कर करयोग्य मुल्य १/२% दराने आकारण्यास ब) तसेच कलम १४८-सी प्रमाणे करयोग्य मुल्यावर १/२% दराने आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०७/७:-**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. सुपारी हनुमान गुलमंडी जवळील भोलेश्वर मंदिराजवळ मार्केट बांधण्याच्या कामासाठी सन १९९२-९३ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस. आर. दराने सुधारीत रक्कम रु १२,३३,०००/- चे तयार करण्यात आलेले आहे. त्यात मा. आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.

तरी अंदाजपत्रक दर रु. १२,३३,०००/- चा प्रस्ताव मंजुरीसाठी व विचारार्थ सादर. सदरचा खर्च भांडवली इमारती या शिर्षका मधुन करण्यात येईल.

**संवाद :-**

श्री. प्रदिप जैस्वाल, श्री चंद्रकांत खैरे :- सदरील विषयास मंजुरी त्वरीत कामास सुरुवात करण्यासाठी कार्यवाही व्हावी. याबरोबरच इतिवृत्त कायम करण्यात यावे.

मा. महापौर :- ठिक आहे. प्रस्तावास मंजुरी देवून इतिवृत्त कायम करण्यात यावे.

**ठराव क्र. १०७/७:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. सुपारी हनुमान गुलमंडी जवळील भोलेश्वर मंदिराजवळ मार्केट बांधणेच्या कामासाठी सन १९९२-९३ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने सुधारीत रक्कम रुपये १२,३३,०००/- चे तयार करण्यात आले. त्यास मंजुरी देवून सदर कामात त्वरीत सुरुवात करण्यात यावे. त्याचबरोबर इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**(पुरवणी विषय क्र. १४)**

**विषय क्र. १०८/८:-**

मालमत्ता अधिकारी, मा. आयुक्त मनपा औरंगाबाद यांचे मंजुरी नुसार प्रस्ताव सादर करीत आहे की, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने शहरात अनेक ठिकाणी मनपाच्या जागेवर विद्युत डी. पी. व विद्युत पोल लावले आहेत. विद्युत मंडळ विद्युत बिल आकारीत असेल, अशा स्थितीत त्यांनी मनपाच्या जागेवर लावलेले विद्युत डी. पी. चे तसेच विद्युत पोलचे जागेस भाडे आकारणे संयुक्तिक होईल.

करिता प्रस्ताव सादर केला जातो की, कार्यालयाचे जागेवर विद्युत मंडळाने उभारलेल्या डी. पी. चे तसेच पोलचे जागेस कार्यालयाचे सहाय्यक संचालक, नगर रचना ठरवतील त्या दराने भाडे आकारणे बाबत विचार होणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :-**

मा. महापौर :- संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

मालमत्ता अधिकारी :- औरंगाबाद हद्दीत एकूण अंदाजे ३०० डी. पी व १६,००० पोल्स आहेत. त्याप्रमाणे किती चार्जेस लावावे लागतील याबाबत नगररचना किंवा आपण ठरविल्या प्रमाणे आकारणी करता येईल.

मा. महापौर :- हा प्रस्ताव सविस्तर पुढील बैठकीत ठेवण्यात येते.

श्री. बंडू प्रधान :- सदरील प्रस्ताव मंजुर करावा. कराण की, महा. विद्युत मंडळ, ही व्यापारी संस्था असुन, त्यांचेकडून चार्जेस वसूल करणे आवश्यक आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :- महा. राज्य विद्युत मंडळ हे मनपा कडुनही बिले आकारते, त्यामुळे आपण ही काही चार्जेस लावून बिल आकारण्यास हरकत नाही.

श्री. मधुकर शिंदे :- पुरवणी विषय पत्रिकेतील विषय क्र. १४ मध्ये सुध्दा हाच विषय आहे. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

श्री. अजिजुल्ला बेग, श्री गंगाधर गाडे :- सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात यावा आणि दराबाबत पुढील बैठकीय माहिती द्यावी.

श्री. चेनकरण संचेती :- स्थायी समितीमध्ये याबाबत निर्णय होईल.

**ठराव क्र.१०८/८:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्रा राज्य विद्युत मंडळाने शहरात अनेक ठिकाणी मनपाच्या जागेवर विद्युत डी-पी व विद्युत पोल लावले आहेत. तेव्हा महा. राज्य विद्युत मंडळाकडून किती भाडे आकारणी करावयाची याबाबत स्थायी समिती मध्ये निर्णय घेणे साठी शिफरीस करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. याबाबत पुरवणी विषय पत्रिका क्र. १४ नुसार कार्यवाही करणेस मंजुरी देण्यात याव.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०९/९ :-**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्तावित केले आहे की, महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिकेत नर्सिंग होम रजिस्ट्रेश्न ॲक्ट १९४९ लागू केलेला आहे. त्या कायदयानुसार शहरातील नर्सिग होमचे नोंदणीकरण करुन प्रमाणपत्र दिलेले आहेत. त्यानुसार महानगरपालिका औरंगाबाद येथे हा कायदा लागू करुन नियमावली तयार करुन मंजुरीसाठी सादर.

# AURANGABAD MUNICIPAL CORPORATION ABRAMABAD BYE-LAWS TO REGULATE NURSING HOME UNDER SECTION 17 OF THE BOMBAY NURSING HOME REGISTRATION ACT1949.

The following bye- laws made by the Municipal corporation of the Abramabad under section 17 of the Bombay Nursing Home Registration Act, 1949 (Bombay xv of 1949) and confirmed by the Government of Bombay under sub. section (3) of the said section 17 are hereby published for general information as required by sub section (4) of that section:-

1. **Short title and extent:-**

1) These bye-laws may be called The Aurangad Municipal Corporation Nursing Home Registration Bye-laws 1953.
2) These Bye-laws extend to the Aurangabad Municipal Corporation.

2. **Definition:-**

In these bye-laws unless there is anything refugant in the subject or context:-

1) "The Act" means the Bombay Nursing Homes Registration Act 1949.
2) Aurangabad Corporation means the Aurangabad Corporation constituted under section 3 of the Bombay Provincial Municipal Corporation Act 1949.
3) "Corporation" means the Municipal corporation of the Abramabad.
4) "In sections disease" means a disease which a registered medical-practitioner is required to notify to the Municipal Officer of Health of the Corporation under the low for the time being in force.
5) "Keeper of a nursing Home" means a person who has been duly registered by the medical officer of Health of the corporation in respect of a nursing

home under section 5 of the Act and whose registration has not been cancelled under section 7 of the Act.

**3. Record of Patients of children born in Nursing Home.**

1) The keeper of a nursing home shall keep.

a) In the form attended to these bye-laws a register of patients received into the Nursing home:-

b) A correct alphabetical index of the name of the patients admitted to the nursing Home.

c) A daily record of health of very patient who may be suffering from acute illness.

d) A daily record of health of very woman admitted to the nursing home for delivery and of every child born to such woman in the nursing home, and

e) A weekly record of health of other patients.

**2)** Where the register referred to in sub-clause-as of clause(1) relates to a woman who has been admitted for delivery, and where a child born to such woman is removed with the consent of a keeper of a nursing home and of the parents, or mother to the care of a person other than its father or near relative, the keeper of such nursing home shall in addition to the practitioners specified in clause (1) also specify in the register the name and address of such person and the date on which and the consideration for which the child was so removed.

**4. Notice of death occurring in nursing home**:-

1) If any death occurs in a nursing home the keeper of the nursing home --------------------------- within twenty four hours from the occurrence of the death give in writing a notice of such death of the rgisterer general of the city of Aurangabad appointed under section 363 of the Bombay provincial Municipal Corporation Act 1949.

2) The Notice may be sent by pre-paid post or in any other effective manner.

3) The Notice shall contain the particulars required to be entered in register books of death under section 368 of the Bombay provincial Municipal Corporation Act 1949.

4) Within twenty-four hours of the conclusion of an inquest, if any, held on the death of a patient admitted into a nursing home. The keeper of such home shall forward a report to the medical officer of Health of the Corporation containing the following practitioners. Namely

a) Date of inquest:-

b) cause of death as found by the authority by which the inquest was held.

**5. Penalty:-**

Any person, who contravenes the provision of any of these bye-laws, shall on conviction be punished.

a) With time which may extend to fifty rupees or,
b) With fine which may extend to fifty rupees and in the case of continuing contravention with on additional fine which may extent to fifteen rupees for everyday during which such contravention. Continues after conviction for the first such contravention or,
c) With fine which may extend to fifteen rupees for everyday during which the contravention after the receipt of a notice from the corporation by the person contravening the bye-law requiring such person discontinue such contravention.
d) Every Nursing home should register under this Act and get the registration certificate with a fee Rs. 100/- per year.

## Aurangabad Municipal Corporation

Certificate of Registration under section 50 of the Bombay Nursing home Registration Act 1949.
(Under Rule 5)

This is to certify that shri/shrimati---------------------------has been registered under the Bombay Nursing Home s. registration Act 1949 in respect of -----------------------situated at---------------------and has been authorized to carry on the said Nursing home.

Registration no. maternity cots.
Date of Registration other Nursing patients cots
Place
Date of issue Certificate.
This certificate shall be valid up to 31 march 199-

Sd/-
Medical officer of Health
Municipal corporation Aurangabad.

**संवाद :-**

श्री. अलफ खान :- सन १९५३ चे बॉयलाज आहेत ते दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

श्री नारायण फत्तेलष्कर :- संबंधित प्रस्तावा सोबत इंग्रजीतून मसुदा जोडलेला आहे. तेव्हा मराठी मसुदा तयार करुन सर्वासमोर का ठेवण्यात आला नाही. याबाबत आम्ही निषेध करुन सभात्याग करतो. (अंदाजे वेळ ५.४५ वाजता)

श्री. अलफ खान :- नियमाप्रमाणे सेक्सन ५ अन्वये पेनॉलटी कोणत्याही नर्सिंग होमसाठी करण्यात यावे.

श्री. अजिजुल्ला बेग :- या संदर्भात रुपये १००/- फिस ठेवण्यात यावी.

मा. महापौर :- मंजुर.

**ठराव क्र.१०९/९:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरोग्य वैद्यकीय अधिकारी महानगरपालिका यांनी प्रस्तावीत केल्यानुसार महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिकेत नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ लागू

केलेला आहे. त्या कारणानुसार शहरातील नर्सिंग होमचे नोंदणीकरण करुन प्रमाणपत्र दिले आहे. त्यानुसार महानगरपालिका औरंगाबाद येथे हा कायदा लागू करुन सोबत प्रारुप नियमाचा मसुदयास नियमावली सादर करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११०/१०:-**

उप आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शासन निर्णक क्र. गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग गवसु १०९०/२५०३/ क्र-७ दिनांक१/१०/९० नुसार १९८० ते ८५ दरम्यान निर्माण झालेल्या झोपडयांना संरक्षण देण्यात येते. औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील घोषित ५१ झोपडयांना महानगरपालिका म्हाडा व महाराष्ट्र शासनाच्या जमिनी वरील १९८५ च्या विधानसभा मतदार यादीत ज्यांची नांवे आहेत व सध्याही ते त्या ठिकाणी वास्तव्य करुन आहेत, अशांना फोटो पासेस द्यावयाचे आहेत. त्यासाठी अशा झोपडयाचे सर्वेक्षण करणे आहे. त्यांनतर केंद्रशासनाच्या व खाजगी जमिनीवरील झोपडयांवरील झोपडी धारकांना त्यांची झोपडी संरक्षित केल्या बाबत आदेशपत्र देण्यात येईल.

ज्यावेळी झोपडपट्टीतील विशिष्ट जागा सार्वजनिक कामासाठी आवश्यक असते. त्यावेळी अशा केंद्रशासनाच्या अथवा राज्य शासनाच्या जमिनीवरील झोपडया हलवून त्यांना पर्यायी जागा देण्यात येते.

छापील अर्जाचे वाटप करणे, झोपडपट्टी धारकांचे तीन फोटो, माहिती पत्रक १९८५ च्या मतदार यादीच्या सत्यप्रती (झेरॉक्स) स्वीकारणे, त्यांची पडताळणी करण, महानगरपालिका, महाराष्ट्र शासन म्हाडा, केंद्रशासन व खाजगी जमीनी वरील झोपडयांचे सर्व्हेक्षण करणे,
झोपडपट्टीच्या स्थळदर्शक नकाशा तयार करणे, शासन निर्णयात नमुद सेवा आकार, भूभाडे, नुकसान भरपाईचा डी. डी. स्विकारणे, भूमी अभिलेख गोळा करणे, प्रत्येक झोपडीचे रेकॉर्ड तयार करणे म्हणजेच प्रत्येक झोपडीने व्यापलेले क्षेत्रफळ, खोल्या, त्यात राहणाऱ्या व्यक्तिंची नांवे, मतदार यादीवरील झोपडी धारकांचा क्रमांक ३ महानगरपालिका हद्दीतील ५१ घोषीत
झोपडपट्टीतील झोपडयांचे सर्व्हेक्षणासाठी खालील प्रमाणे एकूण सहा टप्यात फोटो पासेस देण्यात यावेत.

**प्रथम टप्पा:-**

सदर योजनेची वृत्तपत्र माहिती पत्रके, इत्यादी माध्यमाद्वारे प्रसिध्दी देण्यात यावी. तहसिलदार किंवा जिल्हाधिकारी यांचेकडून १९८५ च्या विधानसभा मतदार यादीत नांव असल्या बाबत मतदार यादीचा उतारा व झोपडी धारकांचे तीन फोटो मनपाच्या संबंधित विभागीय कार्यालयामध्ये दाखल केल्यावर झोपडी संरक्षणासाठी करावयाच्या अर्जाचे कोरे नमुने झोपडी धारकांना पुरवीने (४ आठवडे)

**टप्पा क्र. २:-**

झोपडीधारकांनी योग्य रितीने भरलेले अर्ज मतदार यादीचे उतारे गोळा करणे व त्याबाबत पावती देणे (४ आठवडे).

**टप्पा क्र. ३:-**

आपले अर्ज प्रथम मतदार संघावर त्यांनंतर यादी भागावर व त्यानंतर क्रमवार वेगळे करणे जसा मतदार यादीचा तपशिल जुळत असेल तर, अर्ज नामंजुर करण्यात येणार नाही. व

अर्ज अधिक तपासणीसाठी ग्राहय धरण्यात येईल. जर तपशिल जुळत नसेल तर अर्ज नामंजुर करण्यात येईल.

**टप्पा क्र.४:-**

जे अर्ज नामंजूर करण्यात आलेले नाहीत. अधिक तपासणीसाठी ग्राहय धरण्यात आलेले आहेत अशा अर्जा बाबत अर्जदारांच्या गृहभेटी करण्यात याव्यात. जेणे करुन अर्जदार सध्या तेथेच वास्तव्य करीत आहेत किंवा कसे याची पडताळणी करता येईल.

**टप्पा क्र. ५:-**

राज्य शासन मनपा, औरंगाबाद व महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाच्या जागेवरील झोपडपट्टी धारकांना फोटो पास देणे, केंद्र शासन व खाजगी मालकीच्या जागेवरील झोपडी धारकांना झोपडीधारक पत्रिका देणे व त्या बदल्यात दुसऱ्या टप्पामध्ये दिलेली पावती अर्जदाराकडून परत घेणे.

**टप्पा क्र. ६:-**

अंतिमरित्या नामंजुर अर्जाचे अनु. क्र. जाहीर करणे, यासाठी खालील प्रमाणे एक स्वतंत्र कक्षा स्थापन करण्यात यावा.

१) तहसिलदार - १ (प्रतिनियुक्ती वरील)
२) उप अभियंता - १
३) सबोर्सियर्स - ४
४) भुमापक - १०
५) ट्रेसर्स - २
६) सुपरवायझर/वरीष्ठ लिपिक - ८
७) इंग्रजी/मराठी टंकलेखक - २
८) शिपाई - ६

वरील संवर्गातील काही अनुभवी कर्मचारी भुमी अभिलेख (लँड रेकॉर्ड) नगर भुमापन कार्यालय (सिटीसर्व्हे) नगररचना, जिल्हाधिकारी कार्यालयातून ६ महिने कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवर घ्यावेत. या कक्षावर व संपूर्ण कामावर होणारा खर्च शासनाकडे अनुदान स्वरुपात मागण्यात यावा. जर शासनाने नकार दिला तर महानगरपालिकेने खर्च करावा. सोबत शासन निर्णयाची प्रत अभ्याससार्थ संलग्न प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :-**

श्री. प्रकाश जावळे :- प्रस्तावात १९८० ते ८५ दरम्यान निर्माण झालेल्या झोपडयांना जागेचा उपभोग घेतात. त्यांना १९९३ पर्यंन्तच्या झोपडयांना अशी दुरुस्ती करावी. दुसरे ज्यावेळी झोपडपट्टीतील विशिष्ट जागा सार्वजनिक कामासाठी आवश्यक असते. त्यावेळी अशा केंद्र शासनाच्या अथवा राज्य शासनाच्या जमिनी वरील झोपडपट्टी हलवून त्यांना पर्यायी जागा देंण्यात येते. ही अट रद्द करुन आहे. त्याच जागेवर कायम करण्यात यावे असे संबोधावे.

श्री. प्रदिप जैस्वाल :- महानगरपालिकेला प्रस्तावा संदर्भाने किती खर्च अपेक्षित आहे याची माहिती द्यावी.

श्री. बंडू प्रधान :- शहरातील गेल्या ३०/४० वर्षापासूनच्या झोपडपट्टया आहेत. त्या अजूनही स्लम घोषित झालेल्या नाहीत आणि त्यांचे १९८५ च्या मतदार यादीमध्ये नाव

आहेत. परंतू जे स्लम नाहीत व झोपडपट्टयात राहतात अशांना स्लम म्हणून घोषित करावे. आणि ज्या खाजगी जागेवर गेल्या ३० वर्षापासूनचे झोपडपट्टया आहेत त्यांना मनपाच्या जागेवर कायम करण्यात यावे. स. सदस्य श्री. मानकापे यांच्या वार्डातील स्लम भागात आतापर्यन्त कसल्याही प्रकारचे मुलभूत सुविधा नाहीत.

श्री नामदेवराव मानकापे :- माझ्या वार्डामधील रुपये १,१४००० (एक लाखं चौदा हजार) संडासाचे कामला मंजुरी मिळाली नाही. तीन वेळेस दलितांचे सदस्य सभापती आले, परंतू काम काही झाले नाही याची माहिती द्यावी.

श्री. गंगाधर गाडे :- मी स्वत: त्या भागामध्ये नळाची व्यवस्था केली.

श्री नामदेवराव मानकापे :- संबंधित जागा त्या मालकाकडून एका बाँड पेपरवर मनपाला लिहून दिलेली आहे. तरी ही कामे का होत नाही. आता ते काम किती दिवसात सुरु होणार याची माहिती द्यावी.

मा. महापौर :- संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

श्री गंगाधर गाडे :- उप अभियंता यांना हाताशी धरुन मी स्वत: रोडच्या कामाबाबत व रस्ता दुरुस्ती करण्याबाबत सुचना दिलेल्या होत्या, परंतू काम का झाले नाही हे सुध्दा समजत नाही.

श्री नामदेवराव मानकापे :- पण ती फाईल का गायब झाली.

शहर अभियंता :- सदरील कामाच्या बाबतीत आम्ही चालना दिलेली होती त्यापूर्वी संबंधित फाईल गायब झालेली होती. स. सदस्यांनी मला कल्पना दिलेली होती. कार्यकारी अभियंता जलनि:सारण यांचेकडून ती फाईल माझेकडे आली. लगेच आम्ही त्याबाबतीत निविदाही काढल्या. मा. महापौर यांचे सुचनेनुसार प्रत्यक्षात पाहणी केली आणि निविदा काढून अगाऊ असल्याने फेर निविदा काढल्याचे ठरले. आता त्याप्रमाणे उदया निविदा काढण्यात येतील.

श्री. नामदेवराव मानकापे :- माझ्या वार्डातील कोणत्याही कामाची फाईल गायब का होते याचे कारण काय?

श्री प्रकाश जावळे :- झोपडपट्टीतील विशेषत: स्लम भागातील नागरी सुविधांसाठी अनेक अडचणी येतात. स्लम भागातील गटारी, रोड, लाइट, नळ, संडास, इत्यादी कामांचे बाबतीत त्वरेने कामे होत नाही. बरेचसे काम अर्धवट रेंगाळत पडतात. काही ठिकाणी अद्यापही समाज मंदिर नाही. माझ्या वार्डातील समाज मंदिरासाठी अंदाजपत्रक मंजुर होऊनही दोन महिने फाइल गायब होती. याचे कारण काय तर स्लम भागातील विविध कामांचे बाबतीत संबंधित उप अभियंता यांचेकडून कामांची वेग दिसून येत नाही. असा आमचा आरोप आहे.

श्री बंडू प्रधान :- ज्या खाजगी जागामध्ये झोपडपट्टया गेल्या ३०/३५ वर्षा पासून बसलेल्या आहेत. उदा. भोईवाडा हा भाग स्लम घोषित करुन नागरी सुविधा मिळवून द्यावे.

श्री नामदेवराव मानकापे :- गेल्या पाच वर्षापासूनचे माझ्या वार्डातील स्लम भागातील नागरी सुविधासाठी झटत आहेत. तरी ही संबंधित काम किती दिवसात होईल याची माहिती द्यावी.

मा. महापौर :- संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

प्रकल्प अधिकारी :- स. सदस्य श्री. जावळे यांनी विचारलेल्या प्रमाणे शासनाच्या जमिनीवरील झोपडया हलवून त्यांना पर्यायी जागा देण्यात येते हा निर्णय झोपडपट्टीच वासियांच्या हिताचा आहे. कारण की, एखादा रस्ता त्या भागातून जावयाचा असेल तर एखादी झोपडी हलवावी लागेल आणि त्यांना पर्यायी जागा मिळण्याची सवलत आहे. जर हे त्यातून काढून टाकले तर त्यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. १९८५ च्या शासन निर्णयानुसार व त्यांची मतदार यादीत नांवे आहेत. त्या घोषित झोपडपटटया (५१) पैकी केंद्र शासनराज्य शासन, म्हाडा किंवा महानगरपालीका यांचे जागेवर जर या झोपडपटटया बसलेल्या असतील तर त्या वसाहतीतील मतदार यादीत नविन असलेल्या लोकांना त्या झोपडीधारंकांनी जमीन देण्यात आली आहे या निर्णयानुसार त्यांना कोणतीही मालकी या ठिकाणी अपेक्षित नाही. फक्त एखादी झोपडी जर हलवायची असेल तर त्यांना पर्यायी जागा देण्याचा हक्क राहील. केंद्र शासनाच्या किंवा खाजगी जमिनीचचा प्रश्न आहे. निर्णयानुसार झोपडीधारक पत्रिका देण्यात येईल. परंतू इतर ठिकाणी महापालिका, म्हाडा शासनाचे जमिनीवर आहेत. अशा झोपडपट्टीधारकांना पासेस देण्यात येतील. त्यामध्ये संयुक्त पती पत्नीचा फोटो राहणार आहे. स. सदस्य, श्री प्रदिप जैस्वाल यांनी विचारलेल्या प्रमाणे टप्पा क्र. ६ आहे. यासाठी लागणारा एकंदरीत खर्च डेप्युटेशनच्या महापालिकेला करावा लागेल.

श्री. मधुकर शिंदे, श्री बंडू प्रधान, श्री प्रकाश जावळे :- यामध्ये दुरुस्ती करावी की जे ३० वर्षापासून खाजगी जागेवर राहतात. त्यांना पर्यायी व्यवस्था करणार काय?

श्री गंगाधर गाडे :- कोणत्याही इसमाला घर विकण्याची मुभा असली पाहिजे अशी दुरुस्ती व्हावी.

श्री अजिजुल्ला बेग :- घोषित झोपडपट्टीत एक ग्रहस्थ राहतो परंतू १९८५ च्या यादीत नांव नाही. मग आपण काय करणार?

प्रकल्प अधिकारी :- शासन निर्णया प्रमाणे १९८५ च्या यादीत नांव समाविष्ट आहे त्यांनांच या बाबतचा फायदा होईल.

श्री मोहसिन अहेमद :- या प्रस्तावाचा लाभ चिस्तिया कॉलनी झोपडपट्टीला मिळणे आवश्यक आहे. या बाबतचा प्रस्ताव मंजुर झालेला आहे. परंतू अद्यापही शासनाकडे पाठविण्यात आलेले नाही ही इतिवृत्तात नोंद घ्यावी.

मा. महापौर :- सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

श्री. मोतीराम घडामोडे :- पान क्र. ५ मध्ये टप्पा क्र. २ मध्ये ४ आठवडयाची मुदत दिलेली आहे. त्याऐवजी भरलेले अर्ज मतदार यादीचे उतारे गोळा करणे व पावती देणेसाठी किमान तीन महिन्याचा कालावधी द्यावा.

मा महापौर :- ठिक आहे. सुचना योग्य आहे त्याचप्रमाणे कार्यवाही होईल.

**ठराव क्र. ११०/१०:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन निर्णय क्र. गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग/गवसू-१०९०/२५०३/का-७ दिनांक १/१०/९० नुसार १९८० ते ८५ दरम्यान निर्माण झालेल्या झोपडयांना संरक्षण देंण्यात येते. औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील घोषित ५१ झोपडपट्टयातून

महानगरपालिका म्हाडा व महाराष्ट्र शासनाच्या जमीनी वरील १९८५ च्या विधानसभा मतदार यादीत ज्यांची नांवे आहेत व सध्याही ते त्याच ठिकाणी वास्तव्य करुन आहेत आणि ज्यावेळी झोपडपट्टीतील विशिष्ट जागा सार्वजनिक कामासाठी आवश्यक असते. त्यावेळी अशा केंद्र शासनाच्या अथवा राज्य शासनाच्या जमीनी वरील झोपडया हलवून त्यांना पर्यायी जागा देण्यात येते. यामध्ये प्रामुख्याने छापील अर्जाचे वाटप करणे, झोपडीधारंकांचे तीन फोटो, माहिती पत्र १९८५ च्या मतदार यादीच्या सत्यप्रती (झेरॉक्स) स्विकारणे, त्यांची पडताळणी करणे, महानगरपालिका, महाराष्ट्र शासन म्हडा, केंद्र शासन व खाजगी जमिनी वरील झोपडयांचे सर्वेक्षण करणे, झोपडीचा स्थळदर्शक नकाशा तयार करणे, शासन निर्णयात नमुद सेवा आकार भुभाडे, नुकसान भरपाईचा डी.डी. स्विकारणे, भूमी अभिलेख गोळा करणे, प्रत्येक झोपडीचा रेकॉर्ड तयार करणे, म्हणजेच प्रत्येक झोपडीने व्यापलेले क्षेत्रफळ खोल्या, त्यात राहणाऱ्या व्यक्तिंची नांवे मतदार यादी वरील झोपडपट्टीधारकांचा क्रमांक इ. मनपा हद्दीतील ५१ घोषित झोपडपट्टीतील झोपडयायंने संरक्षित व सर्व्हेक्षण करण्यासाठी या सोबतच्या दिलेल्या सहा टप्या नुसार फोटो पासेस देण्याची कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १११/११:-**

मा. आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला की, सिडकोने सिडको भागाचा पाणी पुरवठा दिनांक ७/९/८५ ला मनपाकडे हस्तांतर केला.

त्यावेळी अस्तित्वात असलेल्या जलवाहिन्या एन-५ व एन-७ येथील जलकुंभ सुध्दा हस्तांतर केले. जलवाहिनीवर अस्तित्वात असलेल्या नळ जोडणीस नळ धारकाची यादी देण्यात आली. त्यासाठी आधारे पुढील पाणीपट्टी देयक दिले. सिडको प्रशासन यांनी योजनेच्या घरासाठी ३/४ इंच व्यासाच्या जलवाहिनी मधुन दोन १/२ इंच नळ कनेक्शन जोडणी दिल्या होत्या. त्याआधारे नळ धारकांना पाणीपट्टी देयक देण्यात आले.

दिनांक १/२/१९८८ पासून १/२ इंच नळ कनेक्शन धारकांना प्रतिवर्षी रुपये ४००/- या दराने पाणीपट्टी देयक देण्यात आले. त्याला काही नळ धारकांनी आक्षेप घेतला की, त्यांना ३/४ इंच व्यासाच्या पाईप मधुन दोन १/२ इंच व्यासाचे नळ कनेक्शन देण्यात आले आहे. तरी त्यांना ३/४ इंच व्यासाच्या नळ कनेक्शनची जी पाणीपट्टी येते, ती समप्रमाणात विभागणी करुन देण्यात यावी. तसेच अंदाजे १५०० नळ धारकांनी पाणीपट्टी आज पर्यंन्त भरलेली नाही. जो पर्यंन्त पाणीपट्टी कमी होत नाही, तो पर्यंन्त पाणीपट्टी भरण्यास तयार नाही असे नागरीकांचे म्हणणे आहे.

तसेच सिडको प्रशासन यांनी १४९ घरांना नळ कनेक्शनची जोडणी केलेली नव्हती. पण सिडको कडून मिळालेल्या यादी मध्ये सदर घरांना सुध्दा पाणीपट्टी आकारलेली होती. सिडको कडून मिळालेल्या नळ धारकांच्या यादी आधारे सदर नळ धारकांना सुध्दा पाणीपट्टी देयक देण्यात आले. सदर नळ धारकांचे असे म्हणणे आहे की, जेव्हा आमच्याकडे नळ कनेक्शनची जोडणी केलेली नाही, तर पाणीपट्टी देयक देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

३/४ इंच व्यासाच्या पाईप वरुन १/२ इंची दोन नळ कनेक्शन देण्यात आले आहे. व ज्या घरामध्ये नळ कनेक्शन सिडकोकडून दिलेले नाही, अशा नळ धारकांना पाणीपट्टी कमी केल्यस रुपये ११,२०,८८७.८० इतके महानगपालिकेचे आर्थिक नुकसान होईल.

तसेच तांत्रिक दृष्टया ३/४ इंच व्यासाच्या जलवाहिनी वरुन १/२ इंच व्यासाचे ३ नळ कनेक्शन देता येते. त्यानुसार ३ १/२ इंच नळ कनेक्शन ऐवजी २, १/२ इंच नळ कनेक्शन देण्यात आलेले आहे.

तरी वरील नळ धारकाकडे थकीत पाणीपट्टी सहानुभूतीपूर्वकच्या दृष्टीने काही प्रमाणात कमी करणे योग्य वाटते. ३/४ इंच व्यासाच्या नळ कनेक्शनची पाणीपट्टी दर ७३० रु. प्रतिवर्ष दरानुसार ३/४ इंच व्यासाच्या नळ कनेक्शनची जलवाहिनी वरुन १/२ इंच दोन नळ कनेक्शन देण्यात आलेले आहे. अशा नळ कनेक्शनची पाणीपट्टी प्रतिवर्ष ३५.०० रु. दिनांक १/२/८८ पासून कमी होईल. ज्या नळ धारकांचे १/२ इंच व्यासाचे नळ कनेक्शन ३/४ इंच व्यासाच्या जलवाहिनीवर आहे, अशा नळ धारकांना ३१/१२/९२ पर्यन्त पाणीपट्टी रु. १७२.०० प्रत्येकी कमी होईल.

तसेच ज्या घरांना नळ कनेक्शन जोडणी झालेली नाही, त्याचे प्रत्येकी रुपये २,२९७/- कमी होईल.

(त्याचा तपशील खालील प्रमाणे.)

दिनांक ३१/१२/९२ पर्यन्त कमी होणारी रक्कम:-

| | | |
|---|---|---|
| १) | नळ जोडणी न झालेल्या- घरांची संख्या | १४९-३,४२,२५३.०० |
| २) | ३/४ इंच व्यासाच्या लाइनवर १/२ इंच व्यासाचे दोन नळ कनेक्शन दिलेल्या घरांची संख्या | २७९९-४,८१,६२४.०० |
| ३) | १/२ इंच व्यासाचे स्वतंत्र नळ कनेक्शन १/२/८९ पासून | ७२७४-२,९७,०११.०० |
| | एकूण | ११,२०,८८८.०० |

तरी प्रस्ताव मान्यता व मंजुरीस्तव सादर.

संवाद:-

श्री धनंजय गंगाखेडकर :- प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाण्याचे बील रु. ११,२०,८८७.०० सिडको धाराकांची पाणीपट्टी कमी करु नये. कारण महापालिकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असून, एवढा तोटा महापालिकेने सहन करणे शक्य नाही. यासाठी सदरचे बील माफ करण्यात येऊ नये. यामध्ये नळांची बीले व पत्यासह तयार करुन पुर्ण झालेले आहे. तरी प्रस्ताव फेटाळण्यात यावा.

श्री. महादेव सुर्यवंशी :- या प्रस्तावात महापालिकेची चूकी झालेली असल्याने सदरचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

श्री. मोतीराम घडामोडे :- सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात यावा. सिडको नागरिकांवर बोजा टाकणे योग्य नसून कोणतेही नागरीक पाणीपट्टी भरणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. सदरचे बील १९८५ पासून कमी करावे.

श्री बंडू प्रधान :- दोन घरांना रु. ८००.०० नळपट्टी घेत असल्यास, ते नुकसानीचे आहे.

श्री विठ्ठल पेरकर :- पाणीपट्टीच्या संदर्भात सिडकोकडून चूकी झालेली आहे आणि सिडकोचा पाणीपूरवठा महापालिकेने घेणे योग्य नव्हते. तरी ही पुन्हा महापालिकेने चूक करु नये.

श्री नरेंद्र पाटील :- सिडको नागरिकांना नळ कनेक्शन बाबत न्याय देणे आवश्यक आहे.

श्री धनंजय गंगाखेडकर :- प्रस्तावातील तपशीलात दर्शविल्याप्रमाणे क्रमांक २ व ३ च्या संदर्भात प्रत्यक्षात पाहणी करावी. परुंतू क्र १ बाबत नळ जोडणी व झालेल्या घराची संख्याबाबत शंका येते.

श्री महादेव सुर्यवंशी :- प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रु. ११,२०,८८७/- मधुन पुन्हा कमी करणे योग्य नसून, प्रस्ताव जसेच्या तसे मंजुर करण्यात यावा.

मा. महापौर :- मंजुर.

**ठराव क्र. १११/११:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको भागाचा पाणी पुरवठा दिनांक ७/९/८५ पासून महापालिकेकडे हस्तांतर केला. त्यावेळी अस्तित्वात असलेल्या जलवाहिन्या एन-५, एन-७ येथील जलकुंभ सुध्दा हस्तांतर केले. दि. १/२/८८ पासून १/२ इंच नळ कनेक्शन धारकांना प्रतिवर्षी रु. ४००/- या दराने पाणीपट्टी देयक देण्यात आले. त्यांना ३/४ इंच व्यासाच्या पाईप लाइन मधुन २७९९ घरांना देण्यात आले त्याची रक्कम रुपये ४,८१,६२४.०० तर दिनांक १/४/८९ पासून १/२ इंची व्यासाचे स्वतंत्र नळ कनेक्शन ७२७४ घरांना देण्यात आले. त्याची रक्कम रुपये २,९७,०११.०० होते, तर सिडको प्रशासन यांनी १४९ घरांना नळ कनेक्शनची जोडणी केलेली नव्हती. पण सिडको कडून मिळालेल्या यादीमध्ये सदर घरांना सुध्दा पाणीपट्टी आकारलेली होती. त्याची रक्कम रुपये ३,४२,२५३.०० म्हणजे एकूण रक्कम रु. ११,२०,८८८.०० इतकी होते. सिडको धाराकांकडून असे म्हणने आहे की, जोपर्यंन्त पाणीपट्टी कमी होत नाही तोपर्यंन्त पाणीपट्टी भरण्यात तयार नाही. त्यामुळे अशा सर्व नळ धारकांकडून पाणीपट्टी कमी केल्यास महापालिकेचे आर्थिक नुकसान होईल. तरी ठरावात दर्शविल्याप्रमाणे दि. ३१/१२/९२ पर्यन्तचा कमी करण्यात येणारी रक्कम रु. ११,२०,८८८.०० सिडको नळ धाराकांकडून कमी करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११२/१२:-**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र ८/८ दिनांक १६/६/९० अन्वये रुपये १५,७२०/- प्रतिवर्षाप्रमाणे १३१० चौ. मी. जागा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळास पिकअप शेडसाठी ९९ वर्षासाठी भाडेपट्टयाने देण्याबाबत निर्णय झाला आहे. त्यांनतर परिवहन महामंडळाने भाडे कमी करुन देण्याबाबत विनंती केल्या वरुन माहे मे १९९१ च्या सर्वसाधारण सभेपुढे सादर केला होता. त्यास मंजुरी झाली नाही.

प्रस्तावित जागा औरंगाबाद मंजुर विकास योजनेनुसार आरक्षण क्र. ३२ "खुली जागा" या आरक्षणात आहे व महापालिकेने ही जागा भुसंपादनाने ताब्यात घेतली आहे. आता या जागेचा वापर खुली जागा ऐवजी पिकअप शेडसाठी करावयाचा असल्याने व विकास योजनेच्या प्रस्तावाप्रमाणे वापरात बदल होम असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेरबदलाची कार्यवाही करणे आवश्यक असल्याने या जागेचा वापर "खुली जागा" ऐवजी पिकउप रोड करण्यास वरील प्रमाणे गौण फेरबदल करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

**संवाद :-**

श्री अजिजुल्ला बेग :- एस. टी. महामंडळ यांनी सदरच्या जागेवर शेड न बांधता ओपन स्पेसवर करार करावे. अन्यथा सदरचा प्रस्ताव मंजुर करु नये.

श्री अलफ खान :- प्रस्तावात १३१० चौ. मी. जागा भाडेपट्टयाने देण्याचे ठरले आहे की, किती याबाबतचा तपशीलाची माहिती सांगणे आवश्यक आहे.

मा. महापौर :- सदरचा प्रस्ताव दुरुस्तीसह पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

**ठराव क्र. ११२/१२:-**

पुढील बैठकीत काही दुरुस्तीसह ठेवावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ११३/१३:-**

औरंगाबाद महानगरपालिकेचा सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ४६/१८ दिनांक २८/१०/९१ रोजी स्थगीत झालेला ठराव दिनांक ३०/१/९२ रोजी झालेलया सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक ७७/२ प्रमाणे मंजुर झाला. त्या नुसार महानगरपालिकेच्या हद्दीत वाढ होऊन वाळूज औद्योगिक वसाहत महापालिका हद्दीत घेण्याचा ठराव पारित झाला आहे.

आद्योगीक वसाहत वाळूज व विद्यमान महापालिका हद्दीत यामध्ये बराच भाग येतो. त्यामुळे महानगरपालिका हद्द दोन विभागात विभागली जाईल. त्यामुळे आणि सर्वसाधारण सभेने वरील ठराव पारित केल्यामुळे तसेच नियोजनाच्या व नैसर्गिक हद्दी, महसूल गावाच्या हद्दी यांचा सविस्तर विचार करुन महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल ही बाब लक्षात घेऊन महानगरपलिकेची हद्द वाढीचा दुरुस्त प्रस्ताव खालील प्रामाणे प्रस्तावित करण्यात येतो.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या पुर्व व उत्तर हद्दीला लागून हद्द वाढ प्रस्तावित केली नाही.

दक्षिण हद्दीला लागून सातारा गावाची उर्वरित महसूल अभिलेख प्रमाण जमिन म्हणजे संपुर्ण सातारा गाव आणि संपूर्ण गेवराई गावाची जमिनी.

पश्चिमेस नव्याने सिडको अधिसूचित भाग व औद्योगिक वसाहत त्यात खालील गावांच्या संपूर्ण जमीनीचा समावेश होतो. १) गोलवाडी २) वलदगांव ३) वाडी ४) नेहरी गंगापूर ५) पाटोदा ६) नायंगांव ७) हनंमतगाव ८) वाळूज खुर्द ९) नारायणगांव १०) रामराई ११) जोगेश्वरी १२) कमलापूर १३) रांजणगांव १४) इटावा १५) घानेगांव १६) सहजपूर १७) वडगांव कोल्हाटी १८) तिसगांव १९) पंढरपूर इत्यादीसह वाढी हद्दी नकाशात लाल किनारीने दर्शविले आहे. सदर हद्द वाढीसाठी पूर्वी उप संचालक नगररचना यांनी संमती दर्शविली आहे. तरी महानगरपालिका हद्द वाढीचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३ चे पोट कलम ३ मंजुर करण्यासाठी शासनात पाठविणे करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**संवाद :-**

श्री नरेंद्र पाटील, श्री चंद्रकांत खैरे :- दिनांक २८/१०/९१ रोजी स्थगीत झालेला प्रस्ताव दिनांक ३०/१/९२ रोजी ७७/२ प्रमाणे मंजुरी मिळालेली होती. त्यानुसार संपूर्ण वर्षभरात प्रशासनाने काय केले, याची माहिती द्यावी.

(यावेळी स. सदस्यांमध्ये आपसात चर्चा चालू असते काहीही ऐकू येत नाही.)

मा. महापौर :- मंजुर.

**ठराव क्र ११३/१३:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ४६/१८ दिनांक २८/१०/९१ रोजी स्थगीत झालेला दिनांक ३०/१/९२ रोजी ७७/२ प्रमाणे मंजुरी मिळालेली त्यानुसार महानगरपालिकेच्या हद्दीत वाढ होऊन वाळूज औद्योगिक वसाहत महानगरपालिका हद्दीत घेण्याचा ठराव झाला आहे. नियोजनाच्या व नैसर्गिकदृष्टया महसूल गावाच्या हद्दी यांचा सविस्तर विचार केल्यास महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल ही बाब लक्षात घेऊन महानगपालिकेची हद्दी वाढीचा दुरुस्त ठराव ज्यामध्ये महापालिकेची पुर्व व उत्तर हद्दीला लागून ही वाढ प्रस्तावित नाही. दक्षिण हद्दीला लागून सातारा गावाची उर्वरित महसूल अभिलेखाप्रमाणे जमिन म्हणजे संपूर्ण सातारा गांव आणि संपूर्ण गेवराई गावाची जमिन पश्चिमेस नव्याने सिडको अधिसूचित भाग व औद्योगीक वसाहत त्यात खालील गांवाच्या संपूर्ण जमीनीच्या समावेश होतो. १) गोलवाडी २) वलदगांव ३) वाडी ४) नेहरी गंगापूर ५) पाटोदा ६) नायंगांव ७) हनंमतगाव ८) वाळूज खुर्द ९) नारायणगांव १०) रामराई ११) जोगेश्वरी १२) कमलापूर १३) रांजणगांव १४) इटावा १५) घानेगांव १६) सहजपूर १७) वडगांव कोल्हाटी १८) तिसगांव १९) पंढरपूर इत्यादी वाढीव हद्दी नकाशात लाल किनारीने दर्शविलेले आहे. सदर हद्द वाढविणेसाठी पुर्वी उप संचालक नगररचना यांनी संमती दर्शविली आहे. तरी महापालिका हद्दीच्या प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३ चे पोट कलम ३ अन्वये मंजुर करुन शासनाला पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११४/१४:-**

मालमत्ता अधिकारी मा. आयुक्त, मनपा, औरंगाबाद याचे मंजुरी नुसार प्रस्ताव सादर करीत आहे की, सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ८७/७ दिनांक २२/८/९० अन्वये नाथ मार्केटच्या तळ मजल्यावरील व पहिल्या मजल्या वरील दुकाने भाडयाने देण्याबाबतचे मुळ धोरण ठरलेले आहे. या धोरणानुसार अनेक वेळा निविदा मागवूनही पहिल्या मजल्या वरील दुकाने भाडयाने घेण्यास प्रतिसाद मिळाला नव्हता त्यामुळे पहिल्या मजल्या वरील दुकाने भाडयाने देण्यासाठी सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. ४/३ दिनांक २४/६/१९९२ अन्वये भाडे धोरण शिथील करण्यात आलेले आहे. या सुधारित धोरणानुसार कमी केलेल्या भाडे दराने सुध्दा सदरहू दुकाने भाडयाने गेलेली नाहीत. त्यामुळे अद्याप पर्यन्त ही दुकाने रिकामी असून, त्यामुळे कार्यालयाचे आर्थिक नुकसान होत आहे.

कार्यालयाच्या धोरणानुसार नाथ मार्केटचा तळ मजला व पहिला मजला व्यापारी संकलासाठी आहे. (शॉपिंग सेंटर) पहिल्या मजल्यावरील दुकाने आता अधिक विलंब न होता, भाडयाने दिली जावीत, यासाठी पहिल्या मजल्यावरील दुकान क्र. १ व ३ ते १२ या ११ दुकानाचे बाबतीत " दुकान " संज्ञेत बदल करण्याबाबत विचार करावा लागणार आहे.

सदरहू ११ गाळे वकील कार्यालय, डॉक्टर कन्सलटींग रुम, खाजगी व्यवसायाचे कार्यालय, आर्किटेक्ट कार्यालय व तत्सम व्यवसाय व कार्यालयासाठी भाडयाने देऊ केल्यास भाडयाने जाण्यास प्रतिसाद मिळेल असे वाटते.

करिता वर उल्लेखीत ११ गाळे वर नमुत केलेल्या व्यवसायासाठी भाडयाने देणेबाबत धोरणात्मक बदल करणेबाबत व त्यासाठी भाडे दर कार्यालयाचे सहाय्यक संचालक नगररचना हे जे ठरवतील ते कायम करणे बाबत तसेच पहिल्या मजल्या वरील पुढील बाजुस असलेल्या

दुकानचे बाबत यापुर्वीच्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. ४/३ दिनांक २४/६/९२ अन्वये जे धोरण ठरले आहे, तेच धोरण कायम ठेवणे बाबत विचार होणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :-**

श्री प्रदिप जैस्वाल :- औरंगपूरा येथील सुपर मार्केट येथील संबंधित प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वेळोवेळी टेन्डर मागवून भाडे ठरविलेले आहे. परंतू कुणीही भाडयाने घेण्यास धजले नाही. यासाठी ६०/- रुपये भाडे ठेवणे ऐवजी रुपये ४०/- प्रमाणे भाडे आकारणी करुन महापालिकेची आर्थिक उत्पन्नात भर पडेल. त्युानसार कार्यवाही अन्यथा तसेच वर ठेवल्यास कुणीही भाडयाने घेणार नाही व उत्पन्नही महापालिकेस मिळणार नाही. यासाठी असा बदल करुन प्रस्ताव मंजुर व्हावा.

श्री एकबालसिंग गिल :- या सुपर मार्केटमध्ये जिल्हा समजाकल्याण कार्यालयाने भाडयाने घेणेसाठी प्राधान्य द्यावे.

मा. महापौर :- याबाबत मा. आयुक्त यांचेकडे सुपर मार्केट येथ्ील गाळे किती दराने भाडयाने द्यावयाचे याचा निर्णय घेण्याचा अधिकार देण्यात येऊन कार्यवाही करतील व तसे ठरावात नोंद व्हावी.

**ठराव क्र ११४/१४ :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुपर मार्केट (नाथ मार्केट) येथली तळ मजला व पहिला मजला व्यापारी संकुलासाठी आहे. पहिल्या मजल्या वरील दुकान क्र. १ व ३ ते १२ या ११ दुकानाचे बाबतीत "दुकान" संज्ञेत बदल करणे व सदरहू ११ गाळे, वकील कार्यालय, डॉक्टर कन्सल्टींग रुम, खाजगी व्यावसायाचे कार्यालय व कार्यालयासाठी भाडयाने देणे यासाठी मा. आयुक्त महानगरपालिका यांनी दुकानोच दर निश्चिती करुन पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *" पुरवणी विषय पत्रिका"*

**विषय क्र ११५/१:-**

महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता, श्री, राजभोज यांना त्यांच्या खात्याला परत पाठवणे. कारण त्यांच्यामुळे शहरामध्ये पाण्याच्या आणि ड्रेनेजच्या अनेक तक्रारी आहेत.

| | |
|---|---|
| सूचक : | श्री धनंजय गंगाखेडकर |
| अनुमोदक : | श्री विठ्ठल पेरकर, |
| | श्री बंडू प्रधान |
| दिनांक : | २५/११/९२ |

**संवाद :-**

श्री प्रदिप जैस्वाल :- सुचक दिसत नाही. त्यामुळे रद्द करण्यात यावा.

मा महापौर :- विषय क्र. १ ते ६ चे सूचक नसल्याने प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**ठराव क्र. ११५/१ :-**

सदर प्रस्तावाचे सूचक नसल्याने प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**विषय क्र. ११६/२ :-**

शाहसुक्ता मिया दर्गा कॉलनी एम.आय.डी.सी. रेल्वे स्टेशन जवळ औरंगाबाद ही वस्ती गेल्या २५ ते ३० वर्षा पासून अस्तित्वात असून येथील साधारण ३५० ते ४०० नागरिक राहतात व ९०% लोक मातीकाम करुन पोट भरतात.

तरी येथील लोकांना महानगरपालिके मार्फेत कुठल्याच सोयी उपलब्ध नाही व त्यांना प्रत्येक गोष्टीसाठी फार त्रास होत आहे. हा भाग जर स्लम घोषित झाल्यास यांना महानगरपालिकेच्या सर्व सुविधा उपलब्ध होऊन त्यांची पिळवणूक दूर होईल.

सूचक : श्री धनंजय गंगाखेडकर
अनुमोदक : श्री ॲड. इकबालसिंग गिल
दिनांक : ३/१२/९२.

**ठराव क्र. ११६/२:-**

सदर प्रस्तावाचे सूचक नसल्याने प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**विषय क्र ११७/३:-**

औरंगाबाद महानगरपालिकेने शाळा, उद्याने, शालेय मैदान, दवाखाना तसेच इतर अन्य विविध प्रयोजनासाठी शहरात आरक्षित केलेले भुखंड त्वरील ताब्यात घेण्यात यावे. तसेच सदर भुखंड ज्या ज्या उद्येशाने राखून ठेवण्यात आलेले आहेत ते उद्येश त्वरीत पूर्ण करण्यासाठी भुखंड विकसित करण्यात यावे. अशा भुखंडावरील आरक्षण रद्द करण्यात येऊ नये. प्रस्ताव विचारार्थ सादर.

सूचक : सौ लता दलाल
अनुमोदक : श्री डॅ. शातांराम काळे,
श्री महादेव सुर्यवंशी
दिनांक : ४/१२/९२

**ठराव क्र. ११७/३:-**

सदर प्रस्तावाचे सूचक नसल्याने प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**विषय क्र ११८/४:-**

महापालिकेने ८०/- लाख रुपये खर्चुन पोहण्याच्या तलावाचे बांधकाम चालूच ठेवलेले आहे, परंतू अद्यापही त्याची गळती थांबलेली नाही. पोहण्याचा तलाव पाच फुट खणून पहावा व नंतर बांधकाम करावे नसता दुसऱ्यांना चालवावयास द्यावा. प्रस्ताव विचारार्थ सादर.

सूचक : सौ. लता दलाल
अनुमोदक : श्री. डॅ. शातांराम काळे,
श्री. गिरजाराम हाळनोर
दिनांक : ४/१२/९२.

**ठराव क्र ११८/४:-**

सदर प्रस्तावाचे सूचक नसल्याने प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**विषय क्र ११९/५:-**

आपल्या महानगरपालिकेमध्ये आपण असा ठराव केला होता की, शेतीसाठी लागणारे बी-बीयाने, औषधी या वरील जकात कर रद्द केला होत. पण त्याचा शेतकऱ्यांना काही फायदा नसून व्यापारी यामध्ये आपले उखळ पांढरे करुन घेत आहे.

| | |
|---|---|
| सूचक : | श्री. बंडू प्रधान |
| अनुमोदक : | श्री. विठ्ठल पेरकर |
| दिनांक : | ५/१२/९२. |

**ठराव क्र ११९/५:-**

सदर प्रस्तावाचे सूचक नसल्याने प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**विषय क्र १२०/६:-**

महानगरपालिका औरंगाबादमध्ये उर्दु भाषेसाठी ट्रान्सलेटर व टंकलेखक म्हणुन एक पद निर्माण करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| | |
|---|---|
| सूचक : | श्री. विठ्ठल पेरकर |
| अनुमोदक : | श्री. तकी हसन खान |
| दिनांक : | १४/१२/९२. |

**ठराव क्र १२०/६:-**

सदर प्रस्तावाचे सूचक नसल्याने प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**विषय क्र १२१/७:-**

ज्यातीनगर येथील मंजुरा रेखांकनातील राजहंस अपार्टमेन्टं व सरिता अपार्टमेन्टं (सं.न.१) शहानुरवाडी मागील बाजुस दवाखाना, समाज मंदिर बँक, पोस्ट ऑफिस करिता राखीव असलेल्या भुखंडावरील तसेच ३० व ४० फुट रस्त्यावरील अतिक्रमणे त्वरीत कढण्यात यावी. सदरील भुखंड महापालिकेने ताब्यात घेऊन आरक्षणाचे उद्येशाप्रमाणे चौसरनगर, शहानुरवाडी झोपडपट्टी परिसरातील रहिवाशांनी वरील नागरी सुविधा उपलब्ध करुन देणे बाबत प्रस्ताव विचारर्थ सादर.

| | |
|---|---|
| सूचक : | श्री. गिरजाराम हाळनोर |
| | श्री. अविनाश कुमावत |
| अनुमोदक : | सौ.लता दलाल |
| | श्री. विठ्ठल पेरकर |
| दिनांक : | १६/१/९३. |

**संवाद :-**

श्री प्रकाश जावळे :- ज्योतीनगरच्या संदर्भात त्या ठिकाणी अस्तित्वात ज्या काही झोपडया आहेत त्यांना संपूर्ण अस्तित्व मिळणे असे आमचे म्हणने आहे. त्या सर्वांना न्याय मिळाले पाहिजे.

श्री प्रदिप जैस्वाल :- सदरची जागा महापालिकेची असल्याने काही अतिक्रमणे करुन घरे होण्याची शक्यता आहे. त्यानुसार ज्या कामासाठी सदरील जागा राखुन ठेवलेली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

मा. महापौर :- मंजुर.

**ठराव क्र १२१/७:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ज्योतीनगर येथील मंजुरा रेखांकनातील राजहंस अपार्टमेंन्ट व सरिता अपार्टमेन्ट (स. नं. १) शहानुरवाडी मागील बाजुस दवाखाना, समाजमंदिर, बँक, पोस्ट ऑफिस करिता असलेल्या भुखंडावरील ३० व ४० फुट रस्त्यावरील अतिक्रमणे त्वरीत काढण्यात यावी. सदरील भुखंड महानगरपालिकेने ताब्यात घेऊन आरक्षणाचे उद्येशाप्रमाणे चौसर नगर, शहानुरवाडी, झोपडपट्टी परिसरातील रहीवाशांना वरील नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२२/८:-**

कटकट दरवाजाच्या बाहेर मनपाने ८० फुट डी. पी. रोड तयार केला आहे. परंतू कटकट दरवाजाच्या आतील भागात फक्त ५० रुंद रस्ता तयार करण्यात आला आहे. ज्यामुळे कटकट दरवाजातून वाहने जाणे कठीण झाले आहे. करिता कटकट दरवाजाच्या दक्षिणेकडून भागातून रस्ता काढण्यात यावा. कारण येथील रहदारीस सुरळीतपणे होण्यास मदत होईल.

| | |
|---|---|
| सूचक : | मुजीब अलमशहा खॉन |
| अनुमोदक : | १) श्री. रतनकुमार पंडागळे |
| | २) श्री. किशोर थोरात |
| दिनांक : | १६/१/१९९३ |

**संवाद:-**

मा. महापौर :- मंजुर.

**ठराव क्र. १२२/८:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कटकट दरवाजाच्या बाहेर मनपाने ८० फुट डी. पी. रोड तयार केला आहे. परंतू कटकट दरवाजाच्या आतील भागात फक्त ५० रुंद रस्ता तयार करण्यात आला आहे. ज्यामुळे कटकट दरवाजातून वाहने जाणे कठीण झाले आहे. करिता कटकट दरवाजाच्या दक्षिणेकडून भागातून रस्ता काढून रहदारीस सुरळीतपणे होण्यास मदत होईल या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२३/९:-**

मो. गणेश कॉलनी येथे आयशा बेगम यांच्या कंपाऊडच्या उत्तरेकडे रंजनवन गृ. नि. संस्थेने ३० फुट रुंदीचा रस्ता सोडला होता. सदरील ठिकाणी दोन लोकांनी अतिक्रमण केले होत. त्यापैकी एक अतिक्रमणे मा. आयुक्त यांनी हटविले होते. उरलेले एक अतिक्रमण हटवून त्वरीत या ठिकाणी रस्ता तयार करण्यात यावा. कारण पोलीस क्वार्टर आणि रंजनवन सोसायटीमध्ये जाण्यासाठी रस्ता नसल्याने तेथील लोकांना फारच त्रास होत आहे. तरी त्वरीत सदरील रस्ता तयार करण्यात यावा.

| | |
|---|---|
| सूचक : | श्री. मुजिब आलमशा खान |
| अनुमोदक : | श्री. रतनकुमार पंडागळे |
| | श्री. किशोर थोरात |

दिनांक : १६/१/९३.

**संवादः-**

मा. महापौर :- मंजुर.

**ठराव क्र. १२३/९**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. गणेश कॉलनी येथे आयशा बेगम यांच्या कंपाऊडच्या उत्तरेकडे रंजनवन गृ. नि. संस्थेने ३० फुट रुंदीचा रस्ता सोडला होता. सदरील ठिकाणी दोन लोकांनी अतिक्रमण केले होत. त्यापैकी एक अतिक्रमण हटविले होते. उरलेले एक अतिक्रमण हटवून त्वरीत या ठिकाणी रस्ता तयार करण्यात यावा जेणे करुन पोलीस क्वार्टर आणि रंजनवन सोसायटीमध्ये जाण्यासाठी रस्ता मोकळा होईल करिता, प्रस्तावात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२४/९०:-**

औरंगाबाद शहर विकास आराखडयाप्रमाणे मो. नागेश्वरवाडी येथील सि.स.नं ४६४६ ची २६३१ चौ. मी. क्षेत्रफळाची जागा शैक्षणिक विस्तारासाठी आरक्षित करण्यात आलेली आहे. ही जागा शहराचे मध्यवस्तीत असून या जागेचा वापर गेल्या १०/१५ वर्षा पासून रहिवाशी उपयोगाकरिता करण्यात येत आहे. या ठिकाणी बांधण्यात आलेल्या घरांवर मनपा कडून, मालमत्ता करही वसूल केला जातो. या बाबीचा विचार करता मो. नागेश्वरवाडी येथील सि. स. नं. ४६४६ ची २६३१.० चौ. मी. क्षेत्रफळाची जागा शहर विकास प्रयोजनातून वगळून रहिवाशी उपयोगी या प्रयोजना करिता उपयोगात आणण्याची परवानगी द्यावी.

सूचक : श्री. विजय पालिवाल

अनुमोदक : श्री. सुभाष परदेशी

श्री. शिवाजी कवडे

**संवाद :-**

श्री. प्रदिप जैस्वाल :- विषय क्र. १०,११ व १२ चे सूचक नसल्याने प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

मा. महापौर :- सदरील १०,११,व १२ वा फेटाळण्यात येते.

**ठराव क्र १२४/१०:-**

सदर प्रस्तावाचे सूचक नसल्याने प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**विषय क्र. १२५/११:-**

महानगरपालिका नगररचना विभागात विभागनिहाय कनिष्ठ अभियंता व दुय्यम अविक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. हे कर्मचारी अर्धा दिवस साईटवर असतात व दुपारुन कार्यालयात कार्यरत असतात. त्यामुळे शहरातून येणाऱ्या नागरीकांना अत्यंत त्रास होतो. या तांत्रिक कर्मचाऱ्यांना लिपीकाचे सुध्दा काम करावे लागते. त्यासाठी विभागनिहाय कनिष्ठ अभियंता व दुय्यम अविक्षक यांचे प्रमाणे च लिपिकाची देखील नियुक्ती करणे आवश्यक आहे. जेणे करुन शहरातून येणाऱ्या नागरिकांना त्रास होणार नाही. तांत्रिक कर्मचाऱ्यावरील कामाचा भार कमी होईल. बांधकाम परवानगीच्या संचिका व्यवस्थितरीत्या हाताळल्या जातील. जनतेची कामे सुरळीत पार पडतील. अधिकाधिक प्रकरणे निकाली निघाल्यास मदत होईल. तांत्रिक कर्मचाऱ्यांना साइटवर लक्ष ठेवण्यास वेळ मिळाला. त्यांचे कामात चूका होणार नाहीत.

नागरीकांना देखील त्यांचे कामा बाबत लिपीकामार्फत वेळोवेळी माहिती मिळेल. नगररचना विभागात झोन वाइज लिपीक नियुक्ती करणेबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

| | |
|---|---|
| सूचक : | श्री. धनंजय गंगाखेडकर |
| अनुमोदक : | श्री. बंडू प्रधान |
| दिनांक : | ९/२/९३. |

**ठराव क्र १२५/११:-**

सदर प्रस्तावाचे सूचक नसल्याने प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**विषय क्र. १२६/१२:-**

औरंगाबाद महानगरपालिका मालकीच्या शहरात असलेल्या इमारती, शालेय इमारती, मंगल कार्यालये, पाण्याच्या टाक्या, दुकाने, रिकाम्या जागा, विविध प्रयोजनासाठी राखून ठेवण्यात आलेले भुखंड याची योग्यरित्या निगराणी तथा देखभाल होत नाही. बऱ्याच इमारतीची कागदपत्रे तथा दस्तऐवज आजही महापालिका कार्यालयात उपलब्ध नाहीत. महापालिका मालकीच्या मिळकती खाजगी व्यक्तिनी बळकावल्या आहेत. भाजी मंडया, दुकाने यांचे वर्षानुवर्षा पासूनचे भाडे संबंधिताकडे थकलेले आहेत. त्यामुळे महापालिकेच्या उत्पन्नावर विपरीत परिणाम होत आहे. महापालिका मालमत्तेचे योग्यरित्या संरक्षण होणेसाठी मालमत्ता विभागभाडे वसूली, अतिक्रमण हटाव हे स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात यावे. जेणेकरुन महापालिकेच्या शहरातील मालमत्ता अबाधीत राहतील. मालमत्तांचे भाडे नियमित वसूल होईल. अनाधिकृत बांधकामावर योग्यरित्या नियंत्रण ठेवणे सुकर होईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

| | |
|---|---|
| सूचक : | श्री. धनंजय गंगाखेडकर |
| अनुमोदक : | श्री. बंडू प्रधान |
| दिनांक : | ९/२/९३. |

**ठराव क्र. १२६/१२**

सदर प्रस्तावाचे सूचक नसल्याने प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**विषय क्र. १२७/१३:-**

औरंगाबाद शहराचा विकास झपाटयाने होत आहेत. त्यामुळे शहराच्या विकासाची कामे जलद गतीने होणे जरुरीचे आहे. त्यासाठी प्रशासकीय यंत्रणेमध्ये सुधारण होणे जरुरीचे आहे. त्यासाठी औरंगाबाद महानगरपालिका अस्थापनेवर खालील प्रमाणे वाढीव उप अभियंत्याची पदे निर्माण करणे जरुरीचे आहे.

| **अ.क्र.** | **पदाचे नाव** | **पदाची संख्या** |
|---|---|---|
| १) | उप अभियंता (पाणीपुवठा) | १ |
| २) | शहर अभियंता, अतिरिक्त शहर अभियंता व कार्यकारी अभियंता यांचे स्विय सहाय्यक | ३ |
| ३) | करमुल्य निर्धारण अधिकारी | १ |
| ४) | उप अभियंता (इमारती व रस्ते देखभाल व दुरुस्ती) | १ |

वरील प्रमाणे पदांची मंजुरी झाल्यास शहरातील विकासाची कामे जलद गतीने होऊन, शहराचा विकास साधने शक्य होईल. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सूचक : श्री. प्रदिपकुमार जैस्वाल,
श्री. धनंजय गंगाखेडकर,
श्री. रतनकुमार पंडागळे,
श्री. बंडू प्रधान
श्री. नारायण फत्तेलष्कर

अनुमोदक : श्री. अविनाश कुमावत,
श्री. प्रभाकर विधाते,
श्री. केशव सोनवणे,
श्री. जयवंत ओक,
श्री. सुदाम वाघमारे.

दिनांक : ८/२/९३.

**संवाद :-**

श्री प्रकाश जावळे :- उप अभियंता पाणीपुरवठा व करमुल्य निर्धारण अधिकारी या पदास मंजुरी व्हावी. बाकी इतर पदास मंजुरीची आवश्यकता नाही.

श्री अजिजुल्ला बेग :- स. सदस्यांनी सदरील प्रस्ताव मांडलेला आहे. तर प्रशासनाने आपले मत मांडावे. किती खर्च अपेक्षित आहे याचीही माहिती द्यावी.

श्री एकबालसिंग गिल :- क्राप्ट टिचर्स या पदासही याबरोबरच मंजुरी द्यावी.

मा. महापौर :- या बाबत मा. आयुक्त यांनी आपले मत मांडावे.

मा. आयुक्त :- सदरील प्रस्तावाबाबत शासनाने तपासणी केलेली नाही. तरी तपासून पुढील वेळी ठेवण्यात येईल.

श्री. अलफ खान :- प्रस्ताव मंजुर करण्यापूर्वी एकंदर खर्च किती अपेक्षित आहे या माहितीसह ठेवणे आवश्यक आहे.

मा. महापौर :- मा. आयुक्त यांनी सुचित केल्याप्रमाणे शासनाने तपासून पुढील वेळी ठेवावे.

**ठराव क्र १२७/१३ :-**

सदरील प्रस्ताव शासनाकडून तपासून पुढील वेळी ठेवण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १२८/१४:-**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने ट्रान्सफार्मर (डी. पी.) तसेच विद्युत खांब आहेत. त्यावर महापालिके मार्फत कुठलाही कर आकारण्यात येत नाही. महापालिकेचे आर्थिक उत्पन्नात वाढ होणेसाठी प्रत्येक ट्रन्सफार्मरवर दरमहा रु. ३००/- तसेच प्रत्येक विद्युत खांबावर दरमहा रु. ५/- याप्रमाणे कर आकारणी करण्यात यावी. सदर कर विद्युत मंडळाकडून वसूल करण्यात यावा. जेणे करुन महापालिकेच्या उत्पन्नात भर पडेल. प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

सूचक : श्री. सुदाम वाघमारे,
श्री. मधुकर शिंदे

अनुमोदक : श्री. प्रदिप जैस्वाल, श्री. मधुकर शिंदे
दिनांक : १०/२/९३.

**संवाद :-**
मा. महापौर :- प्रशासकीय प्रस्ताव क्र ८ मंजुर झालेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही होईल.
**ठराव क्र. १२८/१४:-**

प्रशासकीय प्रस्ताव क्र. ८ मंजुर झालेला असल्याने सदरील प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**विषय क्र. १२९/१५:-**

शेलार रुग्णालगतचे चौकास येथील रहिवाशी शिवाजी चौक म्हणून संबोधतात. सदर चौकात प्रशस्त जागा उपलब्ध असुन खोकडपूरा पुतळा समिती मार्फत १) नेताजी सुभाषचंद्र बोस २) शहीद वीर भगतसिंग ३) शहीद वीर राजगुरु या तीन हुतात्म्यांच्या त्रिमूर्ती पूर्णाकृती पुतळा उभारणे तसेच या पुतळया भोवती वाहतूक बेट तयार करणेचा मनोदय आहे. सदर पुतळा समिती वरील काम स्वखर्चाने करण्यास तयार आहे. सदर चौकातील प्रशस्त जागेत खोकडपूरा पुतळा समितीस वरील हुतात्म्यांचे त्रिमुर्ती पुर्णाकृती पुतळे उभारणेस व वाहतूक बेट तयार करणेस परवानगी देणेबाबत प्रस्ताव विचारार्थ व सर्वानुमते मंजुरीस्तव सादर:-

सूचक : श्री. सुदाम वाघमारे, श्री. प्रदिप जैस्वाल
अनुमोदक : श्री अविनाश कुमावत, श्री मधुकर शिंदे
दिनांक: १०/२/९३.

**संवाद :-**
**मा. महापौर :-** मंजुर.
**ठराव क्र. १२९/१५:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शेलार रुग्णालयाचे चौकास येथील रहिवाशी शिवाजी चौक म्हणून संबोधतात. सदर चौकात प्रशस्त जागा उपलब्ध असुन, खोकडपूरा पुतळा समिती मार्फत १) नेताजी सुभाषचंद्र बोस २) शहीद वीर भगतसिंग ३) शहीद वीर राजगुरु या तीन हुतात्म्यांच्या त्रिमूर्ती पूर्णाकृती पुतळा उभारणे तसेच या पुतळयाभोवती वाहतूक बेट तयार करणे आहे. सदर पुतळा समिती वरील काम संबंधित समिती स्वखर्चाने करण्यास तयार आहे. सदर चौकातील प्रशस्त जागेत खोकडपूरा पुतळा समितीस वरील हुतात्म्यांचे त्रिमुर्ती पुर्णाकृती पुतळे उभ्ांरणेस व वाहतूक बेट तयार करणेस महानगरपालिके मार्फत परवानगी देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३०/१६:-**

१) संजय गांधी युवक कल्याण सांस्कृतिक व क्रिडा मंडळ, औरंगाबाद (धर्मदाय आयुक्त मान्यता प्राप्त) संस्थेला महानगरपालिकेची खुली जागा शीट नं. ४९ सी.टी.एस. नं. ९२६९ जिम्नॅशियम साठी मिळणे.

२) महानगरपालिकेच्या वाहनांची देखभाल चांगल्या प्रकारे होत नाही. त्या करिता ज्युनिअर इंजिनिअरची जागा निर्माण करुन दैनंदिन वाहनांची चांगली देखरेख ठेवण्याचा प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा.

सूचक : श्री. मोहसिन अहमद,

अनुमोदक : श्री. प्रदिप जैस्वाल,
श्री. नारायण फत्तेलष्कर,
श्री. बंडू प्रधान
दिनांक : १५/२/९३.

**संवादः-**
मा. महापौरः- मंजुर.
**ठराव क्र. १३०/१६:-**

१) प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजय गांधी युवक कल्याण सांस्कृतिक व क्रिडा मंडळ, औरंगाबाद (धर्मदाय आयुक्त मान्यता प्राप्त) संस्थेला महानगरपालिकेची खुली जागा शीट नं. ४९ सी.टी.एस. नं. ९२६९ जिम्नॅशियम साठी मिळणे. तसेच

२) महानगरपालिकेच्या वाहनांची देखभाल चांगल्या प्रकारे होत नाही. त्या करिता ज्युनिअर इंजिनिअरची जागा निर्माण करुन दैनंदिन वाहनांची चांगली देखरेख ठेवण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर "जन गण मन" राष्ट्रगिताने सभा संपली.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
मा. महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १८/३/१९९३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधांरण सभेचा इतिवृत्तांत**

---

**गुरुवार दिनांक १८/३/१९९३ रोजी (अंदाजे) ठिक ११.३५ वाजता मा. महापौर श्री. यादव अशोक सायन्ना यांचे अध्यक्षतेखाली "वंदे मातरम्" या गिताने सर्वसाधारण सभेस सुरुवात झाली.**

**या सभेस मा. उप आयुक्त, तथा अधिकारी वर्ग आणि खालील प्रमाणे स. सदस्य उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) मा. श्री. अजिमखान दादामियाँ अ. रहेमान | स. सभासद |
| २) मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव | -//- |
| ३) मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | -//- |
| ४) मा. श्री. अजिजुल्ला बेग वहिद बेग | -//- |
| ५) मा. श्री. पंडागळे रतनकुमार नारयणराव | -//- |
| ६) मा. श्री. भगुरे तुळशीराम छगन | -//- |
| ७) मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलीक | -//- |
| ८) मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव | -//- |
| ९) मा. श्री. घडामोडे मोतीराम नारयणराव | -//- |
| १०) मा. श्री. म. आयुब गुलाम जिलानी | -//- |
| ११) मा. श्री. मुजीब आलमशा खान | -//- |
| १२) मा. श्री. प्रधान बंडू गोविदंराव | -//- |
| १३) मा. श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर | -//- |
| १४) मा. श्री. तकीहसन खान कासिम हसनखान | -//- |
| १५) मा. श्री. स. अहमद एकबालूद्दीन स. मो. कुतुबउद्दीन | -//- |
| १६) मा. श्री. ओक जयवंत केशवराव | -//- |
| १७) मा. श्री. गिल इकबालसिंग प्रितमसिंग | -//- |
| १८) मा. श्री. वंजारे पिटर प्रभाकरराव | -//- |
| १९) मा. श्री. अ. रशिदखान (मामू) अ. हमीदखान | -//- |
| २०) मा. सौ. दलाल लता श्रीनिवास | -//- |
| २१) मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | -//- |
| २२) मा. श्री. हाजी मोहमंद हाफिजोधीन | -//- |
| २३) मा. श्री. छापरवाल रमेश नारायणराव | -//- |
| २४) मा. श्री. कवडे शिवाजी लक्ष्मणराव | -//- |
| २५) मा. श्री. डॉ. संचेती चेनकरण गणेशलाल | -//- |
| २६) मा. श्री. फैय्याजखान अहमदखान | -//- |
| २७) मा. श्री. मोहसिन अहमद बशीर अहमद | -//- |
| २८) मा. श्री. स. हुसैन स. अहमद | -//- |
| २९) मा. श्री. मगर शंकर जिजाराम | -//- |

३०) मा. श्री. मानकापे नामदेवराव शामराव -//-
३१) मा. श्री. पैठणकर पांडूरंग भिमाजी -//-
३२) मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलान -//-
३३) मा. श्री. अलफखान हुसैनखान -//-
३४) मा. श्री. वाघमारे सुदाम भानुदास -//-
३५) मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी -//-
३६) मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव -//-
३७) मा. श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ (१७/३/९३ चे पत्रक जोडले आहे.) -//-
३८) मा. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव -//-
३९) मा. श्री. डॉ. काळे शांताराम यशवंत -//-
४०) मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस. -//-
४१) मा. श्री. बारवाल गजानन रामकिसन -//-
४२) मा. श्री. जहागिरदार अजिज मुक्तार अहमद -//-
४३) मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम -//-
४४) मा. श्री. गाडे गंगाधर सुखदेव -//-
४५) मा. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव -//-
४६) मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव -//-
४७) मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल -//-
४८) मा. श्री. नवपूते कचरु चंद्रभान -//-

**संवादः-**

श्री नरेंद्र पाटीलः- आठ दिवसापूर्वी मुंबई येथे बॉम्बस्फोट झाला त्या स्फोटामध्ये निरपराध हजारो व्यक्ती मृत्युमूखी पडले. त्या सर्वांना सभागृहात दोन मिनिटे श्रध्दांजली वाहण्यात यावी.

श्री अविनाश कुमावतः-यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :- ठिक आहे.

"००.२ मिनिटे स्तब्ध उभे राहून मुंबई बाम्ब स्फोटातील मृत व्यक्तींना सभागृहातर्फे श्रध्दांजली वाहण्यात आली".

श्री. अविनाश कुमावतः- एक महिन्यापासून मी पत्र देऊन विचारणा केलेली होती की, मो. जवाहर कॉलनी येथे मनपातर्फे दवाखांना चालू करण्यास शासनातर्फे परवानगी आलेली आहे. परंतू त्या मनपाच्या मालकीच्या जागी एका वर्षाच्या भाडे तत्वावर पोलीस स्टेशन आहे. ते पोलीस स्टेशन हटवून त्या ठिकाणी मंजूर करण्यात आलेल्या दवाखाना त्वरीत सुरू करणे बाबत काय कार्यवाही केली. कृपया याची माहिती द्यावी.

श्री शातांराम काळेः- मो. जवाहर कॉलनी भागात नागरीकांच्या सुखसोयीसाठी भाजी मंडीसाठी जागा ठेवण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे या ठिकाणी कार्यवाही व्हावी अन्यथा येथेही अतिक्रमण होण्याची शक्यता आहे.

श्री. गिरजाराम हाळनोरः- मी एक लक्षवेधी सुचना नविन नळ कनेक्शनची मुदत वाढ करणे करिता मांडलेली आहे. त्यावर विचार व्हावा.

मा. महापौर :- स. सदस्यांनी त्याच्या लक्षवेधी सुचित लिहिल्याप्रमाणे औरंगाबाद स्थानिक वर्तमानपत्रात मा. आयुक्तांनी आवाहन केले होते की, शहरातील नागरिकांनी नविन नळ कनेक्शन करिता दि. १५/३/९३ पुर्वी संचिका दाखल कराव्यात. तथापी लोकांचा वाढता प्रतिसाद व अनाधिकृत नळ कनेक्श्न दर अंकुश ठेवण्या करिता सदरची मुदतीत दिनांक ३१/३/९३ पर्यन्त वाढ करण्यात येते.

श्री मोहसिन अहमद:- माझी एक लक्षवेधी सुचना आहे की, वार्ड क्र. ३५ मधील शीट क्र. ४८ येथील मनपाच्या खुल्या जागेवर अतिक्रमण केलेले आहे. त्यावर चर्चा व्हावी.

मा. महापौर :- दै. आलमगिर टाईम्स या उर्दु दैनिकात बातमी प्रसिध्दीस आलेली आहे की, सिट क्र. ४८ व सि. स. नं. ९०६ वर अतिक्रमण करुन बेकायदेशीर बांधकाम केलेले आहे. सदरची जागा मनपाीच खुली जागा आहे. त्यावर गांजा, चरस आदि वस्तूंची विक्री सर्रास होत असते. त्या बेकायदेशीर बांधकामास योग्य ती कार्यवाही व्हावी.

श्री मोहसिन अहमद:- जियोयाद्दीन ले आऊट मधील माझ्या वार्डातील एका व्यक्तिने गेल्या चार वर्षापासून अतिक्रमण करुन बांधकाम केलेले आहे. याबाबत मी वारंवार मा आयुक्त व उपआयुक्ताकडे पत्र कळविले आहे. परंतू संबंधिताने कोर्टाद्वारे स्टे आणून अनाधिकृत बांधकाम केलेले आहे. सदरची जागा मनपाची खुली जागा असून, त्यावरील अनाधिकृत बांधकाम थांबविण्याची कार्यवाही त्वरीत करणे आवश्यक आहे.

श्री. मुजिब आलमशा खान:- स. सदस्य यांनी केल्यानुसार सदरची जागा मनपाची असेल, परंतू तेथील कारागीर व संबंधित मालक यांच्या भांडनामुळे संबंधितीला अरेस्ट करण्यात आले. तथापी ती जागा चार पाच वर्षा पासूनची संबंधित इसम वापरत असून त्यावर कोणत्याही प्रकारचे अनाधिकृत बांधकाम नाही. याबाबत मी प्रत्यक्षात पाहणी केलेली आहे. या जागेबाबत नगररचना विभागाने त्वरीत कार्यवाही न केल्याने या चूका वारंवार घडत आहेत.

श्री. मोहसिन अहमद:- या संदर्भात पशुधन विकास अधिकारी व मी स्वत: वारंवार विनंत्या केलेल्या आहेत, परंतू कोणतीही कार्यवाही झालेली नाही. याबाबत दि. ८/१/९० पासून कोर्ट केस चालु असून, करण्यात आलेल्या अनाधिकृत बांधकामाची त्वरीत योग्य ती कार्यवाही व्हावी. कारण याबाबत वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्दीस आलेले आहे.

श्री प्रदिप जैस्वाल:- स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे चार पाच वर्षापासून कोर्ट केस चालु असल्यास, त्यावर काय निर्णय आहे. याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

श्री मोहसिन अहमद:- दि. ८/१/९० पासून अद्यापही कोर्टाचा निकाल लागलेला नाही. याबाबत मी विचारणा केली असता, मलाच तुमच्यावर कार्यवाही करण्यात येईल. असे पत्र उप आयुक्तांच्या नांवाने देण्यात आले. परंतू मनपाने काय कार्यवाही केली. खुली जागा आपल्या ताब्यात का घेत नाही याची माहिती द्यावी.

श्री प्रदिप जैस्वाल:- महानगरपालिका हद्दीमध्ये १८७ आरक्षणापैकी अशा कित्येक आरक्षणे आहेत की त्यावर फार मोठया प्रमाणात अतिक्रमणे झालेली आहेत. त्यावर मनपा काहीही करु शकत नाही. तर जे वकीलाचे पॅनेल आहे ते सुध्दा योग्य पध्दतीने कार्य करुन निर्णय लावत नाही. त्यामुळे अतिक्रमणात वाढ होत आहे.

श्री मुजिब आलमशा खानः- जेव्हा लोकप्रतिनिधी शासन या मनपात अस्तित्वात आले तेव्हा २० x ३० चे बांधकाम परवानगी मागीतली होती. परंतू ते नाकारण्यात आले. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी अतिक्रमणे वाढलेली आहेत. तेव्हा जोपर्यंन्त २० x ३० च्या जोगेला परवानगी देणार नाहीत. तोपर्यंन्त वाढ सतत होतच राहतील.

श्री शांताराम काळेः- मो. उस्मानपुरा भागामध्ये सुध्दा अशाच प्रकारे मनपाच्या खुल्या जागेवर एक इसम अतिक्रमण करीत आहे. त्याबाबत मी संबंधित अधिकाऱ्यांना कळविले तेव्हा त्यांनी त्या जागेबाबत कोर्ट केस चालु आहे, असे उत्तर देवून टाकले. म्हणजे आपलेच संबंधित अधिकारी हे इतरांना सर्व माहिती देवून सहकार्य करतात व मनपाच्या आरक्षणाच्या बऱ्याचशा जागेवर कोर्ट केसेस चालू आहेत. हे केवळ संबंधित अधिकाऱ्यांच्या दिरंगाईने होत असते. अतिक्रमणाला भाग पाडतात. याची काळजी घेणे अधिकाऱ्यांना आवश्यक आहे (यावेळी शेम शेम अशा घोषणा सभागृहात उमटतात.)

श्री. मोहसिन अहमदः- माझ्या वार्डातील अतिक्रमणाबाबत अनेकदा पत्राद्वारे कळविले होते परंतू कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

मा. महापौर :- स. सदस्य आपण लक्षवेधी सुचना मांडलेली असल्याने आपल्या सुचने संबंधीची संचिका मागविण्यात येत आले.

श्री मुजिब आलमशा खानः- मी आपल्या समोर तीन मनपाच्या ओपन जागे बाबत माहिती देवून अतिक्रमणे झाल्याचे कळविले होते. तथापी माहिती मिळाली नाही.

श्री. प्रदिप जैस्वालः- मनपाच्या खुल्या जागेच्या संदर्भात लोक लाखो रुपये कमवित असतील तर मनपाच्या वकील पॅनलला काहीच अर्थ नाही.

श्री नरेंद्र पाटीलः- मनपा मधील वकिलांचे पॅनलची पुर्नरचना करणे आवश्यक आहे. गेले कित्येक दिवसापासूनचे पॅनलमध्ये बदल नसून त्यामुळे ते पॅनेल मधील वकीलच इतरांना माहिती पुरवितात. यासाठी पॅनेलमध्ये बदल करुन नविन बॉडी तयार करावे.

सौ. लता दलालः- माझ्या वार्डामध्ये नेहरु पॅलेस जवळ मनपाच्या खुल्या जागेवर व दुसऱ्या एका जागेवर अतिक्रमण होत असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांना पत्राद्वारे कळविले होते. तथापी काहीही झालेले नाही.

मा. महापौर :- विधी सल्लागारांनी माहिती द्यावी.

विधी सल्लगारः- स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नासंदर्भात सन १९८८ पासून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. त्यामध्ये तात्पुरता मनाई हुकूम दिलेला होता. तो जिल्हा सत्र न्यायालयात गेलला आहे. आणि प्रकरण न्यायालयात प्रलंबीत आहे. याबाबत न्यायालयाकडे अनेकदा विनंती केली की, प्रकरण लवकर निकाली काढावे. त्यावर प्रकरण साक्षी पुरावे साठी ठेवण्यात आलेले आहे.

श्री मोहसिन अहमदः- प्रश्न अतिक्रमाणाचाही नसून मनपाच्या खुल्या जागे बाबतचाही आहे. किती दिवसापासून प्रकरणावर स्टे आहे. स्टे व्हॅकेट का होत नाही.

श्री चेनकरणे संचेतीः- मालकी हक्कावर स्टे आहे की, अतिक्रमणावर स्टे आहे याची माहिती द्यावी.

श्री. प्रदिप जैस्वाल़ः- मनपाद्वारे ज्या केसेस कोर्टात चालू आहेत. त्यावर त्वरीत निर्णय लागत नाही. याबाबत जेवढया काही केसेस असतील त्या सर्व माझ्याकडे घ्याव्यात

दोन महिन्याच्या आत सर्व केसेस निकाली काढण्याचे प्रयत्न करतो. कारण पाच/पाच वर्षे स्टे व्हॅकेट करु शकत नाही. तर पॅनेलला काहीच अर्थ नाही.

श्री. मोहसिन अहमदः- मा. आयुक्तांनी गेले तीन महिन्यापुर्वी संबंधित अधिकाऱ्यांना अतिक्रमण हटविणेबाबत सुचना केलेलया होत्या. परंतू पोलीस फोर्समुळे कदाचित कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे लाखो रुपये लोक कमवित आहे.

मा. महापौर :- कोर्टात स्टे असल्याने, त्यावर कार्यवाही झालेली नाही.

श्री मोहसिन अहमदः- मनपाच्या प्रॉपर्टीबाबत जर कोर्टात केस असेल तर, त्याठिकाणी अनाधिकृत बांधकाम आहे. ते हटविण्यात यावे.

श्री. मुजिब आलमशा खानः- संबंधित जागेची मालकी बाबत पडताळणी व्हावी. बहुतेकांना पी. आर. कार्ड तयार केलेले आहे.

श्री. मोहसिन अहमदः- सर्व स. सदस्यांची प्रापर्टीची चौकशी व्हावी आणि सर्व प्रथम माझ्या प्रापर्टीची चौकशी व्हावी (यावेळी बरेचसे स. सदस्य टाळया वाजवतात.)

मा. महापौर :- मालमत्ता अधिकाऱ्यांनी संबंधित अतिक्रमणाबाबत माहिती द्यावी.

मालमत्ता अधिकारीः- वरील भागात संबंधित मालकांनी मटेरियल जमा केलेले होते. परंतू आम्हाला सुचना मिळताच कोणत्याही प्रकारचे बांधकाम झाले ते पुर्वीचेच आहे. त्यामुळे त्या जागेवरील बांधकाम आम्हाला तोडता आलेले नाही.

श्री. मोहसिन अहमदः- त्या जागेची संबंधित अधिकाऱ्यांनी पंचनामा केला त्याप्रमाणे सर्व कागदपत्रांची प्रुफ आहेत. मालमत्ता अधिकारी यांनी खोंटी माहिती दिली. माझ्या स्पष्ट आरोप आहे की, मालमत्ता अधिकाऱ्यांचा या प्रकरणात हात आहे. याबाबत संपूर्ण चौकशी होऊन कार्यवाही व्हावी.

मा. महापौर :- संबंधित जागेबाबत व अतिक्रमणाबाबत सखोल चौकशी करुन उप आयुक्त पुढील बैठकीत अहवाल सादर करतील.

श्री मोहसिन अहमदः- या जागेवर अतिक्रमणे होऊ नये, याची खबरदारी संबंधित अधिकारी यांनी घ्यावी. याची सुचना व्हावी.

मा. महापौर :- ठिक आहे. नोंद घेण्यात यावी.

श्री. मुजिब आलमशा खानः- या भागामध्ये संपूर्ण ले आऊट वर अतिक्रमण झालेले आहे. उपआयुक्त हे कशा कशाची चौकशी करतील.

श्री. मोहसिन अहमदः- सर्वात प्रथम माझ्या घरापासून चौकशी करावी.

श्री. इकबालसिंग गिलः- मनपा जकात सेंट्रल नाक्याच्या रोडवरील वॉल कंपाऊंडला लागून अनाधिकृत शॉपिंग दुकानपत्रे टाकून होत आहते. याबाबत मालमत्ता अधिकाऱ्यांना त्वरीत आदेश द्यावेत.

श्री रशिद मामूः- लोटा कारंजा ते रोबनगेट येथील काही दुकाने तुटलेली होती. त्यांना या रोडवर जागा देण्यात आलेली आहे. माजी आयुक्त यांच्या कारकिर्दीत सदरील दुकाने किरायाने देण्यात आलेली आहेत.

श्री मुजिब आलमशा खानः- ज्यांची घरे रस्ता रुंदीकरणात तुटलेली होती. त्यांना त्या जागेवर पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण नाही. या ठिकाणी सर्व समाजाचे टपऱ्या आहेत.

श्री शांताराम काळेः- शहरातील बऱ्याचशा भागामध्ये अतिक्रमणे होत आहेत. परंतू रितसर परवानगी मागितली तर ती देत नाही. याचे कारण काय?

श्री चेनकरण संचेती:- ज्या ठिकाणी अतिक्रमणे झालेली आहेत व त्या बाबत काही निगोशिएशन करावयाचे असल्यास, ती करुन प्रकरण निकाली काढावे व माझ्या वार्डातील सहा लोकांनी पैसे देवून, विकत घेण्यास येणारी जागेवर इतरांचे अतिक्रमण होऊ नये, याची काळजी घ्यावी.

श्री इकबालसिंग गील:- गेल्या पाच वर्षा पासून, टपऱ्यासाठी आम्ही शिफारीस करतो. परंतू एकाही टपरीला माझ्या वार्डात परवानगी मिळालेली नाही. उलट डीपी रोड आहे, म्हणून प्रकरण बंद केल्या जाते. तो निर्णय संपूष्टात आणून सुशिक्षितांना वाव द्यावा.

श्री शांताराम काळे:- टपरी संबंधत एक पॉलीसी तयार करणे आवश्यक आहे. कोर्टाकडून आदेश आणूनही त्याची अंमलबजावणी होत नाही. माझ्या वार्डातील अशाच प्रकारची केस निदर्शनास आणून दिली परंतू काहीही कार्यवाही झालेली नाही.

मा. महापौर :- स. सदसय श्री काळे यांनी सुचित केल्याप्रमाणे कार्यवाही व्हावी व मेडीकल रोडला हायवे सोडून टपरीसाठी परवानगी देण्यात यावी. त्याचप्रमाणे मालमत्ता अधिकारी यांनी स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्ना संदर्भात माहिती द्यावी.

श्री. अयुब जागिरदार:- मध्यवर्ती जकात नाका रोडवर ज्या अंदाजे दहा टपऱ्या बसविण्यात आलेल्या आहेत. त्यांची रोड मध्ये घरे तुटलेली आहेत. अशा व्यक्ती माजी आयुक्त यांनी या रोडवर परवानगीने बसविली आहेत. परंतू त्याच बरोबर अंदाजे ९० टपऱ्या ज्या आहेत त्या अनाधिकृत बसलेल्या आहेत. त्यामुळे सदरील रोडवर गर्दी होत आहे. या अनाधिकृत टपऱ्या किती बसविण्यात आल्या? मनपाच्या परवानगीने बसविण्यात आल्या काय? याबाबतची माहिती देवून, दोन दिवसात अनाधिकृत टपऱ्यांचे बाबतीत योग्य तो निर्णय घेऊन कार्यवाही करावी. पुढील बैठकी पर्यंन्त याचा निर्णय प्रलंबीत ठेवण्यात काहीही अर्थ नाही.

श्री नरेंद्र पाटील :- टपऱ्यांची परवानगी देत असतांना नेमके कोण्त्या ठिकाणी देतो. याचा प्रथमतः विचार होणे आवश्यक आहे. विनाकारण कोठेही टपऱ्यांचे परवानगी देण्यात येऊ नये.

मालमत्ता अधिकारी :- सेंन्ट्रल जकात नाका रोड ज्या टपऱ्या बसविण्यात आलेल्या आहेत. त्या चेलीपूरा ते रोषनगेट भागातील रस्त्याच्या बाधीत होणाऱ्या व्यक्तिनांच देण्यात आलेल्या आहेत. या रोडमध्ये रोषनगेट पर्यंन्त कमीत कमी ४-५ व्यक्तिंना टपऱ्यांचे परवानगी देण्यात आलेली आहे आणि त्या पुढील २५ लोकांचे टपऱ्या काढण्यात आल्या त्यांनाही आर्लटमेंट देण्यात आलेले आहे. त्याच्यां पैकी प्रत्यक्षात सर्व्हे केले असता अंदाजे ६० लोकांनी जागा ताब्यात घेऊन बसलेले आहेत, व १६ व्यक्तिंनी फक्त भाडे पट्टा करार केलेला आहे. तरीही निश्चित आकडा सांगता येणे आता शक्य नाही. बाकी लोकांना भाडे पट्टा तयार करणे व्हावयाचा आहे. ज्यांची घरे तुटलेली आहेत त्यांना पर्यायी व्यवस्था म्हणून जागा ज्या देण्यात आल्या त्या नगररचना विभागाच्या रिपोर्ट वरुनच दिलेल्या आहेत. तरी ही अदांजे १०-१५ अनाधिकृत टपऱ्या या ठिकाणी बसलेल्या आहेत. त्याबाबत मा. आयुक्त यांनी संबंधित टपऱ्या हटविण्याचे आदेश दिलेले आहेत. परंतू पोलीस फोर्स न मिळाल्याने सदरचे काम थांबलेले आहे. आणखी

बरेच अर्ज टपरीसाठीचे या भागातील विचाराधिन आहेत. तेथील अनाधिकृत टपऱ्यांना हटवून नियमाप्रमाणे कार्यवाही करणाऱ्या टपरीधारकांना बसविण्याची कार्यवाही करता येईल.

श्री रतनकुमार पंडागळेः- गेल्या वर्ष भरापासून या ठिकाणी अनाधिकृत टपऱ्या बसत आहेत, तर त्या हटविण्यासाठी पोलीस फोर्स न मिळण्याचे कारण काय?

श्री तकीहसन खानः- या टपऱ्यांचे संदर्भात ५०% टपरीधारकांनी स्वतःची टपरी दुसऱ्यांना विकून, तिसरा व्यक्ती मालक म्हणून बसलेले आहेत. यामुळे मालमत्ता अधिकारी व स. सदस्य श्री. अयुब जागिरदार यांनी केलेल्या सुचना चूकीच्या नाही. परंतू अशा टपरी धारकाबाबत पडताळणी करणे आवश्यक आहे.

श्री. गंगाधर गाडेः- सेन्ट्रंल जकात नाक्या रोडवर ज्यांची घरे तुटलेली आहेत. अशांना पर्यायी व्यवस्था म्हणून जागा दिल्यास, आमचे काहीही म्हणने नाही. परंतू त्या निमित्ताने बरेचसे टपऱ्या बसत असतील तर ते योग्य नाही. तसेच स. सदस्य श्री गील यांनी सूचित केल्याप्रमणे त्या ठिकाणी शॉपिंग सेंटर बनत असेल तर, ते चूकीचे आहे. आम्ही वेळोवेळी अर्ज देतो की, जे सुशिक्षित बेकार आहेत, मागासवर्गीय आहेत. त्यांना टपऱ्यासाठी जागा देण्यात याव्या परुंतू त्यांच्या अर्जाचा विचारच होत नाही. पोलिस फोर्स न मिळाल्याचे कारण न दाखविता, ज्यांनी अर्ज दिलेला आहे. त्यांच्या उदर निर्वाहासाठी त्यांना जागा देणेची कार्यवाही व्हावी.

श्री मोतीराम घडामोडेः- महानगरपालिकेची जागा हे उत्पन्नाचे साधन आहेत असे मला वाटते. ज्या काही मनपाची आरक्षित जागा आहेत, त्या ठिकाणी टपरीधांरकांना स्वतःच्या धंदा करणेसाठी जागा देणे बाबत कार्यवाही व्हावी. उदा. जळगांव नगर परिषदेचे अध्यक्ष यांना त्या हद्दीमध्ये अशाच आरक्षित जागांवर सुदंर असा अराखडा तयार करुन, सुशिक्षित व बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्याचे प्रयत्न केलेला आहे. त्यांचा आदर्श किंवा त्यांना आखलेल्या योजनांची माहिती एकदा घ्यावी किंवा प्रत्यक्षात काही स. सदस्य यांनी अधिकाऱ्या समवेत दौरा काढावा, म्हणजे योग्य ती माहिती मिळेल. त्यांच्या या उत्कृष्ठ कामगिरीने एकतर मनपास उत्पन्न मिळते आणि योजना शिस्तबध्द असल्याने कोणतीही कायदेशीर अडचणी येत नाहीत. सिडको येथील गुलमोहर कॉलनीत जसे सिडकोर्नी क्रिडा संकुलची ठिकाणी ३२ दुकांनाची विक्री केली व पैसा उभा केला तशी ही पध्दत राबविण्याचे प्रयत्न करावें. जकात नाका रोडवर बरेच अतिक्रमण होत असून, रोड लहान असल्याचे जाणवते याचे कारण ज्यांना पर्यायी जागा दिलेली आहे, ते गरीब त्यक्ती म्हणून रोडवर अनाधिकृत बांधकामे करुन, दुसऱ्यांना लाखो रुपयेने विकत देऊन, पैसा उत्पन्न करण्याचे प्रयत्न करीत आहेत. याबाबत योग्य ती कार्यवाही करावी आणि मा. आयुक्तांनी प्रत्यक्षात लक्ष घालून, कार्यक्रम टपऱ्यांचे संदर्भात संपुष्टात आणावा.

श्री चेनकरण संचेतीः- शहरातील ज्या रोडवर मनापातर्फे परवानगी टपऱ्यासाठी देण्यात येतील. त्याबाबत प्रथमतः सर्व्हे करुन निश्चित करावा आणि सुशिक्षित बेकारांना टपऱ्या बसविण्यात परवानगी द्यावी. ज्यामुळे मनपाचे उत्पन्न वाढेल.

सौ. लता दलालः- नेहरु प्लेस या मध्यवर्ती बसस्थानका समोरील खुल्या जागेतील भागात एक व्यक्ती वेश्या व्यवसाय करते याबाबत मनपाने कार्यवाही करावी.

श्री मुजिब आलमशा खानः- मनपाने माझ्या कडून तीन एकर जागा विकत घेतलेली आहे. त्या जागेवर मनपाने वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यासाठी छोटया योजनाच्या आधारे घरे बांधुन दिलेली आहेत व उरलेली जमीन इतरांना विक्रीद्वारे करीत आहेत. याबाबत मनापाची मंजुरी घेतलेली आहे किंवा नाही याची चौकशी व्हावी.

श्री मधुकर शिंदेः- गेल्या तीन वर्षापासून संबंधित विभागास विनंती करती होतो की, क्रांतीनगर या रोडवर बऱ्याच अनाधिकृत टपऱ्या झालेल्या आहेत. त्यामुळे रहदारीस अडथळा सतत होत असतो व त्याच रोडवर तीन शर्मा बंधुचे अपघाती निधन व कालच एका प्राध्यपकाचे सुध्दा अपघाताने निधन झालेले आहे. तेव्हा या ठिकाणचे अतिक्रमण त्वरील हटविण्यात यावे, तसेच पंचवटी हॉटेल ते शास्त्री चौक भागातील दिनांक २५/२/९३ रोजी झोपडया हटवून, त्यांना इतरत्र पर्यायी व्यवस्था आपण केली असंतांना पुन्हा २/३ झोपडया त्या ठिकाणी अतिक्रमण करुन बसवित आहेत. याबात कार्यवाही व्हावी.

श्री अजिजुल्ला बेगः- आता पर्यन्त स. सदस्यांनी विचारलेल्या व केलेलया सुचना विषयीची चर्चे संदर्भात प्रशासनाने कोणताही खुलासा अथवा माहिती दिलेली नाही, तर रिकामी चर्चाच होत आहे. तेव्हा योग्य तो निर्णय प्रत्येक प्रकरणावर होणे आवश्यक आहे.

श्री. पांडूरंग पैठणकरः- जालना रोडवरील मोंढा भागात बरेचसे जड वाहने जा-ये करतात. तर काही ट्रक या रोडवर मालवाहू उभे राहतात. ट्रॅफिक पोलीस वाले या ट्रकवाल्याकडून पैसे उकळतात. परुंतू मनपाच्या जागेवर सदरील ट्रक उभे राहतात. दरारोजचे १०० ते १५० ट्रक्स येऊन उभे राहिल्याने त्यांच्याकडून प्रत्येकी रुपये २५/- ची पावती फाडण्यासाठी एक कर्मचारी नियुक्त केल्यास मनापाचे उत्पन्न तयार होईल. याबाबत योग्य तो निर्णय व्हावा.

श्री प्रदिप दत्तः- पोलीस आयुक्त कार्यालयाचे अनाधिकृत बांधकाम चालू आहे, त्याबाबत कार्यवाही व्हावी.

मा. महापौर :- टपऱ्यांचे संदर्भात स. सदस्य श्री अयुब जागिरदार व गिल यांनी टपऱ्यांचे संदर्भात सुचना केलेली होती. त्याबाबत सेंन्ट्रल जकात नाका रोडवरील ज्या टपऱ्यांचे परवानगी आहे. परंतू त्यांनी इतरांना विकत दिलेली आहेत. अशा टपऱ्या नियमाप्रमाणे हटविण्यांत यावे. अनाधिकृत टपऱ्या त्वरील हटविण्यात व ज्यांना खरोखर आवश्यकता आहे, उदर निर्वाह करण्याचा प्रयत्न करतील. अशा अर्जधाराकांनाच टपरी मिळविण्यासाठी नियमाप्रमाणे कार्यवाही करावी व इतरांना अडविण्यात यावे. असा निर्णय देण्यात येते.

श्री गंगाधर गाडेः- या रोडवर अनाधिकृत बांधकामे व अतिक्रमण होण्यास प्रवृत्त केले अशा संबंधित अधिकाऱ्यावंर कार्यवाही व्हावी

श्री बंडू प्रधानः- १०० फुट वरील डीपी रोड साठी एकही टपरीसाठीची परवानगी देण्यात येऊ नेय. शहरातील अंतर्गत रोडवर टपऱ्यांचे परवानगी द्यावे. परंतू मोठया रोडवर कोणतीही टपरीसाठी परवानगी नाकरावी.

श्री चेनकरण संचेती:- ज्याचे रस्त्यामध्ये घरे बाधीत होतात तशा व्यक्तिंना पर्यायी व्यवस्था म्हणून टपरीसाठी जागा देण्यात यावी.

श्री. पांडूरंग पैठणकर:- हायकोर्टच्या समोरील क्रांतीनगर कडे जाणाऱ्या रोडवर ज्या अनाधिकृत टपऱ्या आहेत त्यांच्या बाबतीत व कॉर्नरवर जी टपरी आहे. ज्यामुळे अपघात झाला ती टपरी अद्यापपर्यंन्त हटविण्यात कार्यवाही करावी. अशी नोंद घेण्यात यावी.

मा. महापौर :- स. सदस्या सौ. दलाल यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्या संदर्भात शहर अभियंता यांनी खुलासा करावा. (शहर अभियंता सभागृहात उपस्थित नाही असे लक्षात आल्यावर पुन्हा) शहर अभियंता यांचा अनुपस्थिती बाबत कोणताही अर्ज माझ्याकडे नाही.

श्री चेनकरण संचेती:- या कारणामुळे सभागृहाच्या अपमान होतो यावर त्वरील कार्यवाही व्हावी. अशी माझी मागणी आहे.

मा. महापौर :- महानगरपालिकेची सर्वसाधारण बैठकीत कोणताही अधिकारी पुर्व सूचना न देता गैरहजर राहत असल्यास त्यांचेवर मा. आयुक्तांना नोटीस (मेमो) देवून जाब विचारण्याची कार्यवाही करावी. त्याचबरोबर स. सदस्या सौ. दलाल यांनी विचारलेल्या नेहरु प्लेस येथील मनपाच्या ओपन स्पेसबाबत एक व्यक्ति वेश्या व्यवसाय करणे त्या संदर्भात तेथे अतिक्रमण असल्यास त्वरीत हटविण्याची कार्यवाही व्हावी. दुसरी सुचना स. सदस्य श्री. घडामोडे यांनी दिल्याप्रमाणे जळगावंचे नगराध्यक्ष यांनी त्या शहरात आरक्षित (खुल्या) जागेवर टपरी धारकांसाठीची जी योजना राबविली आहे त्या संबंधिची माहिती जाणून घेणे करिता पुढील महिन्यामध्ये एप्रिलच्या पहिल्या आठवडयात एक कमिटी स्थापित करुन जळगांव येथे जाऊन, प्रत्यक्षात माहिती घेऊन येतील व त्या पुढील बैठकीत सदरील समिती अहवाल सादर करुन त्यांनंतर योग्य ती कार्यवाही करता येईल. यांनंतर स. सदस्य श्री मधुकर शिंदे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्ना संदर्भात जालना रोडवरील हायकोर्ट समोरील ज्या अनाधिकृत टपऱ्या आहेत. त्या टपऱ्या लवकरात लवकर हटविण्यात यावी. स. सदस्य श्री. मुजिब आलमशा खान यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाप्रमाणे तीन एकर जागा ज्यांच्याकडून घेण्यात आली. त्या जागेबाबत योग्य तो विनियोग होतो किंवा नाही याची चौकशी व्हावी. तसेच स. सदस्य श्री पंडागळे गाडे यांनी उपस्थित केलेलया प्रश्नाप्रमाणे पोलीस फोर्सबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सुचित करण्यात येते की, अनाधिकृत बांधकाम किंवा अतिक्रमणापुर्वी योग्य ती कार्यवाही का करीत नाही. याची चौकशी प्रशासनाने करावी. स. सदस्य श्री संचेती यांनी सुचित केल्याप्रमाणे ज्या ठिकाणी महानगरपालिकेची जागा आहेत. त्या जागेवर टपरीधारकांना परवानगी देत असतांना ज्यांना आवश्यक आहे ते तपासूनच योग्य ती पुढील कार्यवाही करावी. स. सदस्य श्री. पाडुरंग पैठणकर यांनी सुचित केल्यानुसार जालना रोड वरील वाढत्या अतिक्रमण व ट्रक्स बाबत सदरील रोड हा सार्वजनिक बांधकाम कार्यालयाच्या कक्षेत येत असल्याने माझी एक सुचना आहे की, मनपातर्फे ठराव करुन संबंधित विभागात कळवावे की, या जालना रोडवर कोणत्याही प्रकारची टपरीधारकांना परवानगी देऊ नये व जालना

रोडवरील मोंढा भागात जे ट्रक्स उभे राहतात त्यांना उभे राहण्यास मनाई हुकूम करण्याची कार्यवाही करावी.

श्री तुळशीराम भगुरे:- सार्वजनिक बांधकाम खात्याचे औरंगाबाद शहरामध्ये दोन ते तीन रस्ते जोडलेले आहेत. आणि या रस्त्यामध्ये बरेचसे गावे व अतिक्रमणही आहेत. तेव्हा तेथील हा रस्ता मनपाने ताब्यात घेऊन ती अतिक्रमणे व रस्ते बाबत योग्य ती कार्यवाही करावी.

श्री अजिजुल्ला बेग:- जागा कुणाच्याही मालकीची असो परुंतू अन्न व भेसळ बाबत मनपाची ना हरकत बाबत परवानगी घेणे आवश्यक आहे. ती परवानगी घेतली आहे काय?

मा. महापौर :- अशा बाबतीत त्वरीत नोटीस देवून बंद करण्यात यावे. स. सदस्य श्री अविनाश कुमावर यांनी सुचित केल्याप्रमाणे जवाहर कॉलनी येथे मनपाचा दवाखाना सुरु करण्याच्या संदर्भात त्या ठिकाणच्या जागेवर पोलीस चौकी आहे व ती जागा रिकामी होत नाही. यासाठी त्या ठिकाणी मनपाचे आरोग्य केंद्र सुरु करणेच्या दृष्टीने पोलीस चौकी हटविणे आवश्यक असल्याने त्याबाबत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी आता पर्यंन्त काय कार्यवाही केली याची माहिती देतील.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी:- शासनाकडे तीन आरोग्य केंद्र मंजुरीस्तव प्रस्ताव पाठविण्यात आले आणि तीनही आरोग्य केंद्र मंजुर झाले. त्यापैकी जवाहर कॉलनी केंद्राची इमारत शासनाकडून मंजुरी येईल यास्तव इमारत बांधण्यात आलेली होती. परंतू शासनाकडून मंजुरीला उशीर झाल्याने त्यावेळी पोलीस कार्यालयाने त्या ठिकाणी पोलीस चौकीसाठी मागणी केली व त्यानुसार एका वर्षाच्या भाडेत्तत्वावर सदरची इमारत देण्यात आलेली होती. पुढे एक वर्षानंतर श्री. रॉय साहेब पोलीस आयुक्त आले. त्यावेळी आम्ही कळविले होते की, जवाहरकॉलनी येथील आरोग्य केंद्र आम्हाला सुरु करावयाचे आहे, तेव्हा आपले कार्यलयाची मुदत ही संपलेली असून, त्या ठिकाणवरुन हलविण्यात यावे. त्यावेळी सदरील आयुक्तांनी त्याच पोलीस चौकीच्या बाजूची जागा सपाटीकरण करुन द्यावे. आम्ही त्या ठिकाणी शिफ्ट करु असे सांगितले त्यानुसार शहर अभियंता यांचेकडून संबंधित जागेचे सपाटीकरण करुन, त्या ठिकाणी शेड उभारण्याचे परवानगी दिली तेवढयातच पोलीस आयुक्त श्री. रॉय यांची बदली झाल्याने प्रकरण थांबले. नंतर मा. आयुक्ता करवी त्यांचेशी पत्रव्यवहार केला, परुंतू त्यांनी सदरची इमारत खाली करुन दिली नाही. तर पुन्हा परवा मा. आयुक्त यांनी पोलीस आयुक्तांना पत्र दिलेले आहे की, शासनाकडून आरोग्य केंद्रासाठी आलेली ग्रॅंट बुडणार तेव्हा तुम्ही आमची आरोग्य केद्राची जागा रिकामी करुन द्यावी आणि सपाटीकरण केलेल्या जागेवर तुम्हाला परवानगी दिलेली आहे. त्याप्रमाणे टपरी शेड बांधुन पोलीस चौकी हलवावी. परंतू त्यांचेकडून अद्यापही उत्तर प्राप्त झालेले नाही. त्याचे उत्तर आल्यानंतर ते पोलीस चौकी हलवून त्या ठिकाणी दवाखाना सुरु करण्यात येईल. जर संबंधित इमारत रिकामी करुन द्यावयास उशिर झाल्यास त्याच्या आजुबाजूला कुठे जागा मिळाल्यास त्या ठिकाणी हे आरोग्य केंद्र सुरु करण्यात येईल. तरी ही माझी मा. महापौर व आयुक्त यांनी विनंती केली की, त्यांनी काही

पदाधिकारी समवेत जर पोलीस आयुक्तांना डेलिगेशन घेऊन जाऊन जर चर्चा केली तर यातून काहीतरी मार्ग निघू शकेल.

श्री. प्रदिप जैस्वाल:- आपणास पोलीस आयुक्तांकडे डेलीगेशन घेऊन जाण्याची काहीही आवश्यकता नाही. कारण ज्यावेळी आरोग्य केंद्राची इमारत पोलीस कार्यालयाने भाडेपट्टयाने घेतली त्यावेळी एका वर्षाच्या करारावर व ज्यावेळी आरोग्य केंद्र सुरु करण्यात येईल त्याच्या दोन महिन्यापूर्वीच रिकामी जागा करुन देण्यात येईल असे लेखी लिहून दिल्यानंतर प्रश्नच उद्‌भवत नाही. आता सदरील विभागासाठी आरोग्य केंद्र मंजुर होऊन सात ते आठ महिन्याचा कालावधी लोटला आहे. आणि तेथील इमारत अद्यापही रिकामी होत नाही व आरोग्य केंद्र काही सुरु करत नाही. यासाठी मा. आयुक्त यांनी पोलीस आयुक्ताकडे डेलीगेशन घेऊन जाणे योग्य नसून याचाच अर्थ असा होतो की, आपल्या आयुक्तांचा ग्रेड कमी आहे. तेव्हा विरोधी पक्ष नेता श्री. कुमावत यांनी वारंवार निवेदन दिल्यानुसार जवाहर कॉलनी येथे आरोग्य केंद्र सुरु करण्याची कार्यवाही करावी. नसता या वर्षाचे अंदाजपत्रक आम्ही मंजुर करु देण्यार नाही व याबाबतची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर राहील. यासाठी सदरील इमारत रिकामी करुन का देत नाही, म्हणून कायदेशीर नोटीस पोलीस आयुक्त कार्यालयात पाठवून चार दिवसाचा अवधी देण्यात यावा.

मा. महापौर :- बजेट आणि पोलीस कार्यालयाशी काहीही संबंध नाही.

श्री प्रदिप जैस्वाल:- एखादी इमारत असल्यास आणि ती दुसऱ्यानां द्यावयाची झाल्यास सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरी घेऊनच भाडे तत्वावर द्यावी लागते. तेव्हा सर्वसाधारण सभेची मंजुरी घेतली आहे काय? यास सर्वस्वी जबाबदार प्रशासन आहे.

मा. महापौर :- सर्व स. सदस्यांना विनंती करण्यात येते की, आरोग्य केंद्राबाबत काय करायचे ते सुचित करावे त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल.

श्री. प्रदिप जैस्वाल:- चार दिवसाचे आत संबंधित इमारत खाली करुन द्यावे वकिलामार्फत अशी कायदेशीर नोटीस पोलीस आयुक्त कार्यालयाकडे पाठवावे.

श्री गिरजाराम हाळनोर:- एकनाथनगर येथे म्हाडा तर्फे मनपाने जागा घेतलेली आहे. प्राथमिक शाळा बांधनेसाठी तेथील शाळेचे काम त्वरीत सुरु करुन त्या ठिकाणी पिरबाजार येथील शाळा शिफ्ट करुन, पिरबाजार येथे पोलीस चौकीला जागा द्यावी.

श्री. प्रकाश जावळे:- स. सदस्यांनी केलेली सुचना अत्यंत चांगली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

श्री बंडू प्रधान :- जवाहर कॉलनी येथे चोऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. याचाही विचार होणे आवश्यक आहे.

श्री प्रकाश जावळे :- पोलीस कार्यलयास जागा देतांना योग्य तो नियमानुसार मोबदला घेण्यात यावा.

श्री गंगाधर गाडे:- कोणत्याही बाबतीत टोकाची भूमिका न घेता, नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने ती बाब आहे काय याची पडताळणी करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे स.

सदस्य श्री हाळनोर यांनी जी सुचना मांडली ती योग्य असून, त्यानुसार कार्यवाही व्हावी.

श्री. प्रदिप जैस्वाल, श्री अविनाश कुमावतः- जवाहर कॉलनी येथे आरोग्य केंद्र सुरु करणेसाठीची मंजुरी गेली सात आठ महिन्यापासूनची आलेली आहे. तेव्हा जास्त उशीर झालेला असून, पोलीस आयुक्त कार्यालयास जागा रिकामी करुन देणेबाबत वकिलामार्फत नोटीस पाठविणे हा एकच मार्ग चांगला आहे. कारण तेथील नागरिकांचे आरोग्याचा प्रश्न आहे. याबाबत अनेकदा पत्राने कळविले आहे.

श्री प्रकाश जावळेः- जागे अभावी माझ्या वार्डात सदरील आरोग्य केंद्र सुरु करावे. आणि तोपर्यंन्त मा. महापौर, मा. आयुक्त व विरोधी पक्ष नेता तसेच पोलीस आयुक्त यांना आपल्याकडे बोलावून चर्चा घडवून योग्य तो तोडगा काढावा.

मा महापौर :- गेल्या चार वर्षापासून अनेकदा पोलीस आयुक्त कार्यालयाकडे पत्रव्यवहार झालेला आहे. तसेच या दहा तारखेला सुध्दा पत्र पाठविलेले आहेच. तेव्हा पत्राचे उत्तर मिळत नसल्यास स. सदस्य श्री. प्रदिप जैस्वाल यांनी सुचित केल्याप्रमाणे वकिलामार्फत नोटीस पाठविणे योग्य.

श्री गंगाधर गाडेः- मा. आयुक्त यांचे समोर पोलीस आयुक्त यांचेशी चर्चा घडवून सर्वमान्य तोडगा काढावा. कायदयाप्रमाणे नोटीस पाठवीने योग्य नसून, त्यामुळे कोर्ट प्रकरणे सुरु होतील. व कदाचित पोलीस आयुक्त नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने या ठिकाणी पोलीस चौकी असणे कसे शक्य आहे. अशी भूमिका बजावून कोर्टाचे मन जिंकण्याची शक्यता आहे. त्यासाठी सामंजस्यपणे बसून सर्वमान्या तोडगा कसा निघेल याची काळजी घ्यावी. टोकाची भूमिका घेण्यात काहीच अर्थ नाही.

श्री प्रदिप जैस्वालः- गेल्या ७/८ महिन्यापासून आरोग्य केंद्राची मंजुरी मिळालेली आहे. परंतू अद्यापही केंद्र सुरु झालेले नाही आणि एका वर्षाच्या करारावर ही जागा दिलेली असूनही अद्यापही खाली करुन देत नाही. यासाठी लिगली नोटीस पाठविणे आवश्यक आहे.

श्री प्रकाश जावळेः- कोणतीही टोकाची भूमिका न घेता या कामी सहकार्य करणे ठिक राहील.

श्री पांडूरंग पैठणकरः- जिन्सी पोलीस चौकी ही तशी खाजगी इमारतीत आहे त्याचप्रमाणे या भागातही खाजगी जागा बघुन, पोलीस चौकी हलववावे.

श्री मोतीराम घडामोडेः- मनपाने टपरी शेड बांधुन ती इमारत भाडयाने त्याच जोगेसमोर पोलीस चौकीला दिल्यास योग्य राहील.

श्री अविनाश कुमावतः- ठिक आहे. तसे असल्यास हरकत नाही. परंतू प्रत्यक्षात कामास सुरुवात चार दिवसात व्हावी.

मा. महापौर :- ठिक आहे. स. सदस्यांची सुचना योग्य आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल व पोलीस चौकी समोर जी जागा आहे त्या ठिकाणी रोड बांधुन ती भाडयाने देऊन रिकाम्या झालेल्या इमारतीत आरोग्य केंद्र सुरु करता येईल.

श्री प्रदिप जैस्वालः- ठिक आहे. आम्हाला काहीही घेणे नाही. परंतू आपण कायदेशिर नोटीस पाठविल्यास पोलीस कार्यालयाला पंधरा किंवा काही दिवसाचा अवधी लागेल

आणि बांधकाम करायचे म्हटल्यास सार्वजनिक बांधकाम विभाग हे काम तातडीने त्यांना करुन देईल.

श्री अविनाश कुमावतः- दुसरी एक सुचना आहे, मो गारखेडा येथे मनपा शाळा आहे. त्या ठिकाणी पोलीस स्टेशन हलविण्यात यावे. त्या ठिकाणी जागा भरपूर आहे.

मा. महापौर :- ठिक आहे तशी सुचना देण्यात येईल.

श्री अविनाश कुमावतः- मी जे दोन पर्याय सुचित केले आहे, त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

मा. महापौर :- स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे कायदेशीर नोटीस पाठविण्यात येईल आणि त्यांनी वेळ मागितल्यास त्यांना पर्याय म्हणून शेडचे बांधकाम करुन पोलीस चौकी सुरु करतील किंवा गारखेडा येथील मनपा शाळेबाबत सुचना देऊन कार्यवाही करता येईल.

श्री. मधुकर शिंदेः- पोलीस आयुक्त कार्यालयाच्या आवारात अनाधिकृत बांधकाम होत आहेत त्याबाबत काय कार्यवाही केली.

मा. महापौर :- सदरचे काम पोलीस आयुक्त कार्यालय यांचे नसून ते काम सार्वजनिक बांधकाम विभागाचे आहे आणि त्यांना आपण कायदेशी नोटीस पाठविलेली आहे.

श्री. प्रदिप जैस्वाल, श्री मधुकर शिंदेः- सहाय्यक संचालक, नगररचना यांनी संबंधित विभागास कशी नोटीस पाठविली त्याची माहिती सभागृहात द्यावी.

श्री. पांडूरंग पैठणकरः- पोलीस आयुक्त कार्यालयाने बांधकाम परवानगी शिवाय करु नये अशी जाणिव करुन देणे आवश्यक आहे.

मा. महापौर :- (सार्वजनिक बांधकाम विभागास पाठविलेले पत्र सभागृहात वाचून दाखविले)

श्री प्रदिप जैस्वाल, श्री मुजिब आलमशा खानः- सदरची नोटीस नसून ते विनंतीपत्र आहे. आपण त्यांना म्हणतो की, संबंधित कागदपत्रे दाखल करा म्हणजे आम्ही परवानगी देतो याचे कारण काय? अशा प्रकारचे पत्र लिहीने योग्य वाटत नाही. असे पत्र एखादया नागरिकांना सुध्दा देत नाही जे परवानगीची मागणी करतात व ज्यांचे कागदपत्रे काही अपुरे पडतात परंतू या ठिकाणी विनंती करण्याचे कारण काय? सदरची नोटीस कधी पाठविली व त्यांनंतरही परवानगीसाठी कागदपत्रे दाखल केली काय याची माहिती द्यावी.

मा. महापौर :- संबंधित कार्यालयास नोटीस दिनांक ४/३/९३ रोजी पाठविण्यात आलेली आहे.

श्री प्रदिप जैस्वाल, श्री मुजिब आलमशा खानः- किमान सात दिवसाच्या मुदतीत नोटीस पाठवावी लागते आणि नियम ६८ प्रमाणे काय कार्यवाही करता येते ते पहावे.

मा. महापौर :- संबंधित अधिकारी माहिती देतील.

सहाय्यक संचालक नगररचनाः- शासकीय कार्यालयाची जी मागणी असते, बांधकामा संदर्भात हे सार्वजनिक बांधकाम विभागात कळवितात आणि सार्वजनिक बांधकाम विभाग त्याबाबतचे नकाशे तयार करुन पाठवितात आणि ते बजेट प्रोव्हीजनमध्ये तरतूद करुन बजेट शासनाकडून मंजुर करुन घेतात ते आल्या नंतरच सार्वजनिक बांधकाम विभाग कामास सुरुवात करते. परंतू सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधकाम परवानगी घ्यायला पाहिजे होती तथापी त्यांनी घेतली नाही याबाबत शासनास आपण नोटीस पाठवू शकत नाही. तसे बांधकाम हे नियमाप्रमाणेच केल्या जाते. केवळ परवानगी घेतली नाही. एवढाच प्रश्न आहे. म्हणून

आपण नोटीस पाढवू की, आपण ताबडतोब परवानगीसाठी संचिका दाखल करावी.

श्री. प्रदिप जैसवाल, श्री मुजिब आलमशा खानः- १५ दिवसापूर्वी संबंधित विभागास कागदपत्रांची पूर्तता करणेबाबत नोटीस पाठविली तर अद्याप काय कार्यवाही झाली याची माहिती द्यावी आणि जर नसेल केली तर पंचनामा करुन पुढील कार्यवाही करावी. व बांधकाम बंद करावे.

मा. महापौर :- शासकिय कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम जरी असले तरी, पंचनामा करुन पुढील कार्यवाही करावी.

श्री प्रदिप दत्तः- शासकीय कार्यालय व सर्वसामान्य नागरीक यांचे साठी बांधकाम परवानगी नियमात काही बदल आहे काय?

सहा. संचालक नगररचनाः- सेक्शन ४५ प्रमाणे सर्वसामान्य नागरिकांना परवानगीची आवश्यकता आहे. परुंतू शासकीय कार्यालयाचया इमारतीसाठी परवानगीची आवश्यकता नाही, तर फक्त माहितीसाठी कागदपत्रे सादर करावे लागते.

श्री गंगाधर गाडेः- १५ मार्चच्या दै. लोकमत वृत्तपत्रामध्ये जकात विषयीची बातमी छापून आलेली आहे. (ती सर्व बातमी वाचून दाखवितात) की, मुंबई वरुन औरंगाबादला इतके ट्रक माल भरुन निघाले आहेत या बाबतची माहिती जकात विभागास असते काय याची माहिती द्यावी.

मा महापौर :- संबंधित अधिकारी आज उपस्थित नाही.

श्री प्रकाश जावळेः- सर्वसाधारण सभा असलेल्या दिवशी जबाबदार अधिकारी उपस्थित न राहणे योग्य नाही. म्हणजे काही प्रश्नाचे उत्तर कुणास विचारावे असा प्रश्न निर्माण होतो या बाबत योग्य ते आदेश व्हावेत.

मा. महापौर :- लोक न्यायालय असल्याने काही अधिकारी आज अनुपस्थित आहेत.

श्री गंगाधर गाडेः- सदरील वृत्त पत्राच्या बातमी वरून असे कळते की, शहरातील व्यापारी व संबंधित जकात अधिकारी यांचे काही तरी संधान आहे. त्यामुळे ते कसे मॅनेज करायचे ते पूर्वीच ठरलेले असेल असे वाटते. आणि मी दि. ६/२/९३ रोजी मा. आयुक्तांना पत्रही दिलेले आहे की, जकात विभागातील कार्य पध्दती बाबत मी प्रत्यक्षात पाहिलेली घटना आहे की, जकात निरिक्षक व जकात फाडणारे कर्मचारी हे योग्य रितीने काम करीत नाहीत. कागतपत्रांची व मालाची तपासणी बरोबर करीत नाहीत. त्यामुळे जकातीवर फार मोठा फरक दिसून येतो. याबाबत विचारलेल्या माहितीची मला अद्यापही काहीही उत्तर आलेले नाही. या मुळेच असे स्पष्ट होते की, जकात अध्यक्षक हेच सर्वस्वी अशा प्रकारास कारणीभूत आहेत. असा माझा स्पष्ट आरोप आहे.

श्री अविनाश कुमावतः- जकात अधिक्षक वारंवार म्हणतात की, केवळ माझ्या मुळे जकात उत्पन्नात फरक पडला वगैरे हे यावरुन दिसते की, सर्व थोतांड आहे उलट जकात वाढण्याऐवजी कमी झालेली आहे.

श्री गंगाधर गाडेः- मी जे दोन मुद्दे उपस्थित केले त्याप्रमाणे काय कार्यवाही करणार? साठ ट्रक मुंबई वरुन येणार अशी माहिती यांना कशी मिळते.

श्री रतनकुमार पंडागळेः- चार दिवसापूर्वी पशुधन विभागातील कोंडवाडा ठिकाणी काम करणारा वर्ग-४ चा कर्मचारी, श्री. तानाजी भागाजी दूगे यांना काही नागरीकांनी बेदम

मारहान केली व त्यांच्या डोक्याला चार टाके लागलेले आहेत. अशा कर्मचाऱ्या बाबत कार्यालया तर्फे काय संरक्षण झाले याची माहिती द्यावी.

पशुधन विकास अधिकारी:- दि. १७/३/९३ रोजी दुपारी ३.०० वाजता पैठणगेट वरुन फिरता कोंडवाडयाद्वारे पोलिसा सोबत जात असतांना रस्त्या वरील बकऱ्या पकडल्या तेव्हा एका इसमाने संबंधित कर्मचाऱ्यास दगडाने मारले व त्यामुळे त्याचे डोके फुटले. तेव्हा त्यास दवाखान्यात नेऊन मारणाऱ्या इसमा बाबत पोलिक तक्रार करण्यात आली व संबंधित इसमास माझ्या समक्ष पकडून आणल्याने मी सुध्दा पोलीस चौकीत गेला होतो व तेथे संबंधितास बंद करण्यात आले. या कर्मचाऱ्यास घाटी दवाखान्यात मी जाऊन पाहणी केली व ५.०० वाजता सुट्टीही देण्यात आली होती. तत्पूर्वी संबंधित कर्मचाऱ्यांचे (एक्सरे) व योग्य प्रकारे औषधी देवून काळजी घेतलेली होती व केसची नोंद झालेली आहे.

श्री रतनकुमार पंडागळे:- वैयक्तिक पोलिस तक्रार करण्यापेक्षा कार्यालयाने तक्रार करणे आवश्यक आहे.

पशुधन विकास अधिकारी:- सरकारी कामामध्ये अडथळा म्हणून पोलीस केस नोंद झालेली आहे. व अशा फिरत्या कोंडवाडया संदर्भात पोलीस प्रोटेक्शन आहे.

श्री प्रदिप दत्त:- कर्मचाऱ्यांना विशषतः रोजंदारी वरील कर्मचाऱ्यास मारहाण प्रकरणे यापूर्वीही बऱ्याच वेळेस झालेली आहेत. त्यावर आपण काहीही केलेले नाही.

श्री. रतनकुमार पंडागळे:- संबंधित कर्मचाऱ्यास मारहाण झाल्याचे वरिष्ठांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली काय?

मा. महापौर :- संबंधित कर्मचाऱ्यास मारहाण झाली. त्या संदर्भात मनपातर्फे पोलीस केस नोंद व्हावी आणि संबंधितास काही आर्थिक मदत करावी.

पशुधन विकास अधिकारी:- मी स्वतः दवाखान्यात जाऊन भेटलो व औषधोपचार तथा मुलासाठी माझ्या खिशातून आर्थिक मदत संबंधितांना केली व नंतर कार्यालयीन कार्यवाही नंतर करता येईल असे सुचित केले.

**विषय क्र. १३१/१:-**

दिनांक २०/२/९३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :-**

श्री प्रदिप जैस्वाल:- पान क्र. १८ ठराव क्र. १०४/४ मध्ये सन १९९२-९३ असे लिहिलेले त्या ऐवजी सन १९९३-९४ अशी दुरुस्ती व्हावी.

मा महापौर :- ठिक आहे दुरुस्ती करण्यात येते.

श्री रशिद मामु:- पान क्र. १४ मधील विषय क्र. १०३/३ हा नामंजुर करण्यात आला तेव्हा सदरचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

श्री. आलफखान:- मी मागील बैठकीत सुचित केले आहे त्याप्रमणे सदरील प्रस्तावानुसार लागणारा खर्च हा शासनाकडून मिळत असल्यास व याचा विनियोग याच कामासाठी होत असल्यास प्रस्ताव मंजुर करण्याबाबत दुरुस्ती व्हावी.

मा. महापौर :- ठिक आहे. प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विषय क्र. १०३/३ यास मंजुरी देण्यात येते.

श्री. अविनाश कुमावत, श्री चेनकरण संचेती:- पान क्र. १९ मधील विषय क्र. १०५/५ हा प्रस्ताव मंजुर केलेला नाही. कारण यापूर्वी प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे व जकात कर यावर माफ आहे. त्याप्रमाणे शासनाकडून अद्याप काहीही कार्यवाही झालेली नाही. तेव्हा सदरील प्रस्तावावर दुरुस्ती व्हावी.

श्री. बंडू प्रधान:- प्रस्ताव मंजुर झालेला आहे. जकात कर, बी-बीयाणे कर माफ करुन रुपये १/- कोटीचे नुकसान मनपास झालेले आहे याची काळजी घ्यावी.

मा. महापौर :- सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा अशी दुरुस्ती करण्यात यावी.

श्री प्रकाश जावळे:- पान क्र. ७ मध्ये मा. महापौरांच्या वाक्यात असे आहे की, सर्व स. सदस्यांना अहवालाच्या झेरॉक्स प्रति वाटप करण्यात येणार आहेत. परंतू झेरॉक्स प्रती अद्यापही आम्हाला मिळालेल्या नाहीत.

मा. महापौर :- संबंधित अहवालाच्या झेरॉक्स प्रती आपणास दोन/चार दिवसात देण्यात येतील.

श्री मुजिब आलमशा खान:- पान क्र. ३४ मधील विषय क्र. १२२/८ मध्ये प्रस्ताव व ठरावामध्ये कटकट दरवाजाच्या दक्षिणेकडून भागातून ३० ते ४० फुट काढण्यात यावा अशी दुरुस्ती व्हावी.

मा. महापौर :- ठिक आहे. अशी दुरुस्ती करण्यात यावी.

श्री. पांडूरंग पैठणकर:- पान क्र. १४ मध्ये कैलास मोटर्स ते गुलशन महल रस्ता रुंदीकरण कामाबाबत मा. महापौर यांनी दिनांक १/३/९३ पर्यंत संबंधित रोडचे कामाची सुरुवात होईल असे सुचित केले होत व तशी सूचना संबंधित स. सदस्यांना देण्यात येतील असे म्हटले तेव्हा आम्हाला अद्याप कोणतीही सुचना आलेली नाही. याचे कारण काय?

मा. महापौर :- संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

अति. शहर अभियंता:- संबंधित रस्त्याचे एका ब्रिजचे काम चालू आहे. त्याच्या बाजूला (डब्ल्यू.बी.एम.) चे काम चालू आहे. हे गुलशन महन ते चंपा मजिद पर्यन्त आहे. परुंतू गुलशन महल पासून (--------------------) कार्यालयाची इमारत आहे. ती आपल्या ताब्यात आलेली नाही. त्यामुळे तिथे काम सध्या नाही. बाकी इतरत्र काम चालू आहे. काही भागातील एक्वीझिशनचे काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे नगररचना विभागास कळविण्यात आलेले आहे.

श्री. पांडूरंग पैठणकर:- भवानीनगर भागातील पुलाचे व मोकळया भागाचे काम सुरु होणे आवश्यक आहे.

अति. शहर अभियंता:- या भागामध्ये मेटल रोडचे काम चालू आहे.

मा. महापौर :- संबंधित स्थळी प्रत्यक्षात जाऊन कामाची पाहणी करण्यात येईल.

श्री. आलफखान:- पान क्र. १५ मधील ठराव क्र. १०२/२ मध्ये दि. १/४/९४ पासून मनपा हद्दीतील इमारतीवर लाभकर लागू करण्यात येते असे आहे. त्याऐवजी १/४/९३ पासून लाभकर लागू करण्यास मंजुरी देण्यात येते अशी दुरुस्ती व्हावी. त्याचप्रमाणे तसेच पान क्र. २६ मधील ठराव क्र. ११०/१० मध्ये प्रस्तावात दर्शविल्यानुसार आवश्यक कर्मचारी घेण्यास व खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

मा. महापौर :- ठिक आहे अशी दुरुस्ती व्हावी.

श्री अजिजुल्ला बेगः- पान क्र. २९ वर ठराव क्र. ११२/१२ पुढील बैठकीत काही दुरुस्तीसह ठेवावा, असे ठरले त्याप्रमाणे या बैठकीत सदरचा विषय का आलेले नाही.

मा महापौर :- संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

सहा. संचालक नगररचनाः- सदरील प्रस्तावातील इतिवृत्त अद्याप का कायम झालेले नाही.

मा. महापौरः-

सदरील प्रस्ताव दुरुस्त करुन ठेवावे व नंतरच इतिवृत्त कायम करावे.

**ठराव क्र. १३१/१:-**

१) प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इतिवृत्ततील पान क्र. १८ मधील ठराव क्र. १०४/४ मध्ये सन १९९२-९३ असे चूकीने टाइप झाले त्या ऐवजी सन १९९३-९४ अशी दुरुस्ती करण्यात येते.

२) पान क्र. १५ मधील विषय क्र. १०३/३ मधील सिध्दार्थ उद्यान येथील प्राणी संग्रहालयातील हत्तीचे घर बांधण्याच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्याऐवजी शहरातील विविध उद्यानातील लहान मुलांच्या खेळणीसाठी खर्च करण्यास मंजुरी दिलेली होती. त्याऐवजी प्रस्तावात दर्शविल्यानुसार मंजुरी देण्यात येते. अशी दुरुस्ती करण्यात येते.

३) पान क्र. १९ मधील विषय क्र. १०५/५ हा प्रस्ताव मंजुर करण्यात आला असे ठरले. त्याऐवजी स्थगित ठेवण्यात आला. अशी दुरुस्ती करण्यात येते.

४) पान क्र. ७ मध्ये मा. महापौरांनी सुचित केल्यानुसार अहवालाच्या झेरॉक्स प्रति दोन/चार दिवसात सर्व स. सदस्यांना वाटप करण्यात येतील.

५) पान क्र. ३४ मधील विषय क्र. १२२/८ मधील प्रस्ताव व ठरावामध्ये कटकट दरवाजाच्या दक्षिणेकडून भागातील रस्ता ३० ते ४० फुट काढण्यात यावा. अशी दुरुस्ती करण्यात येते.

६) पान क्र. १५ मधील ठराव क्र. १०२/२ मध्ये दिनांक १/४/९४ पासून मनपा हद्दीतील इमारतीवर लाभकर लागू करण्यात येते असे आहे. त्याऐवजी दि. १/४/९३ पासून लाभकर लागू करण्यात येते. अशी दुरुस्ती करण्यात येते. त्याचप्रमाणे पान क्र. २६ मधील ठराव क्र. ११०/१० मध्ये प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आवश्यक कर्मचारी घेण्यास व खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. अशी दुरुस्ती करण्यात येते. या व इतर सर्व दुरुस्त्यासह दिनांक २०/१२/९३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १३२/२:-**

औरंगाबाद मुंबई रस्त्यावर मिटमिटा येथे गावाजवळच महानगरपालिकेचा जकात नाका आहे व तो नाशिक निर्मल राज्य रस्त्याच्या जागेत आहे. जकातसाठी बऱ्याच वाहनांना उभे राहवे लागते. त्यामुळे वाहतूकीस अडथळा निर्माण होऊन अपघात होतात.

सार्वजनिक बांधकाम खाते औरंगाबाद यांनी दिनांक २१/५/९२ ला पत्र देवून विनंती केली आहे की, नाका हा रस्त्यापासून दुर असावा व सध्या अस्तित्वात असलेला नाक्याचा शेड काढून टाकण्यात यावा. अन्यथा शेड काढण्याची कार्यवाही त्यांचे खात्याकडून करण्यात येईल.

सदर रस्त्यावर जकात नाक्यासाठी जकात अधिक्षक यांचेसह स्थळ पाहणी करुन जागा निश्चित करण्यात आली. त्यानुसार महानगरपालिका हद्दीला लागूनच मौजे मिटमिटा येथील गट नं. ३० ची संपूर्ण जमीन व गट नं. ३१ पैकी अशी एकूण ६ एकर (२.४२ हेक्टर) जमिन

जकात नाक्यासाठी भुसंपादनाचे अथवा खाजगी तडजोडीद्वारे संपादन करण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

**संवाद :-**

श्री. आलफ खान, श्री अजिजुल्ला बेग:- सदरील प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जकात नाक्यासाठी ६ एकर जागा कशासाठी लागते याची माहिती द्यावी.

मा महापौर :- संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

सहा. संचालक नगररचना:- रस्त्यावर वाहणे उभे राहतात. त्यामुळे वाहनास अडथळे निर्माण होतात. अशा प्रकारचे पत्र सार्वजनिक बांधकाम खात्याचे आल्याने शहर अभियंता, जकात अधिक्षक व त्यावेळेसच सह.संचालक नगररचना यांनी प्रत्यक्षात जाऊन पाहणी केली व त्यांनी दिलेल्या मागणी नुसार सदरची कार्यवाही झाली.

श्री आलफ खान:- एक किंवा दोन एकर जागा जकात नाक्यासाठी ठिक आहे परंतू सहा एकराची जागा कशासाठी याची माहिती द्यावी.

मा. महापौर :- शहर अभियंता यांचे अभिप्रायानुसार कार्यवाही करुन प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. १३२/२:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमणे औरंगाबाद मुंबई रस्त्यावर मिटमिटा येथे गावाजवळच महापालिकेचा जकात नाका आहे. व तो नाशिक निर्मल राज्य रस्त्याच्या जागेत आहे. जकातसाठी बऱ्याच वाहनांना उभे राहवे लागते. त्यामुळे वाहतूकीस अडथळा निर्माण होऊन अपघात होतात. सार्वजनिक बांधकाम खात्याने पत्र दिल्या नुसार, नाका हा दुर असावा व सध्या अस्तित्वात असलेला शेड काढून टाकण्यात यावा. अन्यथा शेड काढण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम खात्याकडून करण्यात येईल. सदर रस्त्यावर जकात नाक्यासाठी जकात अधिक्षक यांचेसह स्थळ पाहणी करण्यात आली. त्यानुसार महानगरपालिका हद्दीला लागूनच मौजे मिटमिटा येथील गट नं. ३० ची संपूर्ण जमीन व गट नं. ३१ पैकी अशी एकूण ६ एकर (२.४२ हेक्टर) जमिन जकात नाक्यासाठी भुसंपादनाचे अथवा खाजगी तडजोडीद्वारे संपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३३/३ :-**

मा. आयुक्त प्रस्ताव सादर करतात की, अधिक्षक अभियंता, परिसर अभियांत्रिकी मंडळ, औरंगाबाद यांनी औरंगाबाद शहरासाठी शहा कन्सल्टन्सीने तयार केलेल्या जलनि:सारण योजनेची थोडक्यात माहिती पाठविली आहे. सदरील योजना औरंगाबाद शहरासाठी असल्या कारणाने व योजनेचा वित्तिय बध व मंजुर असल्या बाबतच्या महानगरपालिकेच्या ठराव असणे आवश्यक आहे. योजनेची ठळक वैशिष्टये खालील प्रमाणे आहेत.

औरंगाबाद जलनि:सारण योजनेसाठी शहराचे दोन जलनि:सारण भाग केलेले आहेत. झोन "ए" व झोन "ब" खामनदी व तिला मिळणारे इतर नाले हे झोन "ए" साठी, सुखना नदी व तिला मिळणारे नाले हे झोन "बी" साठी गृहीत धरले आहेत. झोन "ए" व झोन "बी" मधील

मैला खामनदी मधील मेन लाइन व सुखना नदी मधील मेन लाईनने घेऊन वळदगांव/झालटा येथील नियोजित पंपीग स्टेशनमध्ये जमा करण्याची योजना आहे.

सदरील योजने मध्ये १९८६, २००१ व २०१३ साली अंदाजित लोकसंख्या काढून त्याप्रमाणे योजना तयार केली आहे. १९८६ मध्ये ४,५०,०००/- सन २००१ मध्ये १०,००,०००/- सन २०१६ मध्ये १६,००,०००/- अशी लोकसंख्या गृहीत धरली आहे. तसेच पाणी पुरवठयाचा दर १०० लि./माणसी/दिन एवढा आहे. २०१६ साली हा दर १४० लि./माणसी/दिन गृहीत धरला आहे. तसेच मैला प्रतिदिन ६९.२८ एम. एल. डी. सध्या जमा होतो असे गृहीत धरुन त्याप्रमाणे २००१ साली २०१६ साली अनुक्रमे १३३.२८ व २०२.५७ एम. एल. डी. गृहीत धरला आहे. एकंदरीत जलनि:सारण योजना ही ६५,२६,८०,०००/- रुपये ची आहे सदरील योजना ही १९८७-८८ च्या दर सूची नुसार बनविली आहे. चालू दर सूची नुसार योजनेचा खर्च वाढेल. सदरील योजनेस मान्यता मिळणेसाठी अधिक्षक, अभियंता, पाणीपुरवठा व जलनि:सारण मंडळ, औरंगाबाद यांनी सदरील योजना मुख्य अभियंता, पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ, मुंबई यांना सादर केली आहे.

वरील एकूण किंमती पैकी महानगरपालिकेचा १०% वाटा रुपये ६५२.६८ लाख आहे. शासकीय अनुदान २३१/२% रुपये १५२२.७ लाख व आयुर्विमा महामंडळाचे कर्ज १७४३.३६ लाख रुपये असे एकूण ३८१.७४ लाख होते व उर्वरित रक्कम रु २६०८.०६ लाख महानगरपालिकेच्या उत्पन्नातुन किंवा खुल्या बाजारातून कर्ज घेऊन उभे करावयाचे आहे.

ही योजना पूर्ण झाल्यावर कर्जाची परतफेड दैनंदिन देखभाल व इतर सर्व खर्च धरुन वार्षिक ९८३.२५ लाख रुपये महानगरपालिकेवर बोजा येईल व या योजनेतून सिव्हेज इंफल्युएंट व सलडस विकून व घरांना ड्रेनेज टॅक्स लावून महानगरपालिकेला वार्षिक ९८६.२ लाख रुपये उत्पन्न मिळेल. म्हणजेच योजना सेल्फ सपोर्टींग होईल.

वरील योजनेच्या कामापैकी कामाची निकड व जनतेची मागणी लक्षात घेऊन जी कामे महानगरपालिकेने आता पर्यन्त पूर्ण केली आहेत व जी कामे, योजना मंजुर हेऊन कामात प्रत्यक्ष, सुरुवात करे पर्यंन्त पूर्ण केली जातील अशा कामावर महानगरपालिके तर्फे जो खर्च केला जाईल तो खर्च महानगरपालिके तर्फे १०% लोकवर्गणी पोटी भरावयाच्या रक्कमेतून वजा केला जावा व बाकी रक्कम लोक वर्गणी पोटी भरली जाईल. म्हणून ही योजना राबविण्यासाठी:-

१) सदर योजना तिच्या आर्थिक बंधासह मान्य करणेसाठी

२) योजनेच्या खर्चाचा १०% हिस्सा वरील परिच्छेदात दर्शविल्याप्रमाणे सोसण्याचा व इतर खर्च कर्ज रुपाने घेण्यासाठी.

३) योजना पूर्ण झाल्यावर दैनंदिन देखभालीसाठी ताब्यात घेण्यात येईल.

वरील बाबीस महानगरपालिकेची समंती देण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद:-**

मा. महापौर :- मंजुर.

**ठराव क्र. १३३/३:-**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार शहा कन्सल्टन्सीने तयार केलेल्या जलनि:सारण योजनेबाबत दोन भाग पडलेले आहेत. त्यात झोन "ए" व झोन "बी" येतात. त्यानुसार २००१ साली २०१६ सालची एम. एल. डी. गृहीत धरुन रु. ६५,२६,८०,०००/- रुपये ची योजना तयार करण्यात

आली आहे. चालू दर सूची नुसार योजनेचा खर्च वाढेल. या किंमती पैकी महानगरपालिकेचा १०% वाटा रुपये ६५२.६८ लाख आहे. शासकीय अनुदान २३१/२ % रुपये १५२२.७ लाख व आयुर्विमा महामंडळाचे कर्ज १७४३.३६ लाख रुपये असे एकूण ३८१८.७४ लाख होते व उर्वरित रक्कम रु २६०८.०६ लाख महानगरपालिकेच्या उत्पन्नातून किंवा खुल्या बाजारातून कर्ज घेऊन उभे करणे. ही योजना राबविण्यासाठी तिच्या आर्थिक बंधासह मान्य करण्यासाठी योजनेच्या खर्चाची १०% हिस्सा वरील परिच्छेदात दर्शविल्याप्रमाणे सोसण्याचा व इतर कर्ज रुपाने घेण्यासाठी व योजना पूर्ण झाल्यावर दैनंदिन देखभालीसाठी ताब्यात घेण्यात येईल. या वर्षासह प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३४/४:-**

मा. आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रायोगीक तत्वावर झोन क्र. ३ चे सफाईचे काम खाजगी कंत्राटदारा कडून करुन घेण्यात यावे. तसेच सध्या सदरील कामावर महानगरपालिके तर्फे प्रतिवर्षी रु. अंदाजित ३८,७६,०००/- एवढा खर्च येतो.

विभाग क्र. ३ मध्ये सफाईच्या कामाचे खाजगीकरण करुन महापालिका काही आर्थिक बचत करु शकते. शिवाय सफाई विशेष चांगली करण्यासाठी त्याचा उपयोग होऊ शकतो. सध्या सिडको मध्ये सफाईचे काम खाजगी कंत्राटदारा कडून करुन घेण्यात येत आहे. त्याच धर्तीवर एक वर्षासाठी प्रायोगिक तत्वावर विभाग क्र. ३ ची सफाई कामाचे खाजगी करण करावे, अशी प्रशासका तर्फे शिफारस केली जाते. ही बाब धोरणात्मक असल्यामुळे सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. मान्य असल्यास त्याप्रमाणे त्याबद्दलची पुढील कार्यवाही प्रशासनातर्फे करण्यात येईल.

**संवाद :-**

श्री. प्रकाश जावळे, श्री, गंगाधर गाडे:- सदरील प्रस्तावास आमचा विरोध आहे. यावर फेर विचार व्हावा. औद्योगिक क्षेत्रात अशा प्रकारचा प्रयोग सुरु झाल्याने सगळया कारखान्यात सुरुवात केले आहे आणि उदया जर खाजगीकरण झाले तर गरीब माणसांवर अन्याय होण्याची शक्यता आहे. यापेक्षा जकात पध्दत जर कॉन्ट्रक्ट पध्दतीने राबविण्यात ती दुप्पटीने वाढेल याबाबत चाचणी घ्यावी.

रतनकुमार पंडागळे:- या ठिकाणी सफाई कामगार काम करणारा काही अपेक्षेने काम करतो. त्यामुळे प्रस्ताव मंजुर करु नये.

श्री प्रदिप जैस्वाल:- स. सदस्यांच्या भावना लक्षात घेता याबाबत योग्य तो विचार व्हावा.

मा. महापौर :- सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव क्र. १३४/४:-**

सदरील प्रस्ताव स्थगीत ठेवावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १३५/५ :-**

वरील विषयी प्रस्ताव ठेवण्यात येतो की, नागसेनवनचा परिसरामधुन जो डीपी रोड तयार होता तो रद्द करण्यात यावा. कारण ही आमची पूर्वीची अशी भूमी आहे आणि डॉ.

बाबासाहेब आंबेडकरांचे या परिसरामध्ये अत्यंत प्रेम व श्रध्दास्थान असल्यामुळे हा रोड रद्द करण्यात यावा.

| | |
|---|---|
| सुचक : | श्री. बंडू प्रधान |
| अनुमोदक : | श्री. रतनकुमार पंडागळे |
| दिनांक : | १८/३/९३ |

**संवाद :-**

श्री. बंडू प्रधानः- (विषय क्र. ४ च्या चर्चेच्या वेळ ऐनवेळी याबाबत चर्चा घडवून मागील प्रस्ताव मांडला)

मागील सभेत सुचित केल्याप्रमाणे नागसेन नगर येथील प्रस्ताव मंजुर करावा.

मा. महापौर :- मागील वेळेस स. सदस्य श्री. बंडू प्रधान यांनी मांडलेला नागसेन नगरचा प्रस्ताव मंजुर करुन त्याच बरोबर इतिवृत्त कायम करण्यात येते.

**ठराव क्र. १३५/५:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नागसेनवन पानचक्की रोडवर जो डीपी रोड तयार होता त्या रोड मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापलेल्या सोसायटीची जागा जात असल्याने त्या जागेची पवित्रता व श्रध्दा लक्षात घेता, होणारा डीपी रोड रद्द करुन याच बैठकीत कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *"पुरवणी विषय पत्रिका"*

**विषय क्र. १३६/१:-**

सर्वसामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र राज्य यांनी शासकीय निर्णय घेतला आहे की, नागरी हद्दीमध्ये नविन विद्युत कनेक्शन घेण्या करिता महानगरपालिकेची बांधकाम परवानगी आवश्यक राहील. यामध्ये ज्या नागरी वस्त्या स्लम म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत. तेथे मनपा बांधकाम परवानगी नसते. परंतू विद्युत मंडळ तेथही बांधकाम परवानगीपत्र मागते त्यामुळे तेथील रहिवाशांना या निर्णयानुसार नविन कनेक्शन पासून वंचित रहावे लागते. स्लमच्या व्यतिरिक्त जी जुनी घरे आहेत त्यांनाही हा निर्णय लागू करण्यात आलेला आहे. करिता या सभागृहाने येथे ठराव घेऊन, शासनाला विनंती करुन स्लम व जूनी घरे व भाडेकरु विभागाकरिता ही अट वगळण्यात यावी म्हणून विनंती करणे योग्य राहील. करिता या बाबतीत त्वरीत शासनाला विनंती करुन पाठपूरावा करण्यात यावा.

| | |
|---|---|
| सुचक :- | श्री. रशिद मामू |
| अनुमोदक : | श्री. किशोर थोरात |
| दिनांक :- | १६/३/९३ |

**संवाद :-**

श्री रशिद मामू :- याबाबत जीएन विभाग, मंत्रालय, मुंबई येथून एक परिपत्रक आलेले आहे की, जोपर्यंन्त बांधकाम परवानगी मिळत नाही, तोपर्यंन्त लाइट कनेक्शन मिळणे शक्य नाही. असा निर्णय संपूर्ण महाराष्ट्रात लागू होणार आहे. तेव्हा याबाबत

केवळ ठराव पास करुन चालणार नाही, तर प्रत्यक्षात मा. मंत्री महोदयांना भेटून या निर्णयाबाबत फेर विचार करुन सुधारणा करण्याची विनंती करावी लागेल.

श्री. आलफखान:- संबंधित प्रस्तावाबाबत शासनास कळविणे आवश्यक आहे.

श्री जयवंत ओक:- याबाबत मा. मंत्री महोदयांना प्रत्यक्षात भेटून यांची कार्यवाही करावी लागेल. त्याबाबत एक कमिटी स्थापावी व शिष्टमंडळ भेटण्यास मुंबईला जावे.

मा. महापौर :- सदरील प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे त्वरीत पाठविण्यात यावा व या संबंधीत खात्याचे मा. मंत्री महोदयांना एका शिष्ट मंडळाद्वारे, (विरोधी पक्ष नेता व उप महापौर स्थायी समिती सभापती आदि समवेत मुंबई मंत्रालय येथे भेटून प्रकरणे मंजुर करुन घ्यावे लोगेल.

**ठराव क्र. १३६/१ :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासकीय निर्णयाप्रमाणे नागरी हद्दीमध्ये नविन विद्युत कनेक्शन घेण्याकरिता महानगरपालिकेची बांधकाम परवानगी आवश्यक राहील. पंरतू ज्या नागरी वस्त्या स्लम म्हणून घोषित आहेत. तेथे मनपा बांधकाम परवानगी नसते. परंतू विद्युत मंडळ तेथही बांधकाम परवानगी मागते त्यामुळे तेथील रहिवाशांना नविन विद्युत कनेक्शन पासून वंचित रहावे लागते. या व्यतिरिक्त जी जुनी घरे आहेत त्यांनाही हा नियम लागू आहे. तेव्हा शासनास विनंती करुन स्लम व जूनी घरे व भाडेकरु विभागाकरिता ही अट वगळण्यात यावी. सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३७/२:-**

औरंगाबाद मनपा हद्दीतील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अस्तित्वात आसलेले (रस्ते) ताब्यात म्हणजेच १) अजिंठा औरंगाबाद रस्ता २) औरंगाबाद जालना रस्ता वरील सध्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या ताब्यात असल्यामुळे या रस्त्यावरील गावांचा विकास करण्यासाठी संबंधित विभागाकडून मनपाला अडथळे निर्माणे केले जातात. तरी विकासाच्या दृष्टीने मनपाने रस्ते ताब्यात घ्यावे.

सुचक :- श्री. तुळशीराम भगुरे
अनुमोदक : श्री. नरेंद्र पाटील
दिनांक :- १६/६/९३

**ठराव क्र. १३७/२:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मनपा हद्दीतील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अस्तित्वात आसलेले (रस्ते) ताब्यात म्हणजेच १) अजिंठा औरंगाबाद रस्ता २) औरंगाबाद जालना रस्ता वरील सध्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या ताब्यात असल्यामुळे या रस्त्यावरील गावांचा विकास करण्यासाठी संबंधित विभागाकडून मनपाला अडथळे निर्माणे केले जातात. तरी विकासाच्या दृष्टीने मनपाने रस्ते ताब्यात घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *ऐनवेळचे प्रस्ताव*

**विषय क्र. १३८/१:-**

आयुक्त प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद शहराचा विकास झापाटयाने होत आहे. त्यानुसार विकासाची कामे व्यवस्थित, सुरळीत व जलदगतीने होणे जरुरीचे आहे. औरंगाबाद महानगरपालिकेचा कामाचा व्यापा बघता सध्या अस्तित्वात असलेला कर्मचारी वर्ग अपुरा पडतो. त्यामुळे शहराच्या विकासाची कामे जलदगतीने व सुरळीत होणेसाठी महानगरपालिका अस्थापनेवर खालील प्रमाणे पदे निर्माण करणे आवश्यक आहे.

| **पदाचे नांव** | **पदसंख्या** | **वेतनश्रेणी** |
|---|---|---|
| अ) उप अभियंता | | |
| १) मुल्य निर्धारण अधिकारी | १ | रु. २००० ते ३५०० |
| २) उप अभियंता (इमारती व रस्ते) | १ | रु. २००० ते ३५०० |
| ३) उप अभियंता, (नगर रचना विभाग) | १ | रु. २००० ते ३५०० |
| ४) शहर अभियंता यांचे स्वीय सहाय्यक | १ | रु. २००० ते ३५०० |
| ५) आते. शहर अभियंता यांचे स्वीय सहाय्यक | १ | रु. २००० ते ३५०० |
| ६) कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनि:सारण) यांचे स्वीय सहाय्यक | १ | रु. २००० ते ३५०० |
| ब) कनिष्ठ अभियंता | ६ | रु. १४०० ते २९०० |
| क) दुय्यम अविक्षक | १२ | रु. १४०० ते २३०० |
| ड) अनुरेखक | ६ | रु. ९७५ ते १५४० |
| इ) वरीष्ठ लिपीक | ६ | रु. १४०० ते २३०० |
| फ) लिपीक | ६ | रु. ९५० ते १५०० |

वरील प्रमाणे पदे निर्माण करणे अत्यंत निकडीचे आहे. त्यामुळे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्र. १३८/१:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराचा विकास झापाटयाने होत आहे. त्यानुसार विकासाची कामे व्यवस्थित, सुरळीत व जलदगतीने होणेसाठी महानगरपालिका अस्थापनेवर खालील प्रमाणे पदे निर्माण करणे आवश्यक आहे.

| **पदाचे नांव** | **पदसंख्या** | **वेतनश्रेणी** |
|---|---|---|
| अ) उप अभियंता | | |
| १) मुल्य निर्धारण अधिकारी | १ | रु. २००० ते ३५०० |
| २) उप अभियंता (इमारती व रस्ते) | १ | रु. २००० ते ३५०० |
| ३) उप अभियंता, (नगर रचना विभाग) | १ | रु. २००० ते ३५०० |
| ४) शहर अभियंता यांचे स्वीय सहाय्यक | १ | रु. २००० ते ३५०० |

| | | |
|---|---|---|
| ५) अति. शहर अभियंता यांचे स्वीय सहाय्यक | १ | रु. २००० ते ३५०० |
| ६) कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व जलनि:सारण) यांचे स्वीय सहाय्यक | १ | रु. २००० ते ३५०० |
| ब) कनिष्ठ अभियंता | ६ | रु. १४०० ते २९०० |
| क) दुय्यम अविक्षक | १२ | रु. १४०० ते २३०० |
| ड) अनुरेखक | ६ | रु. ९७५ ते १५४० |
| इ) वरीष्ठ लिपीक | ६ | रु. १४०० ते २३०० |
| फ) लिपीक | ६ | रु. ९५० ते १५०० |

या सर्व पदास व सोबतच्या वेतनश्रेणी नुसार सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३९/२:-**

पदमपूरा वार्डातील गोविंदनगर येथे मा. आमदार श्री. चंद्रकांत खैरे यांच्या सहकार्याने डी. पी. डी. सी. च्या फंडातून एक व्यायाम बाकी असून ती व्यायाम शाळा जय हनुमान व्यायाम मंडळ, पदमपुरा या नांदणीकृत संस्थेस चालविण्यात देण्यात यावी ही विनंती.

सुचक : श्री. प्रदिपकुमार जैस्वाल

अनुमोदक : श्री. अविनाश कुमावत, श्री. मधुकर शिंदे, श्री. गजानन बारवाल

दिनांक : १८/३/९३.

**ठराव क्र १३९/२:-**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार पदमपूरा वार्डातील गोविंदनगर येथे मा. आमदार श्री. चंद्रकांत खैरे यांच्या सहकार्याने डी. पी. डी. सी. च्या फंडातून एक व्यायाम शाळा बांधण्यात आली असून, ती व्यायाम शाळा जय हनुमान व्यायाम मंडळ, पदमपुरा या नोंदणीकृत संस्थेस चालविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

"जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपली.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
मा. महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद.